श्री. विकास सावंत
सातारा विभागीय जनरल स्पर्धेत कास्यपदक



श्री. गणेश पैठणकर
राज्यस्तरीय क्रॉस-कंट्री स्पर्धेसाठी निवड



श्री. श्रीकांत पाटील
राज्यस्तरीय शुटींग व्हॉलीबॉल
स्पर्धेसाठी निवड



श्री. नरेंद्र डुबल
राज्यस्तरीय शुटींग व्हॉलीबॉल
स्पर्धेसाठी निवड



श्री. प्रशांत डांगे
राज्यस्तरीय क्रॉस-कंट्री
स्पर्धेसाठी निवड



अमोल पवार
ओपन कराटे स्पर्धेत सहभाग



सुधीर गंगावणे राज्यस्तरीय
तायकॉंदो स्पर्धेसाठी निवड

## राष्ट्रीय छात्रसेना



कॅप्टन प्रा.सौ. मंगला पवार
एन्.सी.सी.विभागप्रमुख (मुली)



J.U.O. किरण अतकरे - मुख्यमंत्र्यांशी हस्तांदोलन करताना
टी.एस.सी. कॅम्प दिल्ली फायरींगमध्ये सिल्व्हर मेडल



मेजर एच. डी. पाटील
एन्.सी.सी.विभागप्रमुख (मुले)



सिनि. अंडर ऑफिसर
कु. शिवांगी दबडे



कु. अर्चना पाटील



कॅप्टन कु. संगीता पवार
एन.आय.सी.,कडेगाव



कु. वृशाली शिंगारे
पंजाब ट्रेकिंग कॅम्प



सा. कु. अश्विनी कुसुरकर
Pre-CATC, A'Nagar
Blood Donation



कु. मिनाक्षी पवार
टी.एस.सी. मुंबई



S.U.O. श्री. संदीप पाटील
एन.आय.सी कॅम्प



S.U.O. श्री. प्रविण शिंदे
थलसेना कॅम्प



श्री. संदीप कदम

राष्ट्रीय छात्रसेना - मुले



राष्ट्रीय छात्रसेना - मुली





बी.एल.सी. कॅम्पसाठी निवड झालेले विद्यार्थी
मा.प्राचार्यां समवेत



एन.सी.सी. फायरींग कॉम्पीटिशन -
उद्घाटन




Start Where you are,
with what you have,
Make something of it,
stop not till the aim is reached
Never be satisfied

- DR. CARVER

---

Learning to be
Learning to gain knowledge
Learning to do creative things
Learning to be sensitive for Society
Learning to learn
Learning to develop scientific and
research mind'.
At least partly,
We have designed this section.

- PROF. R.B. PATIL

# विज्ञान विभाग

- विभागीय संपादक -

**राजेंद्र बी. पाटील**

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | **साखर उद्योगातील समस्या व उपाय** | | |
| | - सचिन सुर्यकांत पाटील | बी.एस्सी.भाग २ | ३ |
| | - भारत रामचंद्र देसाई | -''- | |
| २. | **भात शेतीचे नवे तंत्रज्ञान** | | |
| | - शशिकांत ढेकळे | बी.एस्सी.भाग २ | ८ |
| ३. | **स्वयंरोजगारातून समृद्धीकडे - एक मुलाखत** | | |
| | - सचिन पाटील | बी.एस्सी.भाग २ | ११ |
| | - भारत देसाई | -''- | |
| 4. | **Poverty in Plenty** | | |
| | - Pradnya Chavan | B.Sc.Part - III | 14 |
| | - Sharayu Patil | -"- | |
| | - Sunita More | -"- | |
| | - Vaishali Kumbhar | -"- | |
| ५. | **लोकरी मावा :- ऊस शेतीसमोरील अरिष्ट** | | |
| | - संदिप गरूड | बी.एस्सी.भाग ३ | १७ |
| ६. | **ऊस लागणीतील क्रांती - पिशव्यातील नर्सरी** | | |
| | - संदीप देसाई | बी.एस्सी.भाग ३ | २१ |
| | - शशिकांत ढेकळे | -''- | |
| ७. | **पुष्परचना :- अभिरुची संपन्न जीवनशैलीचा अविष्कार** | | |
| | - कु. मंजुषा जाधव | बी.एस्सी.भाग २ | २४ |

# साखर उद्योगातील समस्या व उपाय



- सचिन सुर्यकांत पाटील
- भारत रामचंद्र देसाई
बी. एस्सी. भाग २

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर १९४९ साली पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, वैकुंठभाई मेहता, धनंजयराव गाडगीळ, यशवंतराव चव्हाण यांच्या अथक प्रयत्नातून प्रवरानगर येथे आशिया खंडातला पहिला सहकारी साखर कारखाना उभा राहिला आणि त्यानंतर मग महाराष्ट्राने सहकार क्षेत्रात कधी मागे वळून पाहिलेच नाही. आज साखर उद्योग हा देशातला दोन नंबरचा शेतीप्रधान उद्योग आहे. अगदी २००१-२००२ या वर्षात भारताने १८५ लाख टन इतके विक्रमी साखरेचे उत्पादन घेवून जागतिक स्तरावर प्रथम क्रमांक पटकाविला आहे. परंतु इतके उत्पादन होवून सुद्धा गेल्या दोन तीन वर्षापासून साखर उद्योग आर्थिक अरिष्टातून जात आहे. म्हणून साखर उद्योग या अरिष्टात का सापडला आहे, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

**साखर उद्योग अरिष्टात का सापडला ? कारणे -**

**१) हळूवारपणे येणारे संकट -** साखर उद्योग हा काही अचानक संकटात सापडलेला नसून हळूवारपणे येणाऱ्या संकटाकडे दुर्लक्ष केल्यानेच ही आजची परिस्थिती निर्माण झालेली आहे. काळाच्या ओघात हा प्रश्नदेखील सुटून जाईल अशा विचारात आपले धोरणकर्ते राहिले. (कारण अनेक प्रश्नावर काळ हेच उत्तर आहे यावर आमच्या राज्यकर्त्यांची प्रगाढ श्रद्धा आहे) त्यामुळे साखर उद्योगाला लागलेला मधुमेह (पथ्यपाणी न करता राहिल्याने) वाढतच गेला आहे. आजमितीस साखरेचे पडून राहिलेले साठे, आंतरराष्ट्रीय बाजारात साखरेचे घसरलेले दर, कर्जात असणारे साखर कारखाने त्यामुळे शेतकऱ्यांना वाजवी दरच काय पण उसाचा किमान दरही देण्याच्या अवस्थेत कारखाने राहिलेले नाहीत.

**२) गोदामात पडून राहिलेली साखर -** २००१-२००२ या वर्षात भारतात साखरेचे उत्पादन १८५ लाख टन झाले होते, त्यात महाराष्ट्रातील उत्पादन ५६ लाख टन इतके आहे. यंदा २००२-२००३ गळीत हंगामात देशाचे साखरेचे उत्पादन १७५ लाख टन अपेक्षित आहे. त्यात महाराष्ट्राचा वाटा ५२ लाख टन असणार आहे. परंतु महाराष्ट्राकडे या अगोदरच ४४ लाख टन साखर ही गोदामात पडून आहे. त्याशिवाय चालू हंगामात उत्पादित होणारी साखर कुठे ठेवायची? हा प्रश्न सुटणे जितका कठीण तेवढाच किंवा त्याहूनही अधिक साखर कारखान्यांनी विविध बँकांकडून शिल्लक साखरेच्या पोत्यांवर उचललेल्या कर्जाच्या व्याजाचा प्रश्न अतिगंभीर आहे. जिल्हा मध्यवर्ती व राज्य सहकारी बँकांनी शिल्लक साखरेसाठी जवळ जवळ ५३०० कोटी रुपयांच्या उचली दिलेल्या आहेत. राज्य सहकारी बँकेने तर प्रत्येक पोत्यामागे १११० रुपये उचल कारखान्यांना दिलेली आहे असे असताना सध्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत साखरेचे भाव १०२० त १०६० प्रति क्विंटल च्या दरम्यान असल्यामुळे साखर कारखाने व बँका, 'शॉर्ट मार्जिन' च्या

संकटात सापडलेल्या आहेत. आणि साखरेचा उठाव नसल्यामुळे कर्जावरील व्याज मात्र वाढत आहे. सध्या एका पोत्यामागे दर महिन्यास १० रुपये निव्वळ व्याजापोटी द्यावे लागत आहेत.

**३) नव्या साखर कारखान्यांसाठीची परवाना पद्धत** - नव्या साखर कारखान्याच्या उभारणीसाठी पूर्वी असलेली परवाना पद्धत केंद्राने १९९८ पासून रद्द केल्यामुळे महाराष्ट्रात सध्या नव्या साखरकारखान्यांचे पेव फुटले आहे. आज महाराष्ट्रात परवाना दिलेल्या साखर कारखान्यांची संख्या १९२ आहे. गेल्या हंगामात १३६ कारखाने सुरू होते. तर २५ कारखाने बंद पडले होते. तर अपुऱ्या उसामुळे ११ कारखान्यांची मालमत्ता विकायला काढण्याचे आदेश सरकारने दिले होते. यंदाच्या गळीत हंगामात ६० कारखाने बंद पडण्याचे अंदाज आहेत. मग अशा परिस्थितीत साखर उद्योगाला महाराष्ट्राचे भूषण कसे म्हणता येईल ?

**४) वाढती रुपांतरीत किंमत (Conversion Cost)** - आजघडीला आपल्या महाराष्ट्रात एक पोते साखर तयार करण्यासाठी ६२० रु खर्च येतो. त्यालाच conversion cost असे म्हणतात. त्यात ऊसाची कापणी केल्यापासून ते साखर तयार होईपर्यंतच्या खर्चाचा समावेश असतो. इतर देशांच्या तुलनेत आपली conversion cost फारच जास्त आहे. याचीही अनेक कारणे आहेत त्यामध्ये-

**अ) झोन पद्धती रद्द** - यामध्ये १९९७ ला युती सरकारच्या काळात झोन पद्धती रद्द करण्यात आली. त्यामुळे जवळपास सुरु झालेल्या नव्या साखर कारखान्यांना स्वतःच्या स्वार्थापोटी प्रस्थापित जुन्या कारखान्यांनी आपला ऊस त्यांना पुरविला व स्वतःमात्र १००-२०० किमी. लांबून ऊस आणला. त्यामुळे त्यांचा वाहतूक खर्च वाढला. लांबून ऊस आणल्यामुळे उसाचा उताराही कमी झाला आणि पर्यायाने conversion cost वाढली.

**ब) भरमसाठ कामगार संख्या** - इतर देशांच्या तुलनेत भारतात एका साखर कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांची संख्या भरमसाठ आहे. ब्राझिल, द. कोरिया किंवा इतर देशांमध्ये आपल्या साखर कारखान्यांपेक्षा दहापट मोठी गाळपक्षमता असणारे कारखाने तिथे १५०-२०० कामगार चालवितात. परंतु आपल्या भारतात मात्र रोज अडीच हजार टन गाळप क्षमता असणारा कारखाना चालवायला १२०० कामगार लागतात. आज आपल्या इथला प्रत्येक संचालक स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी कामगार भरीत आहेत. त्यामुळे अतिरिक्त कामगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे, आणि परिणामी conversion cost वाढत आहे.

**५) भ्रष्ट व्यवस्थापन** - दुर्दैवाने आज महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रातही भ्रष्टाचाराची मुळे खोलवर रुजलेली आहेत. आणि साखर उद्योग हाही त्याला अपवाद नाही. प्रत्येक कारखान्याची प्रगती वा अधोगती ही त्या त्या कारखान्यांच्या व्यवस्थापनावरच अवलंबून असते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे एकीकडे सर्व कारखाने संकटात सापडल्यामुळे शेतकऱ्यांना वाजवी दर द्यायला निष्फळ ठरले असताना दुसरीकडे हुतात्मा सहकारी कारखाना कुठलेही उपउत्पादन प्रकल्प नसताना शेतकऱ्यांना सर्वोच्च दर देत आहे. याचे सर्व श्रेय त्या कारखान्याच्या व्यवस्थापनालाच दिले पाहिजे.

**६) साखरेचे घसरलेले दर** - आज देशाच्या व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतही साखरेचे दर घसरलेले आहेत. आजघडीला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत साखरेचे दर घसरण्याचे एक कारण म्हणजे विकसित देश देत असलेल्या सबसिडी हे सुध्दा आहे. सध्या युरोपीयन देश साखरेच्या निर्यातीवर २६५% अनुदान देत आहेत. अगदी पाकिस्तानही साखरेचा निर्यातीवर ३०% निर्यात अनुदान देत आहे.

त्याचबरोबर साखरेची आयात रोखण्यासाठी अमेरिकेत साखरेवर आयातकर २४४% तर युरोपीयन युनियनमध्ये २००% आहेत. परंतु भारतात मात्र गॅट करारातील तरतुदीनुसार १५०% आयात कर लावायला मुभा

असतानादेखील तसे करण्यास आपले सरकार विकसित देशांच्या दबावाखाली धजवत नाही. सध्या भारतात साखरेवरआयात कर ६०% आहे.

**७) कररूपाने होणारी लूट : -**

आज शासनाला विविध कर रुपाने साखर उद्योगातून मिळणारे उत्पन्न जवळपास २२०० ते २४०० कोटी रु. आहे. एकीकडे भारतात शेतकऱ्यांना दिली जाणारी सबसिडी ऋण असताना शेतकऱ्यांना मात्र विविध करांचा बोजा सहन करावा लागत आहे. केंद्र व राज्य सरकारकडून साखर उद्योगातून गोळा केले जाणारे कर सोबतच्या टेबलामध्ये दिले आहेत.

मग एखाद्या शेतीप्रधान देशात शेतकऱ्याची इतकी प्रचंड लूट होत असेल तर या देशाला शेतीप्रधान म्हणता येईल का?

**८) लोकरी मावा** - या सर्व संकटांना साखर उद्योग तोंड देत असतानाच ऊसावर पडलेल्या लोकरी मावा या किडीमुळे शेतकरी आणखी मोठ्या संकटात सापडला आहे. ही कीड उसाच्या पानातील रस शोषून घेत आहे. तसेच लोकरी

| अ. नं. | आकारण्यात येत असलेले विविध कर | गोळा केली जाणारी रक्कम |
|---|---|---|
| १) | ऊस खरेदी दर | ३%प्रमाणे प्रतिटन ३० ते ४० रु |
| २) | साखरेच्या पोत्यावरील एक्साईज ड्युटी | प्रतिपोते ८५ रु. |
| ३) | मोलॅसिसवरील अबकारी कर | प्रतिटन १०० रु. |
| ५) | मोलॅसिस बगॅसवरील एक्साईज ड्युटी | प्रतिटन ५०० रु. |
| ६) | मळी परवाना | प्रतिटन १ रु. |
| ७) | बगॅस व मोलॅसिस विक्री | प्रतिटन २०% |
| ८) | मुख्यमंत्री निधी | प्रतिटन १ रु. |
| ९) | व्ही. एस. आय.(वसंतदादा शुगर इन्स्टीलुर) | प्रतिपोते १ रु. |
| १०) | साखर संघास | प्रतिपोते ५० पैसे |
| ११) | साखर संकुल निधी | प्रतिटन २ रु. |
| १२) | एक्साईज ड्युटी | १६.५% |
| १३) | मळी अल्कोहोल ड्युटी | ३७ रु. |
| १४) | शिक्षण निधी | प्रतिपोते २० पैसे. |
| १५) | औद्योगिक पाणीपट्टी प्रति १०००० लिटरला | १२० रु |

मावा ही कीड पानाच्या खालच्या बाजूस लागत असल्यामुळे त्यावर औषध फवारणी करणे गरजेचे व अवघड झाले आहे. लोकरी मावा या किडीवर ठोस असा उपचार अजून सापडलेला नाही. इंडोनेशियातील एका पाहणीनुसार या किडीमुळे ऊसाच्या वजनात २६% ने घट होते. व ऊसाच्या उताऱ्यात २.३% ने घट होते. असा निष्कर्ष निघाला आहे. त्यामुळे औषधाचा खर्च वाढत आहे. पर्यायाने उत्पादन खर्च वाढत आहे व त्यामुळे शेतकरी ऊसशेतीपासून दूर जावून इतर अन्य पिकांच्याकडे वळत आहे. आणि तसे जर झाले तर बरेच कारखाने कमी ऊसउत्पादनामुळे बंद पडतील.

या आणि अशा सर्व कारणांच्यामुळे साखर उद्योग मोठ्या अरिष्टात सापडला आहे. या उद्योगाला अरिष्टातून बाहेर काढण्यासाठी केंद्र, राज्य सरकारने देखील काही पाऊले उचललेली आहेत.

**केंद्राने व राज्य सरकारने उचललेली पाऊले : -**

**अ) केंद्राने उचललेली पाऊले -**

१) २० लाख टन साखरेचा 'केंद्राने' द्रबफर स्टॉक करण्याचा.निर्णय.

२) साखरेच्या निर्यातीला जहाज वाहतुकीसाठी टनामागे २५ डॉलर अनुदान देण्याचा निर्णय.

३) ऊसाची किमान किंमत टनामागे ५० रु वाढविण्याचा निर्णय.

४) उपउत्पादनात इथेनॉलची निर्मिती करून ते इथेनॉल पेट्रोलमध्ये ५% प्रमाणात व हळूहळू वाढवून १०% करण्याचा निर्णय.

५) त्याबरोबरच नाबार्ड ने देखील कारखान्यांकडील हंगामी कर्जाचे रुपांतर ५ वर्षाच्या कर्जात करण्याचा निर्णय.

**ब) राज्य सरकारने उचललेली पाऊले :-**

१) निर्यातीसाठी प्रतिपोते १०० रु प्रमाणे १०० कोटी रुपये मंजुर केले आहे.

२) ऊसावर आकारला जाणारा ३% एवढा खरेदी कर माफ करण्याचा निर्णय.

**इतर उपाययोजना** - सरकारला एक भरमसाठ उत्पन्न मिळवून देणारा उद्योग म्हणून साखर उद्योगाला या अरिष्टातुन बाहेर काढण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने आणखी संयुक्त प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यामध्ये काही अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजनांचा समावेश असला पाहिजे. त्यामध्ये

**१) अल्पकालीन उपाययोजना :-** त्यामध्ये

अ) नवीन साखर कारखान्यांसाठी दिल्या जाणाऱ्या परवाना पद्धतीवर आणखी निर्बंध घातले पाहिजेत.

ब) किमान एका वर्षासाठी साखर उद्योगावर आकारले जाणारे कर माफ केले पाहिजेत. जेणेकरुन साखर उद्योगाला या संकटातून सावरायला मदत होणारे आहे.

क) एकिकडे विकसित देश शेतकऱ्यांना भरमसाठ सबसिडी अनुदान देत असताना आपण अनुदान न देणे आत्मघातकी ठरणार आहे.

ड) लोकरी मावा या रोगावर त्वरीत एखादा ठोस उपचार शोधून काढण्यासाठी वसंतदादा शुगर इन्स्टीट्युट, साखर संघ, सरकार, कारखाने यांनी संयुक्त प्रयत्न केले पाहिजेत.

**२) दिर्घकालीन उपाययोजना :-**

वरील सर्व अल्पकालीन उपायाखेरीज काही दीर्घकालीन उपाययोजनादेखील आखणे गरजेचे आहे. जेणेकरुन 'ये रे माझ्या मागल्या आणि ताक कण्या चांगल्या' अशी परिस्थिती येणार नाही. त्यामध्ये,

**अ ) इथेनॉल निर्मिती -** गॅसोहोल म्हणजे पाणीविरहित इथेनॉल. सध्या भारत सरकारने पेट्रोलमध्ये ५% इथेनॉल व ते प्रमाण वाढवून १०% करण्याचा निर्णय घेतलेला आहे. परंतु हे प्रमाण इतर देशांच्या प्रमाणे आपण २०% पर्यंत वाढविले पाहिजे. जेणेकरुन आपले क्रुडऑईलच्या आयातीसाठी लागणारे परदेशी चलन काही प्रमाणात वाचविता येईल. सध्या वर्षाकाठी आपल्या देशाचे क्रुड ऑईल आयातीसाठी ७५ हजार कोटी रुपये खर्च होतात. यावरून याचे महत्व आपल्या लक्षात येईल. सध्या मळीपासून इथेनॉल तयार करण्यासाठी परवानगी आहे. परंतु आगामी काळात आपण ब्राझिलप्रमाणे प्रायमरी ज्यूस चा वापर उत्तम प्रतिच्या साखर निर्मितीसाठी करुन सेकंडरी ज्यूस चा वापर इथेनॉल किंवा गॅसहोल निर्मितीसाठी केला पाहिजे. या इथेनॉल निर्मितीसाठी सध्या प्राथमिक प्रकल्प म्हणून मिरज, मनमाड,

उ. प्रदेशातील बरेली येथे कारखाने उभारणी चालू आहे. त्याबरोबरच सरकारने सर्व कारखान्यांना इथेनॉल निर्मितीसाठी मुक्त परवाने दिले आहेत. या इथेनॉल निर्मितीमुळे अनेक फायदे होणार आहेत. ते खालीलप्रमाणे-

१) या इथेनॉलचा किंवा गॅसहोलचा वापर हा antiknocking agent म्हणून होणार आहे. यापूर्वी Antiknocking agent म्हणून TEL (tetra ethyl lead) चा वापर केला जात होता. टेलमुळे होणारे शिशाचे प्रदूषण गॅसहोलच्या वापरामुळे टाळता येईल.

२) पेट्रोलमध्ये इथनॉल मिसळल्यामुळे प्रदूषण बऱ्याच प्रमाणात कमी होणार आहे.

३) अतिरिक्त साखरेचा साठा पडून राहण्याचा प्रश्न उद्भवणार नाही. साखरेची आगामी काळातील गरज लक्षात घेवूनच उत्पादन घेता येईल.

४) इंधनासाठी खर्च होणाऱ्या परकिय चलनात बचत होईल.

५) जोपर्यंत ऊस आहे तोपर्यंत इथेनॉल निर्मिती चालूच राहिल, त्यामुळे खनिज तेलाचे साठे संपण्याच्या संकटापासून आधार मिळेल.

६) शेतकऱ्यांनाही चांगला वाजवी दर देता येईल.

**ब) सहवीजनिर्मिती प्रकल्प :-** कारखान्यात मिळणाऱ्या चुयापासून किंवा बगॅसपासून वीज निर्मिती करण्यासाठी सहवीज निर्मिती प्रकल्प उभारणे ही काळाची गरज बनली आहे. कारण ही वीज शासनालाही परवडणारी आहे. सध्या अशा प्रकल्पाचे काम भांडवलाविना रेंगाळले आहे. सरकारने त्यांना भांडवल उपलब्ध करुन देवून या प्रकल्पांना गती दिली पाहिजे.

**क) जैवतंत्रज्ञानाचा वापर :-** प्रत्येक साखर कारखान्याच्या व्यवस्थापनाने व सरकारने विविध संशोधन संस्थांच्या सहाय्याने जैवतंत्रज्ञानाच्या माध्यमातून एकरी जास्त उत्पन्न देणाऱ्या, चांगला साखर उतारा असणाऱ्या कमी पाण्यात येणाऱ्या , रोगांना दाद न देणाऱ्या चांगल्या ऊस जातीची निर्मिती करुन त्याची लागवड करण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

**ड) व्यवस्थापनात सुधारणा -** प्रत्येक कारखान्याच्या प्रगतीला किंवा अधोगतीला हे त्या त्या कारखान्याचे व्यवस्थापनच जबाबदार असते. म्हणून प्रत्येक कारखान्याच्या व्यवस्थापनाने आपल्या मनमानी कारभाराला आळा घालून सभासदांच्या व कारखान्याच्या हितार्थ निर्णय घेवून उद्योग चालविले पाहिजेत. आपली कनव्हर्शल कॉस्ट कमी होण्याच्या दृष्टीने जे जे प्रयत्न करता येतील ते केले पाहिजेत. ऊसाच्या रसात असणाऱ्या ७०% पाण्याचे रिसायकलींग करुन पुन्हा तेच पाणी कारखान्याच्या खर्चासाठी वापरण्याचा एक यशस्वी प्रयत्न एका कारखान्यात सुरू झाला आहे. ते सगळ्यांनी स्विकारले पाहिजे. जेणेकरून आपली कनव्हर्शन कॉस्ट आपल्याला कमी करता येईल. नाहीतर बोलायचे शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि करावयाचे स्वत:च्या स्वार्थासाठी हे थांबायलाच हवे. याकरिता सामान्य शेतकऱ्यांनी देखील कारखान्याच्या कारभारात वेळोवेळी दखल दिली पाहिजे. तर आणि तरच एकेकाळी महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी असणारा साखर उद्योग पुन्हा भरभराटीस येईल.

**अनामिक कवी**
**- अग्नि पंख -**
**ए.पी.जी.अब्दुल कलाम)**



"येणाऱ्या प्रत्येक दिवसासाठी तयारीत रहा,
त्यांना सारखेच सामोरे जा,
जेंव्हा ऐरण होशील तेंव्हा घाव सोस,
अन् हातोडा होशील तेंव्हा घाव घाल"

# भात शेतीचे नवे तंत्रज्ञान

- शशिकांत ढेकळे
बी. एस्सी. भाग २



शास्त्रज्ञ म्हटंले की आपल्या डोळ्यासमोर विद्यापीठात काम करणारा, पी. एच. डी. झालेला सुटाबुटातील चष्मा घातलेली व्यक्ती समोर येते. परंतु शास्त्रज्ञ किंवा प्राध्यापक या पदव्या नसून वृत्ती आहेत. चिकित्सक दृष्टी, न कंटाळता काम करण्याची तयारी, सततचे निरिक्षण व सखोल विचारशक्ती असलेला माणूस शास्त्रज्ञ असतो. एम. एन. रॉय संस्थेच्या शेतकरी मुक्त विद्यापीठाने प्राध्यापक म्हणून गौरविलेल्या नेर्ले येथील एका शेतकरी शास्त्रज्ञाची मुलाखत.

नेर्ले (ता. वाळवा) येथील शेतकरी मनोहर शामराव ढेकळे यांनी 'कर्जत राईस हायब्रीड सीड नं. १' बियाणे उत्पादित केले त्यात त्यांचा महाराष्ट्रात प्रथम क्रमांक आला. त्यांनी केलेल्या नाविण्यपूर्ण प्रयोगाबद्दल खास मुलाखत -

**प्र.१ या नवीन प्रयोगात महाराष्ट्रात प्रथम क्रमांक आलेबद्दल, आपले अभिनंदन! तुम्ही या प्रयोगाकडे कसे वळलात? तुम्हाला सर्वप्रथम कल्पना कशी मिळाली ?**

उ. सन २००२ मध्ये भारताची लोकसंख्या १०० कोटीवर जाणार हे गृहित धरुन भारताने कृषी क्षेत्रात अन्नधान्य उत्पादन वाढीवर भर देण्याचे ठरविले.

सन १९९७ ला फेब्रुवारी मध्ये दिल्ली येथे 'पुसा इंन्स्टीट्युट' मध्ये भात, ज्वारी, मका, तुर अशा अनेक पिकांसाठी 'पिकवाढ उत्पादन प्रकल्प' करण्याचे ठरविले. त्यात विशेष म्हणजे शेतकऱ्यांचा समावेश महत्वाचा ठरविला गेला. भात पिकासाठी भारत सरकारने 'इंटरनॅशनल राईस रिसर्च इन्स्टिटयुट' (IRRI) फिलीपाईन्स, मनिला यांच्या सहकार्याने कार्यक्रम ठरवला गेला. यामध्ये महाराष्ट्रात कोकण कृषी विद्यापीठ दापोली यांच्या प्रादेशिक भात संशोधन केंद्र, कर्जत यांच्यामार्फत जाहिरात देण्यात आली.

या जाहिरातीनुसार मी भातसंशोधन केंद्र कर्जत येथे पत्रव्यवहार केला. १५ एप्रिल ९७ ला शेतकाऱ्यांना मुलाखतीसाठी बोलवण्यात आले. महाराष्ट्रातून ३३५ शेतकरी आले होते. त्यातील ३५ शेतकरी निवडले गेले. त्यामध्ये मी एक होतो.

**प्र.२ भाताचे सर्वसाधारण उत्पादन कोकणमध्ये होते. हा प्रयोग करताना त्यांनी प्रथम हवा, पाणी, माती परीक्षण केले होते का ?**

उ. विद्यापीठाने २० एप्रिल ते २५ एप्रिल दरम्यान 'संकरीत भात पिक उत्पादन' परिसंवाद घेतला. २५ मे ला प्रत्यक्ष क्षेत्र पहाणी केली. मातीचे व विहिरीच्या पाण्याचे परीक्षण केले. त्यामध्ये अडचण अशी आली की आमच्या विहिरीचे पाणी चालणार नाही व वाळवा तालुक्यात रेनफॉल (सरासरी पाऊस) उष्णतामान व हवेतील आर्द्रता यांचे व्यस्त प्रमाण होत होते. म्हणून मला भात करु नये असा सल्ला देण्यात आला. मी नाउमेद झालो नाही. *'प्रतिकूल परिस्थितीत आपण उभे रहावे व धोका स्विकारल्याशिवाय यश मिळत नाही'* हे मनाशी ठाम बाळगून मी भाताचे पीक घेणार, हे ठरविले.

**प्र.३ विद्यापीठाने पीकाची जबाबदारी घेतली होती का ?**

उ. नाही. विद्यापीठाने सांगितले की, आम्ही पिकाची जबाबदारी स्विकारू शकत नाही. परंतु त्यांनी याप्रयोगासाठी मोफत बियाणे व मार्गदर्शन दिले.

**प्र.४ भात उत्पन्नासाठी किती क्षेत्र निवडले होते? तसेच या बियाणासाठी काही पूर्वप्रक्रिया केली होती का ?**

उ. भात उत्पादनासाठी मी ६५ गुंठे क्षेत्र निवडले होते. यामध्ये रोपे टाकून लावणारे ३२ शेतकरी व टोकण

पद्धतीने काम करणारे आम्ही तीनजण होतो. तसेच संकरीत बियाणासाठी त्यांनी आम्हास दोन जातीचे भात बियाणे दिले होते. १) नरवाण २) मादीवाण. नरजातीचे नाव गोपनीय ठेवून ठक-१ असे दिले होते व मादीवाणास 'कर्जत हायब्रिड सीड फिमेल नं. १' असे होते.

**प्र.५ भाताची टोकण पद्धत कशी केली ?**

उ. भाताची टोकण पद्धत चार वेळा करायची होती. १) प्रथम १५ जून २)१९ जून ३) २४ जून सर्व नर वाण ४) मादीवाण टोकण - २७ जून.

**आकृती :-**



१) नरवाण टोकणी १५ जून१९९७ पहीला

२) नरवाण टोकणी १९ जून१९९७ पहीला

३) नरवाण टोकणी २४ जून१९९७ पहीला

४) भादीवाण टोकण सहाओळी २७ जून १९९७

**दोन ओळीतील अंतर ९ इंच**
**दोन बियातिल अंतर ३ इंच**

६५ गुंठे क्षेत्रात १० आरे पाडले. पहिली ओळ नराची टोकली. अशा समांतर १० ओळी भात टोकण केली. दि.१५ जुन ९७ रोजी दुसरी ओळ पहिल्या नराच्या ओळीच्या पुर्वेस ९ इंचावर टोकली. अशा दहा ओळी टोकल्या. दि. १९ जुन ९७ ला तिसरी ओळ पहिल्या नराच्या पश्चिमेस ९ इंचावर, अशा दहा ओळी टोकल्या.

२४ जून रोजी चौथ्यांदा सर्व मादीवाण सहा ओळी प्रत्येकी ९ इंच अंतरावर अशा सर्व क्षेत्रात ६० ओळी टोकल्या.

पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या नरवाण टोकणीस प्रत्येकी १५०० ग्रॅम बियाणे लागले. आणि मादीवाणास १० किलो बियाणे लागले. बियाणे टोकताना एका वेळेस

एका जागेत ३ ते ४ बियाणे टोकले. हे सर्व बियाणे विद्यापीठाने मोफत पुरविले. भात टोकण पूर्ण झाली. त्यावेळेस शेतात फक्त पहिल्या नरवाणाच्या दहा ओळी दिसू लागल्या होत्या. त ३० जुलै पर्यंत सर्व भात उगवून आला होता.

**प्र.६ या पिकांवर काही औषधे व खते वापरण्यात आली होती का ?**

उ. सदर भातास खते फार कमी द्यावयाची असतात. उगवून आल्यानंतर ५ जुलैला पाऊस पडल्यामुळे १०० किलो डायअमोनियम सल्फेट व १० किलो फेरस सल्फेट मातीत लोह कमी असल्यामुळे दिले.

२० ते २४ जुलैला पहिली भांगलण देण्यात आली. २५ जुलैला खताचा दूसरा हप्ता १०० किलो युरिया, १०० किलो १५:१५:१५ सुफला दिला. पावसाचे प्रमाण जेमतेम असल्यामुळे पाणी पाजावे लागले नाही.

भात पिकात फिरत असताना असे दिसून आले की नरवाण फुलावर येण्यास काही अवधी लागणार होता. पण मादी वाणाच्या पोतात पोटरासुध्दा तयार नव्हता. मी तात्काळ विद्यापीठाशी फोनवर शंका विचारली, त्यांनी तात्काळ दिल्ली येथे कळविले. तेथून ३० तासात डॉ. एच सुब्रम्हण्यम माझ्या पिकक्षेत्रावर आले. त्यांनी १ किलो सिंगल फॉस्फेट १०० लिटर पाण्यात मिसळून दोन वेळा फवारण्यास सांगितले. दोन दिवसात मादीवाण पोटरीवर दिसू लागल्यावर मादीची वरील २/३ पाने खोडण्यात आली. दोन्ही नरवाण व मादीवाण पोटरीवर आल्यानंतर GA-३ जिब्रेलिक ॲसिड (१४ ग्रॅम) सर्व भातावर फवारण्यात आले.

**प्र.७ उत्पादन जास्त येण्यासाठी बीजोत्पादनासाठी काही कृत्रिम परागसिंचनाच्या पद्धती सुचविल्या का ?**

उ. पिकाचा फूलोरा सुरु झाल्यापासून एका नॉयलॉनच्या दोरीच्या साहय्याने कृत्रिम परागसिंचन घडवून आणले. सदरचा कार्यक्रम १५ दिवस दररोज १२ ते ४ यावेळेत केला. कारण दुपारी भरपूर सूर्यप्रकाशात फुलोरा पूर्णपणे उमललेला असतो.

भात भरल्यानंतर वेगळा दिसणारा भात (मिसळ) पूर्णपणे काढून टाकण्यात आला. हे प्रमाण माझ्याकडे अत्यल्प होते असे, त्यांचे म्हणणे पडले.

**प्र.८ या क्षेत्रात एकूण तुम्हाला किती उत्पादन झाले ? तसेच एका लोंबीत अंदाजे किती भात होते ?**

उ. विशेष म्हणजे माझ्या क्षेत्रावर नरास एका दाण्याच्या रोपास सरासरी २०० असे एका भातातून १४००० भात मिळाले.

मादीच्या लोंबीत अंदाजे ९० ते ११० भात असतात. त्यात परागसिंचन झालेले ५० ते ६५ दरम्यान भात होते. एका भातापासून २२ फूटवे मिळाले. माझ्या क्षेत्रात सिडसेट ५५ मिळाला असे त्यांचे म्हणणे होते. भारतात सरासरी ३० ते ३२ महाराष्ट्रात ३५ ते ४० तर माझ्या वैयक्तिक क्षेत्रात ५५ सिडसेट मिळाला.

भात काढताना प्रथम नरवाण पूर्णपणे काढून बडवून वाळवून ठेवला. २४ पोती तोडे बांधून म्हणजे१६८० किलो सर्वभात झाला.मादीवाण नंतर काढून वाळवून स्वच्छ करुन पॅकींग करुन दिला. १०७० किलो भात होता.

ह्या भातास प्रतिकिलो दर ७० रु मला मिळाला. शेतकऱ्यांना हा भात बाजारात १०० रु किलो या भावाने विकत घ्यावा लागेल. असे त्यांनी सांगितले.

सदरच्या भाताचे नाव दिल्लीत 'सह्याद्री' असे ठेवण्यात आले. **सिडसेट बाबतचा प्रथम पुरस्कार** व **'सुक्ष्म निरीक्षक संवेदनशील शेतकरी'** अशी उपाधीही मिळाली.

**प्र.९ आजची तरूणपिढी ही सर्वसाधारणपणे जास्त नोकरीकडे वळत आहे त्यासाठी तुमचा काय संदेश आहे ?**

उ. आजकाल जे तरुण स्वत:ची शेती असूनसुद्धा नोकरीकडे वळत आहे, त्यांनी आजच्या काळात नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन शेती केली पाहिजे. कारण आजकाल सरकारी व खाजगी क्षेत्रात रोजगार व नोकऱ्या यांचे प्रमाण अत्यल्प झाले आहे. म्हणून तरुणांनी नवीन विकसित तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीचा विकास केला पाहिजे. स्वयंरोजगारातून आत्मनिर्भर झाले पाहिजे.

# स्वयंरोजगारातून समृद्धीकडे - एक मुलाखत

- सचिन पाटील
- भारत देसाई
बी. एस्सी. भाग २

आज भारत देश जगात दूध उत्पादनाच्या दृष्टीने प्रथम स्थानावर आहे. २००२-२००३ या एका वर्षात भारताने ८५ दशलक्ष टनापेक्षा जास्त उत्पादन घेण्याचा उच्चांकी विक्रम केला आहे. याचे सर्व श्रेय १९७१ मध्ये इंदिरा गांधींच्या काळात सुरु झालेल्या ऑपरेशन फ्लड या योजनेलाच जाते.

पूर्वीपासून भारतात दुग्धव्यवसाय हा शेतीला पूरक व्यवसाय म्हणून केला जातो. आज आपण आपल्या देशातील जवळपास ७० दशलक्ष लोकांचे जीवन या दोन व्यवसायाशी निगडीत आहे. दुग्धव्यवसायाला शेतकऱ्याची भाग्यलक्ष्मी म्हणून ओळखले जाते. अलिकडच्या काळात दूध उत्पादन व्यवसायात बरीच तांत्रिक , शास्त्रीय व आर्थिक प्रगती झाल्यामुळे यापुढील काळात तो स्वतंत्र व्यवसाय म्हणून करायला काहीच हरकत नाही.

आपल्या देशात सध्या बेकारी व सुशिक्षित बेरोजगारांची संख्या हा फार मोठा प्रश्न ठाण मांडून बसला आहे. अशावेळी दुधउत्पादन व्यवसाय हा सुशिक्षित बेरोजगारांना एक पर्याय म्हणून पुढे येत आहे.

म्हणून गेल्या पाच वर्षापासून या क्षेत्रात कार्यरत असलेल्या येरवळे, ता. कराड येथील यशस्वी दूधउत्पादक शेतकऱ्याची आम्ही घेतलेली मुलाखत पुढीलप्रमाणे-

**प्र आपले नाव काय व शिक्षण किती झाले आहे?**

उ. माझे नाव सर्जेराव ज्ञानदेव यादव. शिक्षण ९ वी पास.

**प्र. आपण दुग्धव्यवसायाकडे वळण्याचे कारण काय ?**

उ. आमच्या तीन भावात मिळून फक्त ५-६ एकर जमीन आहे आणि शिक्षण कमी असल्याने कोठे नोकरीही नाही. त्यामुळे शेतीला एक पूरक जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसायाकडे वळण्याचा निर्णय घेतला आणि योगायोगाने सर्व गोष्टी साधत गेल्या व आम्ही हा दुग्धव्यवसाय सुरू केला.

**प्र. आपण या व्यवसायात केंव्हापासून आहात ?**

उ. मी नोव्हेंबर १९९७ ला या व्यवसायात पदार्पण केले ते आजपर्यंत मी हाच व्यवसाय करीत आहे.

**प्र. या व्यवसायात पडण्यापूर्वी तुम्हाला पूर्वीचा अनुभव होता काय ?**

उ. खास काही नव्हता. परंतु या व्यवसायात पडण्यापूर्वी मी हाच व्यवसाय करणाऱ्यांच्या गाठीभेटी घेवून मी या व्यवसायाविषयी सर्व माहिती घेतली होती. त्याचबरोबर अशा लोकांच्या म्हैसपालन प्रकल्पात जावून प्रत्यक्ष सगळी कामे पाहून आलो होतो. त्याचबरोबर कोयना डेअरी, कराड येथे वेळोवेळी भरवीत असलेल्या प्रशिक्षण शिबिरांना हजर राहून या व्यवसायासंबधीचे ज्ञान मिळविले होते.

**प्र. व्यवसायास सुरूवात कशी केलीत ? त्याचबरोबर हा व्यवसाय सुरू करताना कुणाचे व किती अर्थसहाय्य लाभले?**

उ. मी या व्यवसायास नोव्हे. १९९७ ला सुरूवात केली. त्यावेळी मी प्रथम ४ म्हैशींचा गोठा प्रकल्प हातात घेतला. पूर्वीचे आमचे गुऱ्हाळ होते त्याच शेडमध्ये गव्हाणी वगैरे तयार करुन मी या व्यवसायास सुरुवात चार म्हैंशीवरून केली. त्यासाठी मला भू-विकास बँकेचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यावेळी मला या प्रकल्पासाठी भू-विकास बँकेने ७०००० रु चे कर्ज दिले होते. यानंतर काही दिवसांनी नंतर कोयना डेअरीनेही उचलींच्या स्वरुपात भरपूर अर्थसहाय्य दिले.

**प्र. सध्या तुमच्याकडे पशुधन किती आहे ?**

उ. सध्या माझ्याकडे १६ गाई व ४ म्हैशी आहेत. त्यात सध्या ६ गाई व २ म्हैशी दूधाच्या आहेत वर १० गाई व २ म्हैंशी गाभण असल्यामुळे त्यांचेपासून मिळणारे दूध उत्पादन कमी आहे.

**प्र. तुमच्याकडे असणाऱ्या म्हैशी व गाई कुठल्या जातीच्या आहेत ?**

उ. माझ्याकडे असणाऱ्या सर्व गाई जर्शी होस्टन (६५ ते ७०%) या जातीच्या असून ४ म्हैशींपैकी ३ मुरा महिसाणा या जातीच्या व एक साधी दुगल जातीची आहे.

**प्र. तुमचे सध्याचे दूध उत्पादन किती आहे ? व दूधविक्रिचे नियोजन कसे आहे ?**

उ. सध्या जनावरांचा गाभण काळ असल्यामुळे तसे दूध उत्पादन कमी आहे. तरी दररोजचे एकूण उत्पादन सकाळी एकूण - ८० ते ९० ली. व संध्याकाळी ६० ते ७० ली. आहे. अशाप्रकारे रोज १५० ते १६० ली. दूधाचे उत्पन्न सध्या होत आहे. उत्पन्न होणारे सगळे दूध मी कोयना डेअरीत घालतो. रोज सकाळी व संध्याकाळी कोयना डेअरीची गाडी येथे येते व दूध घेवून जाते.

**प्र. तुम्ही जनावरांसाठी कोणत्या प्रकारचे खाद्य (पेंड) वापरता व ते किती प्रमाणात तुम्ही जनावरांना देता ?**

उ. आम्ही सध्या खाद्यासाठी 'महानंदा' चे गोळी खाद्य, मकाआट्टा व सरकी पेंड याचा वापर करतो. खाद्याचे प्रमाण हे त्या त्या जनावराच्या दूध देण्यावर अवलंबून आहे. दुधाच्या निमपट खाद्य असे प्रमाण आहे. उदा. एखादी गाई जर २० ली. दूध देत असेल तर १० किलो खाद्य तिला दिले जाते.

**प्र. आपण या व्यवसायात कोणकोणत्या यंत्रांचा वापर करता?**

उ. सध्या मी फक्त वैरण बारीक करण्यासाठी कडबाकुट्टी (कुट्टामशीन) या यंत्राचा वापर करतो. या यंत्रामुळे सगळी वैरण बारीक होते. अगदी उसाचे लहान लहान तुकडे होतात. त्यामुळे जनावरांनाही खायला सोपे जाते. वैरणीचीही बचत होते. आमच्याकडे मनुष्यबळ हे उपलब्ध असल्याने धारा काढण्यासाठी यंत्र आम्ही आणलेले नाही.

**प्र. म्हैसपालन व गाईपालन यामध्ये कोणता प्रकल्प किफायतशीर आहे ?**

उ. म्हैसपालनापेक्षा गाईपालन हा प्रकल्प निश्चितच अत्यंत किफायतशीर आहे. कारण म्हैशीचा भाकडकाळ गाईपेक्षा जास्त असतो. गाईच्या दुधाला म्हैशीच्या दूधापेक्षा फॅट जरी कमी लागत असली तरी गाईचे सरासरी दूध देण्याचे प्रमाण म्हैशीपेक्षा कितीतरी पट अधिक आहे. म्हणून म्हैशीपेक्षा गाईप्रकल्प कितीतरी अधिक किफायतशीर आहे.

**प्र. हा व्यवसाय करीत असताना तुम्हाला रोज कोणती खबरदारी घ्यावी लागते ?**

उ. १) हा व्यवसाय करीत असताना प्रथम- स्वच्छता हा घटक फार महत्वाचा आहे. त्यासाठी आम्ही जनावरांचा गोठा सकाळी, संध्याकाळी रोज दोनदा धुतो. जनावरे खाली बसत असल्याने त्यांच्या शरीराचा पाठीमागचा भाग कायम भरलेला असतो. त्यामुळे किमान पाठीमागचा भाग तरी रोजच्या रोज व्यवस्थित धुणे गरजेचे असते. त्याचबरोबर आठवड्यातुन एकदा जनावरे अगदी साबणाने स्वच्छ पूर्णपणे धुणे गरजेचे आहे.

२) त्याचबरोबर वेळेचे नियोजनही फारच महत्वाचे आहे. त्यामध्ये जनावरांना रोज तीन वेळा पाणी देणे, दोनदा वैरण, धारेच्या वेळेला खाद्य चारणे हे सर्व वेळच्या वेळी घडणे फार गरजेचे असते.

३) जनावरांना होणाऱ्या आजारावर लक्ष ठेवून वेळोवेळी उपचार करणे महत्वाचे ठरते.

**प्र. जनावरांना होणारे रोग व त्यांच्यावर केले जाणारे उपचार याविषयी माहिती द्याल का ?**

उ. होय. साधारणपणे गाई व म्हैशींना होणारे रोग सारखेच असतात. परंतु गोठ्याच्या व जनावरांच्या स्वच्छतेची काळजी जर व्यवस्थित घेतली तर सहसा रोग होत नाहीत. परंतु त्यातूनही गाईंना, म्हैशींना होणारे रोग खालीलप्रमाणे -

१) कासेस होणारा मस्टायटिस २) उन्हाळ्यात ताप भरणे
३) जिभेला काटे येणे ४) काही साथीचे रोग

या रोगांवरील उपचार करण्यासाठी आम्ही कोयना डेअरीच्या डॉक्टरांना बोलावत होतो. सुरुवातीला डॉक्टरांना महिन्याला ५०० रु. व्हिजिट फी देत होतो. पण आता सरावामुळे सर्व रोग व त्यावरील औषधे यांची माहिती झाल्यामुळे आम्ही स्वत:सुद्धा औषधोपचार करु शकतो.

**प्र. या व्यवसायासाठी औषधांवर होणारा खर्च किती आहे ?**

उ. तरी एका जनावरामागे वर्षाला सरासरी १०००रु. औषधांवर खर्च होतात. त्यामध्ये गाई ,म्हैशी गाभण

राहण्याच्या वेळी कृत्रिम रेतन, जनावरे व्यालानंतर दिले जाणारे विविध प्रकारचे डोस व लसी उदा. धनुर्वात, घटसर्प व होणाऱ्या रोगावरील औषधोपचार यांचा समावेश असतो.

**प्र. सध्या तुमच्या दुधाला लागणारी फॅट किती आहे ?**

उ. होय. सध्या आमच्या गाईच्या दूधाला लागणारी फॅट ३.८ ते ४ च्या दरम्यान आहे. सर्वसाधारणपणे ३.५ फॅटला लिटरमागे ७.७५ रु एवढा दर पडतो. परंतु दुधाला लागणारी फॅट जर ३.५ च्या आत असेल तर दुधाला मिळणारा दर कमी मिळतो. म्हणून हा व्यवसाय किफायतशीर राहण्यासाठी दूधाची फॅट ३.५ च्या पूढे व S.N.F. ८.५ असणे गरजेचे आहे. त्याचबरोबर दुधाची डिग्रीही २७ च्यापूढे लागणे गरजेचे आहे. त्यासाठी गुरांना जर ओल्या वैरणीबरोबरच वाळलेली वैरण मिक्स करून दिली तर फॅट मध्ये थोडा फरक पडतो. तसेच गुरांचे संगोपनही व्यवस्थित केले तर फॅट मध्ये फरक पडतो.

**प्र. दुधाचे उत्पादन वाढवण्यासाठी काही खास प्रयत्न करता का ? कोणते ?**

उ. होय. सहसा गाई म्हैशींपासून संध्याकाळी मिळणाऱ्या दुधाचे प्रमाण हे सकाळपेक्षा कमी असते. त्याचे शास्त्रीय कारण संध्याकाळी धार काढल्यावर गुरे रात्री निवांतपणे रवंथ करतात. परंतु दिवसा मात्र काही कारणांमुळे त्यांच्या रवंथ करण्याच्या प्रक्रियेमध्ये अडथळा येत असतो. त्यासाठी आम्ही वेळेचे अगदी काटेकोर नियोजन केले आहे. त्यामध्ये आम्ही सकाळी ७ व संध्याकाळी ७ या वेळेलाच धार काढल्यानंतर वैरण टाकतो ते नंतर संध्याकाळीच धार काढल्यानंतरच गुरांना वैरण टाकतो. त्यामुळे जनावरांना दिवसाही रवंथ करण्यासाठी भरपूर वेळ मिळतो.

त्याचबरोबर या क्षेत्रातल्या तज्ञांच्या मते व डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार धार काढतेवेळी जर आपण गुरांना शास्त्रीय संगीत किंवा सायलेंट संगीत ऐकविले तर जनावरे धार काढताना शांत ऊभी राहतात. संगीताच्या तालामध्ये गुंग होतात. रवंथ चांगले करतात व पर्यायाने दूध उत्पादनही वाढते.

त्याबरोबरच जनावरांना जर रोज अर्धा तास पोहायला नदीला किंवा टँकमध्ये सोडले तर जनावरांच्या शरिराचा चांगला व्यायाम होतो व त्यामुळे उत्पादनात फायदेशीर फरक पडतो.

**प्र. एकदंर हा व्यवसाय किफायतशीर आहे का ? व कसा ?**

उ. निश्चितच ! गाईपालन हा व्यवसाय फायदेशीर आहे. कारण या व्यावसायातून मला दरमहा किमान १२ ते १५ हजार रुपये मिळतात. म्हणजे या व्यवसायातून मला वर्षाकाठी दीड ते पाऊणेदोन लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. त्याचबरोबरच मलमूत्राचा उपयोग शेताला खत म्हणून होतो. त्यामुळे हा व्यवसाय स्वत: कष्ट घेतले तर निश्चितच फायदेशीर आहे.

**प्र. तरुणांना जर या व्यवसायात यायचे असेल तर काय केले पाहिजे ?**

उ. १) प्रथम या व्यवसायात पडण्याअगोदर तरुणांनी या व्यवसायाची सर्व माहिती घेतली पाहिजे. आयोजित केल्या जाणाऱ्या प्रशिक्षण केंद्रांना हजर राहून ज्ञान मिळवले पाहिजे.

२. मोठी जागा, पाण्याची मुबलक सोय, विविध प्रकारची यंत्रे उपलब्ध करुन व्यवसायास सुरुवात केली पाहिजे.

३ .हा व्यवसाय करत असताना स्वच्छता व वेळेचे नियोजन केले पाहिजे.

४. स्वत: कष्ट करण्याची तयारी पाहिजे. चिकाटीने हा व्यवसाय केला पाहिजे.

५. एकंदर या व्यवसायास वाहून घ्यायची तयारी असेल तर सध्याच्या सुशिक्षित बेकार तरुणांना हा व्यवसाय अतिशय किफायतशीर व पैसे मिळवून देणारा आहे. खाजगीकरण्याच्या प्रक्रियेत नोकऱ्यांची संख्या कमी होत आहे. शासनाची आर्थिक परिस्थिती तितकीशी चांगली नसल्याने कंत्राटी पद्धतीने नेमणूका होतात. अशा वातावरणामध्ये सुशिक्षित तरुणांनी दुधासारख्या फायदेशीर व्यवसायाची कास धरली तर स्वयंरोजगारातून व स्वावलंबनातून आत्मनिर्भर होता येईल.

आपल्या शिक्षणाचा उपयोग करुन घेवून या व्यवसायातील नवीन माहिती व तंत्रज्ञान आत्मसात करून व्यवसाय कमी खर्चात अधिक फायदेशीर करता येईल.

# Poverty in plenty

-Pradnya Chavan
- Sharayu Patil
- Sunita More
- Vaishali Kumbhar
B. Sc. Part - III.

**Introduction :-**

It is generally believed that, the nutrition level of people in particular area depends upon economic status of region, but fairly rich regions may have people starving due to economic and social inequality. So it should be looked upon that deaths of women and children may not be the monopoly of Gadchiroli & Melghat - the well - known tribal regions, but in shadows of big buildings of sugarcane growers & noise of their tractors, the women & children are crying for food. This may puzzle the readers.

Therefore we conducted a grassroot level survey in Karad by actual analysing blood reports i.e. Hb percentage. The results are really astonishing. Revealing the ugly face of real economy in irrigated area we observed that, the women working in field, growing the grains & don't have enough food to eat. Nearly 60% of them have Hb level much less than required. The similar observation was there in an irrigated village called Bhatwadi, tal. Walva, where the blood reports of 90% of women were having inadequate percentage of Hb. So there may be Melghat in Karad or Melghat in house with all symbols of wealthyness like T. V. motor. etc. & still women in those houses are malnourished. This inequality leads to the fact that 50 % of Indian population (women) are under the danger of malnourishment. The NGO'S, Govt. should look in to the matter & care should be taken to improve nutrition quality or level of women.

**What is Haemoglobin?**

Definition :- Haemoglobin is a conjugated protein synthesized inside the immature erythrocyte in the red bone marrow. It consist of two components -

1. Haem-Iron 7 protoporphyrin
2. Globin-Amino acid chain

It gives red colour to the blood. At a time 1 gm. Hb has the capacity to store 1.34 ml of oxygen.

Molecular wt. of Hb =64500 daltons

Dilution factor =250

**Role of Haemoglobin -**

It helps to increase the amount of oxygen in the tissues, where it brings about oxidation of food & produces carbondioxide and water.

**Clinical significance & normal value of Hb -**

percentage of Hb is different in male and female. It is higher in male & lower in female. In children it is less than adult but in newly born babies it is higher.

| Natural value | Hb |
|---|---|
| Man | -14-18 g/dl |
| Women | -11.5-16.5 g/dl |
| children (upto 1 year) | - 11.0-13.0 g/dl |
| children (10 to 12) | -11.5-14.5 g/dl |
| Infants | - 13.5-19.5 g/dl |

A decrease in Hb. below normal range is an indication of anaemia. A decrease in Hb. concentration occurs in haemo concentration, due to loss of body fluid in severe diarrhoea and vomiting. High values are also observed in congenital heart diseases (due to reduced oxygen supply) in emphysema & also in polyscythemia. Hb concentration drops during pregnancy.

**How we carried out the survey ?**

We have studied percentage of Hb in women belonging to two categories. i.e. lower society & higher society. Our main purpose was to check the health of women. We told all information about

the survey & we asked some questions about diet. Occupation, annual income etc. to the group of women in both categories. Then we observed that percentage of Hb in women belonging to lower society is much less & percentage of Hb in women belonging to higher society is normal. It was obvious.

Few exceptional cases were observed in high income grade women with lower value of Hb and similarly in low income grade women with higher value of Hb. Thus, it seems that though the economic condition is fine, does not necessarily mean that women should posses a good health.

Despite of the high income grade, women doing jobs, are found to posses comparatively lower values for Hb, because they don't have time to pay attention at their health. Generally low income grade women are found to posses ill health, anemia & susceptible for all sorts of infections.

We get oxygen free of cost from the nature, but due to lack of Hb percentage some of the women can not make proper use of this free oxygen in a desired way.

**Observation of general survey -**

We worked out this project by selecting 45 women in higher & lower class categories. Our findings are as given below-

1. Hb percentage of nearly 20 women is near about 7 but their annual income is lower i. e. near about 15000 per annum.

   This means that Hb of nearly 50% of women is below normal level.

2. Hb percentage of nearly 15 women is 12 gm/dl. These women posses income very near to Rs. 150000 per annum.

Out of these 45 women we selected a few representative examples, ( i.e. women belonging to both class) by taking in to consideration their Hb percentage and annual income etc. Results of our observetion are given below-

**Hb of women belonging to higher class -**

| No | Name | Annual | Hb gnm/dl |
|---|---|---|---|
| 1. | Mrs. Gokhale Kusum A. | 150000 | 9 |
| 2. | Mrs. Patil Pradnya B. | 150000 | 10.2 |
| 3. | Mrs. Mohite Shamla S. | 150000 | 11 |
| 4. | Mrs. Godase Minal S. | 150000 | 12.3 |
| 5. | Mrs. Kulkarni Sangita B. | 100000 | 12 |
| **Hb of women belonging to lower class -** | | | |
| 1. | Mrs. Shirke Kalpana | 10000 | 9 |
| 2. | Mrs. Salavi Vimal | 15000 | 13 |
| 3. | Mrs. Tupe Shobha | 12000 | 9.1 |
| 4. | Mrs. Jagtap Rupali | 18000 | 8 |
| 5. | Mrs. Salavi Sunita | 20000 | 7 |

**Conclusion :**

**For higher class -**

1. It has been found from the above data that the percentage of Hb is for less even among some high class women because.

a. Women are considered subsidiary in their homes.

b. They have to work on the fringe while keeping up with the traditional beliefs & faiths.

c. Their blood pressure is increased due to mental tension. They take various tablets to reduce it, consequently percentage of Hb becomes less.

d. The women doing services are under stress & have no time to pay attention at their health.

2. It has also been found that the percentage of Hb is normal among the high class women, because they are careful about their diet. They are economically sound & there is conducive atmosphere in the family.

**For lower class -**

1. Percentage of Hb was found very less among the working women because -

a. The malnutrition & lack of knowledge about the diet of women.

b. Poor economic conditions.

c. Atmosphere in the home (addict husband)

2. Among some working class women, the percentage of Hb was quite normal. The reason behind this was, they have enough quantity of green vegetables in their daily diet.

   i.e. The vegetables containing enough amount of Iron & Protein.

   e.g.spinach, drumsticks, leaves, amaranthus.

3. The women working in the farms produce the food but they are deprived of enough food to eat. This is a matter of worry.

4. If the women in the country are not healthy, then how come that next generation of the country can be healthy ? So if we want to make country developed & strong then keen attention is to be provided towards health of the women.

**Measures -**

The health of women can be developed by increasing the Percentage of iron & protein in their body by following ways-

1. The medical camps should be organised by Govt. to check the women's Hb.

2. Enough information should be provided by primary health centers, as well as iron containing tablets should be provided.

**Other measures -**

Some home medicines can also be used for this purpose

1. One can put a clean iron nail in the vegetable while cooking.

2. The vegetables having adequate percentage of iron. e.g. spinach, mint, drumstick leaves, coriander should be present in their diet.

**Percentage of iron & protein in Vegetables is as follows -**

| Green vegetables | Iron mg | Protein gm |
|---|---|---|
| 1. Mint | 15.6 | 4.8 |
| 2. amaranthus | 25.5 | 4.0 |
| 3. spinach | 10.9 | 2.0 |
| 4. Drumstick leaves | 7.0 | 6.7 |
| 5. Coriander | 18.5 | 3.3 |

3. Pulses are rich in iron. On different occassions like **Haldi-kum kum (हळदी कुंकू)**, **Phutanas & Bhijanes (फुटाणे-भिजाणे)** are distributed among the women. **Phutanas (फुटाणे)** contain lot of Iron. So by distributing **Phutanes (फुटाणे)** women can fulfil their Hb deficiency. **Puran-poli (पुरण-पोळी)** is the menu for all Hindu festivals. As Such.Science behind arranging all cultural activities is to fulfil. iron need of the people.

4. Women should not be peripherals

**Recommendation -**

1. The treatment given in primary health centers should be free of cost & attention should be paid at whether this treatment is provided to needy people or not.

2. The Govt. should seek the help of NSS units of universities & colleges for their work.

**Acknowledgment -**

Prof. R. R. Kumbhar, Prof. R. B. Patil, Prof. V. H. Ghorpade, have provided us the proper guidelines. We heartily them you for their co-operation.

# लोकरी मावा :- ऊस शेतीसमोरील अरिष्ट

- संदिप गरूड
बी. एस्सी. भाग ३

प्रथम आपण लोकरी मावा म्हणजे काय ते पाहू या. लोकरी मावा हा एक प्रकारचा किटक आहे. त्यालाच ग्रामीण भाषेत पांढरी माशी या नावाने ओळखले जाते. विज्ञानातील नावे देण्याच्या पद्धतीनुसार याला *सिरॅटोव्हॅकूना लॅनिजेरा (झे)* असे नाव आहे. सध्या या किटकाचा ऊसावर जास्त प्रादुर्भाव झालेला दिसतो. या जातीचे कीटक उष्ण आशियायी प्रदेशात ऊसावर जास्त प्रमाणात आढळून येतात, त्यामध्ये फिलीपाईन्स, इंडोनेशिया, तैवान, चीन, जपान, कोरिया, पाकिस्तान व भारत या प्रदेशात आढळलेले आहेत. या जातीचे कीटक महाराष्ट्रात प्रामुख्याने ऊस पिकावर आढळून आलेले आहेत.

**किडीची ओळख :-**

ही कीड बाल्यावस्था व प्रौढावस्था या दोन्ही अवस्थेतून जाते.

**बाल्यावस्था :-** मादीच्या पोटातून नुकतीच बाहेर पडलेली प्रथम बाल्यावस्थेतील किड ०.७७ मि. मि. लांब व ०.२७ ते ०.३८ मि. मि. रुंद पिवळसर किंवा हिरवट पिवळसर रंगाची असते. ही अवस्था अतिशय चपळ असते.

द्वितीय बाल्यावस्था १.२३ मि. मि लांब व ०.३० ते ०.४६ मि. मि. रुंद तृतीय बाल्यावस्था १.८३ मि.मि. लांब व ४६ ते १.०७ मि.मि.रुंद व चौथी बाल्यावस्था २.०१ मि. मि. व ०.६५ ते १.२८ मि. मि. रूंद आढळून येते. तिसऱ्या अवस्थेपासून त्याच्या पाठीवर पांढऱ्या रंगाचे लोकरीसारखे

पश्चिम महाराष्ट्रामध्ये जमिनीची प्रत चांगली व निसर्गत:च उपलब्ध असणारी कृष्णा, कोयना, प्रवरा इ. नद्यांची खोरी, यामुळे साखर कारखान्यांच्या रुपाने कृषी औद्योगिक विकासाचा पाया पश्चिम महाराष्ट्रात घातला गेला. सहकारी साखर कारखाने या क्षेत्राचा विकास प्रामुख्याने यशवंतराव चव्हाण, धनंजय गाडगीळ, विठ्ठलराव विखे पाटील, वसंतदादा पाटील आदि प्रभृतींमुळे झाला. शेतकऱ्यांच्या ऊसाला योग्य भाव देऊन या परिसराचा कायापालट तर झालाच शिवाय शेतकऱ्यांची सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक प्रगती झाली. त्यामुळे शेतकरी कुटुंबे सुखी व समृद्ध झाली.

परंतु मागील दोन वर्षात साखरेच्या अतिरिक्त उत्पादनामुळे साखरेचा साठा पडून आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतही साखरेला योग्य भाव मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगला भाव देणे साखर कारखान्यांना परवडत नाही. रास्त भाव मिळवण्यासाठी वेळोवेळी जनआंदोलने झाली. अशा परिस्थितीत यंदा शेतकऱ्यांच्या ऊसावर लोकरी मावा नामक कीड आल्याने शेतकरी वर्ग चिंतातूर झाला आहे. अचानक आलेल्या या किडीमुळे शेतकरी हैराण झाला आहे. एकदा का त्या लोकरी माव्याचा प्रादुर्भाव झाला की, ती कीड ऊसातील अन्नरस शोषून घेते. त्यामुळे ऊसाची वाढ खुंटते. शिवाय हेक्टरी टनेजमध्ये घट होते. एक, दोन फवारण्याने कीड नियंत्रणाखाली येत नाही. त्यामुळे शेतकऱ्याचा उत्पादन खर्च वाढतो आहे. दुसरीकडे ऊसाचे टनेज घटते आहे, पर्यायाने त्याचा फटका आधीच डबघाईला आलेल्या कारखान्यांना बसणार आहे. यासाठी किडीचे वेळीच नियंत्रण केले पाहिजे. शेतकऱ्यांना या लोकरी माव्याविषयी व उपायांविषयी सर्व माहिती असली पाहिजे. या दृष्टीकोनातून हा विषय मी निवडला आहे.

लोकरी मावा हा उसाचा कर्दनकाळ होवू पहात आहे. भारतातच नव्हे तर इतर अनेक देशात याचा प्रादुर्भाव झालेला आढळतो. यासाठी सर्व शेतकऱ्यांनी किड व्यवस्थापनाकडे आपले लक्ष केंद्रित केले पाहिजे.

तंतू दिसू लागतात. हे तंतू म्हणजे संरक्षणासाठी तयार केलेले एक प्रकारचे मऊ कवच असते. बाल्यावस्था प्रामुख्याने मुख्य उसाच्या मागील शिरेच्या दोन्ही बाजूला आढळते.

**प्रौढ अवस्था :-**

चौथ्या बाल्यावस्थेनंतर कात टाकून प्रौढ कीड बाहेर येते. प्रौढ किड २.१९ मि. मि. लांब व ०.४७ ते ०.७८ मि. मि. रुंद असते. प्रौढ किटक थोड्या अंतरापर्यंत उडू शकतो. प्रौढांना संयुक्त दोन डोळे असतात. साधारणपणे एक महिन्यात किडीची वाढ पूर्ण होते.

**प्रादुर्भावामुळे ऊसाचे होणारे नुकसान :-**

प्रामुख्याने कीड पानाच्या मागील बाजूस आढळते. कीड पानाच्या मुख्य शिरेच्या दोन्ही बाजूला बसते व तेथून ते रस शोषण करतात. त्यामुळे संपूर्ण पान काळे पडते. व पानाची अन्न तयार करण्याची क्षमता मंदावते. पाने ठिसूळ बनतात. रस शोषल्यामुळे ऊस कमकुवत होतो. ऊस उत्पन्न व साखर उताऱ्यात घट होते.

इंडोनेशियात लोकरी माव्याच्या प्रादुर्भावामुळे ऊसाच्या वजनात २६% व साखरेच्या प्रमाणात २८% घट आढळून आली आहे. पूर्ण वाढ झालेल्या ऊसात प्रादुर्भाव झाल्यास ऊस उत्पादनात साधारणपणे ५ ते ७ मे. टन प्रति हेक्टर व साखर उताऱ्यात ०.५ युनिटने घट येईल अशी शक्यता आहे. या किडीच्या जास्त प्रादुर्भावामुळे ऊस उत्पन्नात हेक्टरी २५ मे. टन व साखर उताऱ्यात दोन युनिटपर्यंत घट येईल असे अनुमान आहे.

**प्रादुर्भावास अनुकूल घटक :-**

ढगाळ हवामान, थंड हवा, १९ ते २५ से. ग्रे. तापमान व ८० ते ८५ सापेक्ष आर्द्रता इ. घटक प्रादुर्भाव वाढविण्यास कारणीभूत ठरतात. प्रामुख्याने या रोगास co ८६०३२, co ६७१, co ८०१४, co ७५२७, co ७७०४, co ४१९, co ८०११, co ७४० या जाती बळी पडतात.

**किडीच्या प्रसाराची कारणे :-**

पंख असणाऱ्या माद्या अत्यंत कमी प्रमाणात उडू शकतात. मात्र जोराचा वारा आल्यास माद्या १.५ - ३ कि. मी अंतर वाऱ्याबरोबर जाऊ शकतात. महाराष्ट्रात १६ जुलैच्या दरम्यान सांगली जिल्ह्यात प्रथमच आढळलेली कीड १५ सप्टेंबर पर्यत अहमदनगर जिल्ह्यात पोहचली म्हणजेच ह्या किडीने दोन महिन्यात वाऱ्याबरोबर साधारणपणे ४५० कि. मी. प्रवास केला.

मुंग्या मधासारखा पदार्थ गोळा करण्यासाठी आकर्षित होतात व आपल्याबरोबर लहान बाल्यावस्था वाहून नेतात. ऊसाची किडग्रस्त पाने एका भागातून दुसऱ्या भागात नेल्यास प्रसारास मदत होते.

**नियंत्रणाचे उपाय :-**

अति जलद मोठ्या प्रमाणावर होणारे प्रजोत्पादन झपाट्याने होणारा प्रसार, ऊस उत्पन्न व साखर उताऱ्यातील घट लक्षात घेता ह्या किडीचे वेळीच नियंत्रण करणे महत्वाचे आहे.

**मशागतीय उपाय :-**

१. किडग्रस्त भागात ऊसाची पट्टापद्धत अथवा रुंद सरी पद्धतीने लागण करावी. त्यामुळे उन्हाची तिरीप जोरात लागून कीड मरण्यास मदत होते.

२. किडग्रस्त ऊस बेण्यासाठी वापरु नये. बेणे निवडून झाल्यानंतर ऊसाची पाने जाळून टाकावीत.

३. ऊस लागवडीपूर्वी बेणे प्रक्रिया करावी. ३०० एम. एल. मॅलिथियान १०० लि. पाण्याच्या द्रावणात १५ मिनिटे बेणे बूडवून घ्यावे.

४. रासायनिक खतांचा संतुलित वापर करावा. नत्रयुक्त खताचा वापर जास्त केल्यास किडीच्या वाढीस प्रोत्साहन मिळते.

५. तणाचा नाश करावा. शेत व बांध स्वच्छ ठेवावेत.

६. मावाग्रस्त ऊसाची पाने एका शेतातून दुसऱ्या शेतात नेऊ नयेत.

७. बांबूवरील किडही नष्ट करावी.

**जैविक उपाय :-**

क्रायसोपरला कारनी व कोनोबाथ्रा ॲफिडिव्होरा हा परभक्षक मित्र कीटक मऊ शरीराच्या किडीवर उपजिविका करतो. क्रायसोपरला कारनी २५०० अंडी अथवा अळ्या प्रति हेक्टर सोडाव्यात.

व्हर्टी सिलियम लेकॅनी २० ग्रॅ/१० ली पाण्यात घेवून त्याची फवारणी करावी. सदर जैविक किटकनाशक कृषी विद्यापीठ राहुरी तसेच मोठ्या किटकनाशक विक्रेत्याकडे मिळू शकेल.

**रासायनिक उपाय :-**

१. प्रथमत: फिश ऑईल रोशीन सोप (मीनार्क) २०.२५ ग्रॅम किंवा निरमा पावडर १० ते १२ ग्रॅम + खालीलपैकी कोणत्याही एका किटकनाशकाची फवारणी १० लि. पाण्यातून करावी.एकच किटकनाशक पुन्हा पुन्हा वापरू नये.

२. डायक्लोरोव्हास (७६) १५-२० मि. ली. किंवा मिथील ऑक्सीडोमेटॉन १०-१५ मि. ली. किंवा डायमिथोएट २५ मि. ली. किंवा मिथिल पॅराथिऑन (२%) फॉलीडॉल पावडर २५ किलो प्रति हेक्टर फवारणी करावी.

३. किटकनाशकाच्या फवारणीनंतर निरमा पावडर १०-१२ ग्रॅम + निंबोळी युक्त औषध ४०-५० मि. ली. घेवून १० ली. पाण्यातूनच फवारणी करावी.

**सरकार व कारखान्यांचे योगदान :-**

लोकरी मावा या किडीमुळे शेतकरीवर्ग अडचणीत आला आहे. यासाठी सरकार व कारखान्यांनी यामध्ये पुढाकार घेतला पाहिजे व कमी सवलतीमध्ये शेतकऱ्यांच्या ऊसावरती फवारणी व धुरळणी कारखान्यांमार्फत करणे आवश्यक आहे. आतापर्यंत जिल्हा परिषद व राज्यशासन यांच्या माध्यमातून १६ लाख रुपयांची किटकनाशके या किडीच्या नियंत्रणासाठी वापरली आहेत. जिल्ह्यातील महत्वाच्या साखर कारखान्यांच्या माध्यमातून अंदाजे १० लाख रुपयांची किटकनाशके वाटप केली आहेत.

**शेतकऱ्यांच्या मुलाखती :-**

वरील सर्व बाबींच्या अनुषंघाने काही शेतकऱ्यांच्या मुलाखती व योजलेले उपाय संदर्भात माहिती घेण्यात आली. शेतकऱ्यांशी चर्चा केल्यानंतर खालील निष्कर्ष आढळून आले.

| शेतकऱ्याचे नाव | गाव | रासायनिक उपाय | परीणाम |
|---|---|---|---|
| श्री. जगन्नाथ तानाजी गरुड | येणके | मोनोक्रोटोकास ३६% एस. एल. + २-३ ग्रॅम मिकनेल्क एम एस +३-४ग्रॅम टैमेरौन गोल्ड ५० ली. पाण्यात मिसळून फवारणी | फवारणी केल्यानंतर अवघ्या पाच ते सहा तासात रोगाचा प्रादुर्भाव कमी झालेला आढळून आला. |
| श्री. सुभाष शंकर पाटील | येणके | फॉलीडॉल पावडर एकरी २५ किलो फवारणी | या फवारणीस कीड लवकर बळी पडते. परंतु पावडरीचे प्रमाण जास्त झाल्यास ऊसावरती याचा दुष्परिणाम होतो. |

| शेतकऱ्याचे नाव | गाव | रासायनिक उपाय | परीणाम |
|---|---|---|---|
| श्री. अशोक विठ्ठल पाटील | आणे | ३५ ई. सी. एन्डोसल्फॉन १ मि.ली + २५ ई.सी.मेटासिस्टॉक २ मि.ली./लिटर पाणी | प्रादुर्भावास किमान ३० ते ३५ दिवस आळा बसण्यास मदत होते. |
| श्री. आनंदा खाशाबा पाटील | आणे | २-३मि.ली. रोगार/लिटर | या मिश्रणाचा लक्षणीय परीणाम आढळून आला. पण थोडाकाळ टिकला. |
| श्री. दत्तू पिलू पाटील | पोतले | डायमिथोएट ३०% ई.सी २५ मि. ली + १० ली. पाणी प्रती हेक्टर | या रासायनिक मिश्रणाचा परिणाम २५ ते ३० दिवस आढळून आला. |
| श्री. अनिल गणपती मोहिते | पोतले | निरमा पावडर १० ग्रॅम+ निंबोळी किंवा तंबासूयुक्त औषध ४० ते ५० मि.ली.+१० लि. पाणी | या फवारणीचा परिणाम न आढळलेचे दिसून आले. |
| श्री. आनंदराव काशिनाथ पाटील | अंबवडे | मिनार्क २० ग्रॅम + डायक्लोरोव्हास ७६ % प्रति १५ मि. ली. एकरी फवारणी | किमान २५ ते ३० दिवस या रासायनिक मिश्रणामुळे आळा बसल्याचे आढळून आले. |
| श्री. वसंतराव मोरे (गुरूजी) | कुसूर | फिनवेल डस्ट व लेडेन डस्ट २५ किलो प्रति हेक्टर धुरळणी | या धुरळणीचा जास्त वापर झाल्याने ऊसाच्या पाणाचे शेंडे जळल्याचे निदर्शनास आले. यामुळे याची कमी प्रमाणात धुरळणी केल्यास योग्य परिणाम आढळल्याचे दिसले. |

कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी फवारणी व धुरळणीसाठी फवारणी पंपाची सोय केली आहे. परंतु सर्वच कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या ऊसावरती एकाचवेळी फवारणी करून देणे आवश्यक आहे. तसे झाल्यास रोगाचा बंदोबस्त करता येईल.

वरील माहितीवरुन कोणत्याही रासायनिक औषधामुळे या किडीवर रामबाण नियंत्रण करता आलेले नाही. एक किंवा दोन फवारणीनंतर या रासायनिक औषधांचा परिणाम फक्त थोड्या काळापर्यंत (३० ते ३५) दिवस आढळून येतो. फॉलीडॉल पावडर या रासायनिक औषधाचा जास्त वापर केल्यास ऊसावरती दुष्परिणाम आढळून आला. त्यामुळे या पावडरीची थोड्या प्रमाणात धुरळणी केल्यास याचा चांगला परिणाम दिसून येतो. परंतू हा परिणाम कमी कालावधीचा असल्याने या किडीवर नियंत्रण करणे अवघड झाले आहे. सध्याची स्थिती पाहता या रोगाचे प्रमाण किमान ६०% कमी झाल्याचे आढळून येते. मागील दोन महिन्यांपूर्वी या रोगाचे प्रमाण जास्त प्रमाणात होते. उष्णतेचे प्रमाण वाढल्यामुळे या रोगाचे प्रमाण कमी झाल्याचे समजते. त्यामुळे संपूर्ण रोग आटोक्यात आणणे हे केवळ निसर्गावरतीच अवलंबून आहे असे निर्दशनास आले आहे.

# ऊस लागणीतील क्रांती - पिशव्यातील नर्सरी

- संदीप देसाई
- शशिकांत ढेकळे
बी. एस्सी. भाग ३

ऊस शेती हा दिवसेंदिवस आतबट्ट्याचा धंदा होत चाललेला आहे. वाढता उत्पादन खर्च, घटणारे उत्पन्न कमी होत जाणारा भाव यामुळे ऊसाचे पिक परवडत नाही. लोकरीमावा, कारखान्याने दिलेला दर या गोष्टींवर शेतकऱ्याचे नियंत्रण नसते. त्यामुळे ऊस परवडायचा असेल तर ऊसाचा उत्पादन खर्च कमी करणे, नैसर्गिक अडचणींवर मात करणे व शहाणपणाने शेती करणे एवढेच पर्याय उरतात.

ऊस करी शेतकऱ्याकडे सर्वात मोठा खर्च म्हणजे लागण खर्च, पारंपारिक पद्धतीत तीन डोळ्यांच्या टिपऱ्या ओळीने मांडून त्या दाबल्या जातात. मुळे फुटण्यासाठी खताचा बेसल डोस द्यावा लागतो, त्यामुळे तणांचा जोर वाढतो. खुरपणीचा खर्च वाढतो. ऊसाची गर्दी झाल्यामुळे मर वाढते व ऊसाचे वजन कमी होते. तसेच मार्च एप्रिलमध्ये लागण करावयाची झाल्यास जून अखेरपर्यंत पाऊस पडत नाही. त्यामूळे ऊसाची वाढ कमी होते व ऊस जळण्याची शक्यता असते. या सर्व गोष्टीवर अलिकडच्या काळात एक अतिशय चांगला उपाय शोधण्यात आला आहे, तो म्हणजे ऊसाची रोप लागणपद्धत -

**ऊस रोपन लागण पद्धतीस लागणारे साहित्य पुढीलप्रमाणे :-**

| | | |
|---|---|---|
| १) | पोयट्याची माती (नदीची माती) | - १ ट्रॉली |
| २) | कुजलेले शेणखत | - दोन गाड्या |
| ३) | बारीक वाळू | - १ डंपर |
| ४) | नत्र स्थिर करणारे जिवाणू | - २ किलो |
| ५) | स्फूरद विरघळणारे जिवाणू | - २ किलो |
| ६) | प्लास्टिक पिशवी | - २० किलो |
| ७) | ऊस बियाणे | - १ टन |



**एक डोळा पद्धतीने लागण कशी करावी?**

सर्वप्रथम हे सर्व साहित्य आणि साधने जमा करुन उन्हाळ्यात किंवा लागणीपूर्वी पिशवी भरणेचे काम करुन घ्यावे, म्हणजे लागण बियाणे तोडून त्यादिवशीच लागण पूरी करता येते.

प्रथम मातीचे ३ भाग, वाळू १ भाग, शेणखत वाळूच्या निम्मे असे घेवून सर्व माती, वाळू, खत, जिवाणू यांचे एकत्र मिश्रण करुन ठेवावे. याला साधारण दोन मजुरास एक दिवस लागतो.

हे सर्व मिश्रण तयार केल्यानंतर बाजारातून ६×८ इंचाच्या प्लास्टिक पिशव्या, (१०० ते १२५) गेज घ्याव्यात. साधारण १ किलोत ४०० पिशवी बसते. त्यापेक्षा जास्त बसल्यावर त्या पिशव्या कमी मायक्रानच्या असतात. हाताळणी करताना फूटून जातात. सर्वसाधारणपणे बाजारात तेलाची अथवा दुधाची पिशवी असते, त्या गेजची पिशवी घ्यावी. पिशव्या घेतल्यानंतर ५ मि. मि. जाडीमध्ये हातात येतील तेवढ्या पिशव्या घ्याव्या. तळाकडील १ इंच भाग सोडून त्यावरील बाजूस दोन किंवा तीन पंच मारावे. पंच साधारण पंचिंग मशिनने (कागदाचे) ज्या साईजचे भोक पडेल

तेवढेच असावे. त्यापेक्षा मोठे अथवा लहान नसावे. लाकडाच्या फळीवर अंदाजे २० पिशव्या ठेवून पंचला हातोडीने ठोकावे. एक पंच झाल्यावर एका पिशवीस दोन भोके पडतात. असे दोन ते तीन पंच मारावे. पंच मारण्याचे कारण मुळांना ऑक्सिजन मिळतो. पंच मारून झाल्यावर पिशवी उघडून त्यात माती+वाळू+खत+जिवाणू यांचे मिश्रण अंदाजे १ ते १.२५ किलोचे भरावे. पिशवी तोंडाकडून १ इंच मोकळी ठेवावी. पिशव्या भरल्यानंतर १ मीटर सरळरेषेत वाफ्यात सरळ मांडून घ्याव्यात. १ मीटर रुंद व लांबी आवश्यकतेनुसार जागेच्या उपलब्धीवर ठेवावी. दोन वाफ्याच्या मध्ये कमीत कमी दोन फूट अंतर ठेवावे. कारण बऱ्याच वेळा पिशवी हाताळावी लागते. पिशवी भरुन वाफ्यात लावून झाल्यावर चारी बाजूने दाबून पिशवी उभी राहिल. अशी माती लावून घ्यावी. पिशव्या उन्हातच असाव्यात. पिशव्यांवरती कोणत्याही झाडाची सावली असता उपयोगी नाही.

**बियाणांची निवड व लागण :-**

पिशवीत लागण करतेवेळी प्रथम मऊ संपूर्ण पाला असलेले कोवळे ऊस बियाणे आणावे. ९ महिन्याच्या आतील किंवा २० डोळयांच्या आतील बियाणे नसावे. ऊस सोलून झालेनंतर शार्पकटरने कांडी तोडावी. बऱ्याच जातीच्या ऊसाच्या कांड्या ६ इंच किंवा त्याहून लांब असतात. त्यासाठी डोळ्याच्या दोन्ही बाजूस १-१ इंच अशी तीनच इंचाची कांडी करावी. बाकीचा मधील भाग कापून टाकून द्यावा. शक्यतो डोळ्याच्या खालील कांडीचा जास्त भाग घेता येईल का? हे पहावे. डोळे कांडी तयार झालेनंतर औषध प्रक्रिया(जर्मीनेटर व बुरशीनाशक बावीस्टीन) मध्ये अर्धातास बुडवावी. हे करत असताना डोळे तपासावे. डोळे नसणारी व कठीण डोळा तसेच वाड्याकडील अगदी लहान डोळा लागणीस घेवू नये. एक बाद डोळा आपल्या हातातून पिशवीत गेला तर एक पिशवी बाद होते. व त्यासाठी घेतलेले कष्ट व खर्च वाया जाते. हे लक्षात घ्यावे.

कांडीचे डोळे निवडून औषध प्रक्रियेसाठी वापरताना डोळे तपासावेत व बाद कांडी फेकून द्यावी. नंतर डोळे पिशवीत भरण्यासाठी पाटीतून पिशव्यांच्या वाफ्याजवळ द्यावेत. पिशवीत कांडी घालताना कांडी उभी न करता आडवी ठेवावी व रुतवावी. त्यावर थोडी माती टाकावी. कांडी आडवी ठेवताना आपला अंगठा डोळ्यावर असू द्यावा. म्हणजे कांडी आडवी लागून डोळा व्यवस्थित बसला असे लक्षात येईल. दुसरा फायदा असा की, ज्या कांडीस डोळा नाही अशी कांडी पिशवीत जाऊ शकत नाही. कांडी पूर्ण मातीत मुजली किंवा २/३ इंच वर राहिली तरी चालते. डी डोळा काढत असताना कांडी चिंबलेली पिकवलेली वापरु नये.

हे काम फार शांतपणाने करणे गरजेचे असते. यात कोणताही शारिरीक त्रास होत नाही. तसेच गडबड करुन उरकण्याच्या नादाला लागू नये. सातव्या दिवसापासूनच आपल्याला डोळे फुगलेले ऊंच कोंब आलेले दिसू लागतात. २० दिवसानंतर डोळे उगवले नाहीत तर असे डोळे काढून तपासावे. ज्या डोळ्यांना मुळे असतात पण डोळा असत नाही, अशी कांडी टाकून पुन्हा भरावी. खतामुळे मातीत असलेले तण सुद्धा उगवण्यास सुरवात होत असते. प्रथम पाणी घालून दुसऱ्या दिवशी चिमटीने तण काढण्यास सुरुवात करावी. पाऊस नसेल तर पुन्हा पाणी घालावे. पिशवीत पाणी सांडू देवू नये. यासाठी पाणी झारीने मारावे.

**आणखी घ्यावयाची काळजी :-**

१. सदरच्या रोपांना कोणतेही खत घालू नये. खते द्यावयाची असल्यास मायक्रोन्यूट्रीअंट टॉनिकची फवारणी प्रथम द्यावी नंतर डि. ए. पी. १ किलो, झिंक सल्फेट १०० ग्रॅम फेरस सल्फेट, १०० ग्रॅम १० ली. पाण्यात आदल्या दिवशी मिसळून ठेवावे. त्यात १ ली. पाणी वापरुन फवारणी करावी.

ऊस रोपे तयार झाले पासून ४५ ते ६० दिवसात शेतात लावली पाहिजेत. पिशवीतील शेतात लागण करणे पूर्वी पिशवीत पाणी पाजून पिशवी उचलून शेतात न्यावी. पावसाळी ओल असेल किंवा नसेल तर शेत भिजवून घ्यावे. या ओल्या चिखलात पिशवी काढून गठ्ठा मातीसह जमिनीत पुरावा. शक्यतो रोपे ५ पानावरच असतानाच लागणीस घ्यावीत. थोडे थोडे खुडून कापून रोपे लावावीत. रोपे लागण करताना दोन रोपणातील अंतर कमीत कमी दोन फूट जास्तीत

जास्त तीन फूट असावे. ही लागण सर्व सरी लागणीस परवडणार नाही. सरी आड सरी ५० % पट्टा किंवा २ चालू १ बंद, जोड ओळ पद्धत ३०% पट्टा पद्धत उपयुक्त आहे.

एकरी सर्वसाधारण ५ हजार डोळे लागतात. त्यामध्ये एकरी १५०० ऊस लागतात. २ टन ऊस बचत होते. चालू पिक काढण्यास किंवा लागण करण्यास गडबड करावी लागत नाही. ज्या दिवशी सर्व पिशव्या लावून झाल्या त्या दिवशीच सर्व लागण उगवली हे गृहित धरण्यास हरकत नाही. पिशवीत ऊस डोळे भरले तो दिवस म्हणजे लागण तारीख होय.

माझा स्वत:चा अनुभव माझ्या शेताच्या बाबतीत असा आहे की, बऱ्याच वेळा शेतात दुसऱ्यांदा ऊस सांधावा लागला. लागणीपेक्षा ऊस साधणे खर्च जास्त येत होता. तरी सुद्धा शेतात ऊसाची डाकी असणारच. दुसरी गोष्ट ऊसाची संख्या मर्यादित असून दर ऊसाचे वजन इतर वर्षापेक्षा दुप्पट होते. दरवर्षी वर्षभर भरीचे ऊस काढून संपत नव्हते.

तेरा ओझी म्हणजे अंदाजे ७०० किलो वजनाचे ऊस गेले. एका रोपास सरासरी १६ ऊस मिळाले. दरवर्षी ज्या क्षेत्रात टनेज सरासरी ३५ टन होते. त्याच क्षेत्रात यंदा लोकरी मावा येवून सुद्धा ५५ टन ऊस निघाला. बाकी सर्व पद्धत खते देणे व पाणी पाजणे इतर ऊसासारखेच. फायदा असा की, पहिल्या खताचा हप्ता वाचला.

पिशवीत माती, ऊस बियाणासाठी आवश्यक असते. शेणखत ऊस उगवणीसाठी, वाफसा तयार करणेसाठी ऊसाला खाद्य म्हणून उपयुक्त असते. पिशवीत वाळू आवश्यक, कारण त्यामुळे पाण्याला निचरा आणि मुळाची संख्या दुप्पट होते.

**पारंपारिक व एक डोळा लागण यातील फरक**

| पारंपारिक पद्धत | एक डोळा पद्धत |
|---|---|
| १) लागणीसाठी लागणारे बियाणे ऊस कांडी सरासरी १४००० | १) एक डोळा यासाठी लागणारे बियाणे सरासरी ५०००(एक डोळा कांडी) |
| २) पारंपरिक पद्धतीत ऊस लगणीपासून पाणी व खत द्यावे लागते. | २) एक डोळा लागणीसाठी सुरवातीची दोन पाणी व सुरुवातीचे एक खत सुद्धा वाचते. |
| ३) सुरुवातीला भांगलन करावी लागते | ३) सुरुवातीची भांगलन वाचते. |
| ४) तसेच कमी प्रमाणात रोजगार उपलब्ध होतो. | ४) [illegible]साठी जास्ती प्रमाणात रोजगार उपलब्ध करता येतो. विशेषत: तरुणांना पिशव्यातील नर्सरी विकून स्वयंरोजगार मिळवता येत[illegible] |
| ५) पारंपारिक पद्धतीत ऊस उत्पादन अेकरी ४० टन निघते विशेषत: एका ऊसाचे वजन १ किलो असते. | ५) एक डोळा लागणीमध्ये उत्पादन एकरी ५० ते ५५ टन निघते. विशेषत: यामध्ये १ ऊसाचे वजन साधारणपणे २ किलो असते. |
| ६) उदा. एकरी १४,००० कांडी × ३ डोळे यापासून १ किलोचा १ऊस निर्माण होतो.(एक एकरामध्ये) म्हणजे एकरी ऊसाचे वजन ४२००० किलो याचा अर्थ एकरी ४२ टन उस. | ६) उदा. एकरी ५००० डोळ्यांची लागण यातून प्रत्येकी ५ फूटवे म्हणजे ५००० × ५ = २५००० ऊस म्हणजे १ उस २ किलोचा याप्रमाणे २५००० ऊसाचे ५०००० किलो वजन. याचा अर्थ एकरी ५० टन ऊस. |

एक डोळा लागण यापासून स्वयंरोजगार व रोजगार उपलब्ध होतो. तसेच येथून पुढे येणारी नवीन व्हरायटीची एक डोळा लागण पद्धती वापरुन त्यापासून मिळणारे उत्पन्नातून आपण ऊस लागणीत क्रांती घडवून आणू शकतो.

# पुष्परचना :- अभिरुचीसंपन्न जीवनशैलीचा अविष्कार

- कु. मंजुषा जाधव
बी. एस्सी. भाग २



पानाफुलांची कलात्मक रेखाबंद रचना करणे म्हणजे 'पुष्परचना'! पुष्परचनेंमुळे गृहशोभा वृध्दिंगत होते व माणसाची क्रियाशिलता आणि उत्साह वाढतो. पुष्परचनेचा अभ्यास, तिचे निरीक्षण व रसग्रहण यातून सौंदर्याविष्कारांची अनूभूती येते. पुष्परचना करताना शैलीदारपणा आणि प्रमाणबद्धता ह्या वैशिष्ठ्यांचा अभ्यास होतो आणि त्यात अभिरुचीचा वापर जीवनात मानवाला चांगला उपयोगी पडतो. निसर्गसान्निध्याची गोडी लागते. घरातील वातावरण प्रसन्न होते. पाने, फुले, गवत यांच्या निरीक्षणामुळे घरातील आबालवृध्दांचे निसर्गप्रिम वाढते. व्यक्तिविकास उत्तम होण्यास यामुळे मदत होते.

पुष्परचना ही अभ्यासपूर्वक आत्मसात करण्याची कला आहे. सततच्या सरावाने व नाविण्यपूर्ण कल्पकतेने त्यात प्राविण्य मिळवता येते. एका सुंदर पुष्परचनेने बैठकीच्या खोलीचे रुपच पालटून जाते. जेवणाच्या टेबलावरील सुबक पुष्परचनेमुळे सुगृहिणीच्या पाककृती अधिक रुचकर लागतात. पुस्तकांच्या कपाटाच्या कोपऱ्यात एक छोटेसे कळीवजा फूल आणि नाजूकसं पान याची चिमुकली रचना सर्वांना आकर्षित करते. व्यासपीठावर टेबलावर केलेल्या कौशल्यपूर्ण रचनेला रसिकांची दाद मिळते. लग्नसमारंभ, व्यासपीठ, हॉटेल्स, ऑफिस, घरातील कानेकोपरे, फ्रीज अशा सर्व ठिकाणी सुंदर पुष्परचनेची प्रसन्नता आणता येते.

पुष्परचनेच्या कलादालनात प्रवेश केल्यावर एखादा नवशिका फुलापानांची कलाकुसर पाहून थक्क होतो. त्या लहानमोठ्या पुष्परचनेत वापरलेले दुर्मिळ साहित्य पाहून भांबावून जातो. 'इतके सगळे साहित्य वापरुनच पुष्परचना करायची असते का ?' असा त्याला प्रश्न पडतो. पण साध्या सहज मिळणाऱ्या साहित्यातून सुंदर पुष्परचना करता येते.

वेगवेगळ्या भांड्यांचा आपल्याला फुलदाणी म्हणून वापर करता येतो. तांब्याचे ताम्हण पसरट थाळी, परात यातही पुष्परचना करता येणे शक्य आहे. पिन होल्डर मध्यभागी ठेवावा किंवा चिकनमेश (कंपाऊंडला वापरण्यात येणारा तारेचा पडदा) बसवलेली वाटी मधोमध ठेवावी. त्यात समतोल रचना करता येते. ती थाळी किंवा परात चौरंगावर किंवा बैठकीवर ठेवून त्यात तिरकी किंवा झुलती रचना करता येते. ताम्हणात पाणी घालून कृष्णकमळाची किंवा जास्वंदीची फु ले तरंगती ठेवावीत. त्यांना शोभेच्या पानांचे कोंदण बसवावे.

पितळी डब्यात गोलाकार रचना करता येते. जाई जुईच्या कळ्यांनी लगडलेल्या फांद्या, शतावरीच्या फांद्या किंवा जर्बेरा

अगर शेवंतीची मोठी फुले घालून आकर्षक रचना करता येते.

पितळी परडीत रचना खुलून दिसेल. परडीचा काठ जाळीचा किंवा लहान असेल तर परडीत मध्यभागी वाटी ठेवून तिच्यात पाणी भरुन फूले पाने रचावीत.

पितळी भांड्याच्या सोनेरी रंगाला लाल गुलाब, ॲस्टर, केशरी झेंडू, जर्बेरा यासारखी फुले खुलून दिसतात. तांब्याच्या तांबूस लाल रंगाबरोबर पांढरी कॅन्डीटफ्ट, जांभळा ॲस्टर, काळपट लाल किंवा लाल गुलाब उठून दिसतात.

संगमरवरी पोळपाटावर काळ्या रंगाचे मापटे ठेवून किंवा लहान घंघाळ वापरुन सुंदर रचना करणे शक्य आहे. मोठ्या घंघाळासारख्या भांड्यात काष्ठशिल्प बसवून लिली किंवा ग्लॅडिओची अगर रजनीगंधाची फूले मिसळून बसवावीत. पाम्स किंवा मनीप्लांन्टची मोठी पाने वापरल्यास ही रचना समारंभासाठी मांडता येईल.

चांदीचा कलश, अभिषेकपात्र, ताम्हण यात लक्ष्मी पूजनासारख्या प्रसंगी वैभवशाली पुष्परचना करता येईल. काठवाला पितळी ट्रे किंवा थाळीमध्ये निसर्गदृष्य निर्माण करता येईल.

काचेच्या बाटल्यांचे आकार व रंग पाहून त्यात फु ले लावण्याचा मोह कोणालाही होतो. ऊंच, अरुंद तोंडाच्या बाटलीत एस आकाराची होगार्थ पद्धतीची रचना करता येईल. हिरव्या बाटलीत पिवळी, पांढरी, शेंदरी फुले रंगाचा सुंदर मिलाप जमवतात. गवताचे तुरे रचनेत परिपूर्णता आणतात. जुन्या वाड्यातील रंगीत हंडीत किंवा शिंकाळ्यात टांगती रचना करता येईल.

काचेचे छोटे सट, फळांचे मोठे सट, रंगीत ग्लासेस, पाण्याचे ग्लासेस याचीही फुलदाणी म्हणून वापर करणे शक्य आहे. काचेची किटली, दूधाचे भांडे, साखरेचे भांडे एका ट्रेमध्ये ठेवून त्याच्या आकारमानाप्रमाणे फुलापानांच्या तिहेरी रचना करुन सुंदर परिणाम साधता येईल. चिनिमातीच्या बरण्या, सट ह्यांचे मळकट, पिवळा, चॉकलेटी रंग असतात. त्यात गडद रंगाची फुले, केशरी जर्बेरा, लाल गुलाब, गुलबक्षी, डेझीचे तुरे लावता येतात. मोठ्या लोणच्याच्या बरणीत वाळवलेली पानकणसे , गवताचे तुरे, वाळलेल्या वेलीची वेटोळी वापरुन सुकलेली पुष्परचना करता येईल.

मातीच्या फुलदाणीत पाण्याचा उभा ग्लास बसवून झुकलेली रचना करता येते. मातीच्या सुगडांना काळा रंग लावून, वर पांढरे ठिपके देवून बटनशेवंती किंवा मिनिएचर ॲस्टर लावून रचना करता येईल.

अलिकडे प्रदर्शनात मिळणाऱ्या नाजूक वेताच्या परड्या किंवा टोकऱ्यांमध्ये सुकवलेले गवत, रंगविलेले गवत, ऑरगंडीची फुले वापरुन टिकणारी रचना करता येईल.

शंख शिंपले ही सागरातील रत्ने, चंदनाची फुले, डेझी, जांभळी शेवंतीसारखी फुले वापरुन नाजूक रचना करता येईल. शंखांना थोडा बैठकीचा आधार दिला की शंखशिंपले जास्त रेखीव दिसतात. अशा आगळ्यावेगळ्या फुलदाण्या आपल्या घरात असतात. वेगळ्या फुलदाण्या आणायला नकोत.

सणावारांना दारात केळीचे खांब उभारायचे, रांगोळ्या रेखायच्या ह्या पारंपारिक पद्धती आहेत. त्या बरोबर त्या त्या सणाला साजेशी पाने, फुले, फळे यांचा वापर करुन पुष्परचना केल्यास थोडा वेगळेपणा येईल. ही केलेली पुष्परचना म्हणजे त्या गृहिणीच्या कल्पकतेची साक्षच !

गुढी पाडवा, चैत्र शुद्ध प्रतिपदेने नवीन वर्षाची सुरूवात होते. गुढीवरील गडूचा फुलदाणी म्हणून वापर करावा. ॲस्टर, ग्लॅडिडिओ, गुलाब यासारखी पांढरी फुले वापरावीत. कडुलिंबाच्या कमानदार फांद्या वापरुन रचना करावी. बैठकीसाठी सुरेख खण उभारावा. फुलदाणीजवळ वाटीत साखरेची माळ ठेवावी.

'अक्षयतृतीया' साडेतीन मुहुर्तातील एक मुहूर्त असल्याने या सणाचे महत्व फार! यावेळी रणरणत्या उन्हामुळे रुक्ष

वातावरण हे ड्राय अरेंजमेंटसाठी योग्य आहे. परडीत वाळलेली अंबाडीची लाल फुले, स्टॅटिसची पांढरी पिवळी फुले, गवत वापरून सुंदर रचना करता येते. तांबडी ग्लॅडिओली किंवा लाल गुलाब वापरुन पर्णहिन सुबक फांद्यांबरोबरीची रचनाही छान दिसेल.

मंगळागौरीला पावसाच्या सरींनी वैशाखवणवा कमी झालेला असतो. मंगळागौरीसमोर परातीत तरंगती फुलांची रांगोळी काढावी किंवा मंगळागौरीच्या चौरंगाच्या चारी कोपऱ्यात बाटलीत ग्लॅडिओली, निशिगंध किंवा गोल्डन रॉडसारख्या फुलांच्या रचना उभ्या बाटलीत भरुन वेगळेपण साधता येईल.

नारळीपौर्णिमेला शहाळी फेकून न देता सुकवून, वाळवून फुलदाणीसाठी वापरावीत. डेलीयाची छोटी फुले व सुरूची पाने वापरुन रचना करावी. झेंडूची शेंदरी, पिवळी फुले या फुलदाणीत उठून दिसतील. बैठकीलाही नारळाच्या झाडाच्या सालीचा सुबक तुकडा काढून वापरावा. त्यावर पिवळी शेंदरी राखी ठेवावी.

गणपतीच्या कलशामध्ये मोठ्या दुर्वांचे जुडगे वेगवेगळ्या लांबीचे लावावेत. लाल गुलाब , ग्लॅडिओली कलशात ठेवावीत. गणपतीच्या प्रिय केवड्याच्या पानांचा ताम्हणात पंखाकृती आकार करावा. समोर ३ किंवा ५ गुलाब वेगवेगळ्या उंचीचे लावावेत. त्यावर नारळ व सुपारी ठेवावी.

दसऱ्याला एखाद्या उभट फुलदाणीत आपट्याच्या झाडाच्या कमानदार फांद्या लावाव्यात. त्यामध्ये झेंडूची फुले लावावीत. हिरव्यागार बाटलीत झेंडूची फूले शोभिवंत दिसतात.

कोजागिरीला काळ्याभोर फुलदाणीमध्ये पांढरी फुले गुलाब डेझी सारखी फुले वापरावीत. एकेरी तगर, अमर अनंताच्या कमनीय फांद्या वापराव्यात. फिकट हिरवी पाने रचनेला शोभा आणतात.

दिवाळीनिमित्त चौरंगावर फुलांचा गालिचा काढावा. गालिच्याभोवती पणत्यांची आरास करावी. तसेच चौरंगावर तपेल्यामध्ये किंवा कळशीमध्ये ग्लॅडिओली व निशिगंधाची फुले, पाने वापरुन रचना करावी. चौरंगाशेजारी समई ठेवली तर रचना जास्त औचित्यपूर्ण वाटेल.

होळीला एखादे ड्रिफ्टवूड घेवून मागे ग्लास ठेवावा. त्यात सुंदर ग्लॅडिओली किंवा दोन तीन गूलाब ठेवावेत. कडेला पानांची रचना करावी. ग्लास ड्रिफ्टवूडच्या मागे झाकून ठेवावा किंवा छोटा ग्लास लाकडाच्या ढपल्यांनी झाकून त्यात जिंजर फ्लॉवर किंवा लाल जर्बेरासारखी फुले ऐटबाजपणे लावावीत.

असे हे आपले सणवार ज्याने त्याने आवडीच्या पानाफुलांचा वापर करून पुष्परचनेच्या माध्यमातून साजरे केले तर घरातील वातावरणात जास्त प्रसन्नता येईल.

वाढदिवसाला गडद रंगाची फुले वापरुन रचना उभी, पसरट किंवा गोलाकार करावी. पुष्परचनेशेजारी आकर्षक कागद गुंडाळून भेटवस्तू किंवा ग्रिटिंगकार्ड ठेवावे.

पार्टीमध्ये फुलदाणीच्या बाजूला पिवळी केळी, शेंदरी संत्री, तांबडी सफरचंद यांची उतरंड ठेवावी. काळी द्राक्षे, चिकूसारखी फळे, फळांच्या रंगात आणखी भर घालतील.

ज्याप्रमाणे माणसे प्रसाधने वापरुन आपले सौंदर्य खुलवितात. तसेच पुष्परचनेमुळे घराचे सौंदर्यही वाढते. पुष्परचना पाहून मन प्रसन्न होते.

आसमंतात पसरलेल्या रमणीयतेने माणसाच्या कल्पकतेला आव्हान दिले आणि त्यातूनच कलात्मक पुष्परचनांची निर्मिती झाली. ज्या प्रकृतीने आपल्याला सर्वकाही इतके भरभरुन दिले तिच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करायला पुष्परचना हे सुंदर साधन आहे.

पुष्परचना केवळ सजावट नाही तर सौंदर्यवादी, अभिरूचीसंपन्न जीवनशैलीचा एक प्रसन्न अविष्कार आहे!

# मराठी विभाग

२००२-२००३



हे असे आहे तरीही
हे असे असणार नाही
दिवस आमुचा येत आहे
तो घरी बसणार नाही.

हे खरे की आज त्यानी
घेतले सारेच ठेके
पण उद्याचा सूर्य काही
त्यामुळे फसणार नाही.

- सुरेश भट

- विभागीय संपादक -

**प्रा. सौ. शोभना रैनाक**

**प्रा. सौ. मानसी लाटकर**

# अनुक्रमणिका

## गद्य विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| ◆ सावज अनामिका | कु. रईसा शेख | बी.कॉम.२ | २९ |
| ◆ सर यू आर डिफरन्ट | विक्रांत म. शेटेनावर | बी.कॉम.१ | ३१ |
| ◆ पर्यावरण आणि मी | सूर्यकांत विलासराव काळे | एम.ए. २ | ३५ |
| ◆ गोध्रा व गुजरात : शोध व बोध | सचिन पाटील | बी. एस्सी.२ | ३८ |
| ◆ जागतिकीकरण आणि खुली अर्थव्यवस्था | दादासाहेब पाटील | बी. कॉम. ३ | ४१ |
| ◆ संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान | भारत देसाई | बी. एस्सी.२ | ४३ |
| ◆ शेतकऱ्यांना लुटणारे आधुनिक सरकार | डी. डी. पाटील | बी. एस्सी. २ | ४५ |
| ◆ स्वराज्याचा सेनापती :- हंबीरराव मोहिते | कु. अर्चना मोहिते पाटील | बी. ए. ३ | ४७ |
| ◆ शिक्षणाचे भगवेकरण | कु. अनिता जाधव | बी. ए. ३ | ५० |
| ◆ एकतर्फी प्रेम | कु. सुषमा सुतार | बी. ए. ३ | ५२ |
| ◆ ऐतिहासिक वारसा लाभलेले कराड शहर | किशोर पाटील, किरण पाटोळे श्रीकांत गोतपागर, सुजित डूबल | बी. ए. २ व ३ | ५४ |
| ◆ जाहिरात आणि स्त्रीप्रतिमा | कु. सुनिता पाटील | बी. ए. २ | ५६ |
| ◆ स्त्रीगीतांचे गुप्तधन | किशोर पाटील | बी. ए. २ | ५८ |
| ◆ साहित्य संमेलनाकडून माझ्या अपेक्षा | कु. माधुरी मोरे | बी. एस्सी. २ | ६० |


## पद्य विभाग


- जीवन म्हणजे....कु. जयमाला गायकवाड...५७
- माय-माऊली....सुरेश इंगळे....६३
- पण....कु. शर्मिला पाटील....६३
- प्रीत ...गोरखनाथ शेगर....६४
- माघार घेऊ नकोस....दिनेश सावंत....६५
- भारत माझा आहे....हेमंत लक्ष्मण पोळ ....६६
- आठवणी....झिमरे अमोल तानाजी ....६६
- येणार आहेस तर... अमिता रणभिसे...५९
- बेकारी....श्रीकांत पाटील....६३
- विरह....राजू गायकवाड.... ६३
- सखा माझा आला....कु. रईसा शेख....६४
- व्हॅलेंटाईन आला....शरयू पाटील....६५
- दुरावा....अमोल कदम....६६


## - कनिष्ठ विभाग -

## गद्य विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| ◆ गजल बादशाह : सुरेश भट | कु. प्रियंका चन्ने | १२ वी कॉमर्स | ६८ |
| ◆ जिवलग मैत्री | प्रशांत ढबू | ११ वी कॉमर्स | ७० |
| ◆ साने गुरूजी :- थोर साहित्यिक | संदिप देसाई | ११ वी सायन्स | ७१ |
| ◆ स्त्री :- सामाजिक शक्ती | कु. शर्मिला कदम | ११ वी सायन्स | ७२ |


## पद्य विभाग


- तू निघून गेल्याचं दु:ख नाही ..अमित गंगवणे ....७३
- कर्मवीर गीत....कु. आस्मा सुतार....७४
- मैत्री.....संदिप देसाई....७५
- दु:ख .....अमित गंगावणे.....७६
- उपकार....अमोल माने....७४
- सांग सांग भोलानाथ....विक्रम कुंभार....७५
- प्रेम म्हणजे काय.....अमोल माने .....७६

# सावज अनामिका



- कु. रईसा शेख
बी.कॉम. भाग २

राजधानी एक्सप्रेसने नुकताच वेग घेतला होता. रेल्वेच्या पहिल्या डब्यात काही व्यक्ती झोपल्या होत्या . काही पेंगत होते, काही गप्पा-गोष्टी करत होते तर काही हसत होते. त्यापैकी एक होते मेजर रणजित सिंह.

मेजर रणजितसिंह वय ४० सहाफूटउंच, बांधेसूद निमगोरा रंग, डोक्यावर पगडी, ओठावरची पिळदार मिशी, हनुवटीवर दाढी. त्याचे एकूण व्यक्तिमत्त्व प्रभावी, रुबाबदार व भारदस्त होते. मेजरसाहेबांना जम्मू-काश्मीर मध्ये अतिरेक्यांना पकडताना धाडसी कृत्य केल्याबद्दल भारत सरकारतर्फे वीरचक्र प्रदान करण्यात आले होते.

मेजर आपल्या अंगाभोवती शाल गुंडाळून शांतपणे मांडीवर ठेवलेले पुस्तक वाचत होते. गाडीच्या वेगाबरोबर पळणारी झाडे, डोंगर, गावे, गार वारा, डब्यातील लोकांच्या गप्पागोष्टी, हसणे-बोलणे याकडे मेजरचे लक्ष नव्हते. ते पूर्णपणे वाचन करण्यात मग्न झाले होते. पहिले स्टेशन आले गाडी हळूहळू थांबू लागली. कोणाची उतरण्याची तर कोणाची चढण्याची धावपळ होत होती.

पहिल्या डब्यात २५ वय असणारी एक सुंदर स्त्री चढली. साडेपाच फूट उंच,रंग गोरा, लांबसडक काळेभोर केस, भुवया कोरलेल्या चेहऱ्यावर हलका मेकअप खुलून दिसत होता. गळ्यात सोनसाखळी होती, कानातील कर्णफुले त्यातील चमचमत्या हिऱ्यामुळे चमकत होती. तिने पंजाबी ड्रेस घातला होता. ती सुशिक्षित घराण्यातील स्त्री वाटत होती. तिच्या खांद्याला पर्स अडकवलेली होती. तिचं एकूण व्यक्तिमत्त्व प्रभावी होते.

मेजरबरोबरचे सगळे प्रवासी उतरले. त्या डब्यात मेजरऐवजी कोणीच नाही हे पाहून त्या स्त्रीच्या चेहऱ्यावर समाधान उमटले. परंतु मेजरचे तिच्याकडे लक्षच नव्हते. ते वाचनात मग्न होते. डब्यात फक्त दोघेजण होते. आपल्या व्यतिरिक्त डब्यात इतर कोणी आहे याची जाणीवही मेजरसाहेबांना नव्हती.

गाडीने पहिले स्टेशन सोडले. संध्याकाळ होत आलेली गाडी स्टेशनपासून काही दूर अंतरावर गेल्याची जाणीव होताच तिने विचारले. "कोठून आलात?"

मेजरसाहेबांनी तिच्याकडे न पहाताच तुटक पणे उत्तर दिले, "....काश्मीर...."

कुठे जाणार? तिने पुन्हा प्रश्न केला. "..अं..अं..पंजाब..." मेजर म्हणाले.

संध्याकाळ झालेली गाडीत दिवे लागले, ह्याचा फायदा घेवून तिने आधीच सलगी साधण्याचा प्रयत्न केला होता.

संध्याकाळची वेळ, डब्यातील एकांत व मेजर साहेबांना एकटे पाहून तिने संधी साधली व आपल्या पर्समधून चाकू हातात घेवून ती मेजरसाहेबांच्या समोरच्या बाकावर बसलेली उठली व त्यांच्यासमोर येवून उभी राहिली. तरीही मेजरचे तिच्याकडे लक्ष नव्हते. ती ओरडली, "मेजर....तुमच्याजवळ असतील त्या चीजवस्तू माझ्या स्वाधीन करा..."

तिची त्या वस्तू प्राप्त करण्यासाठीची हिंसक भूमिका तिच्या परखड शब्दातून स्पष्ट होती. तिचा अशा प्रकारचा व्यवहार, चाकू, हावभाव पाहून मेजर गडबडले. पण मन स्थिर ठेवून ते शांत राहिले. मेजर काही बोलेनात व काहीच प्रतिसाद येत

नाही असे दिसल्यावर ती पुन्हा म्हणाली, "....मेजर असेल ते मुकाट्याने द्या नाहीतर..." मेजर अत्यंत शांत स्थितीत तिच्याकडे फक्त पहात होते. मेजरकडून काहीच प्रतिक्रिया व्यक्त केली जात नाही. असे दिसल्यावर ती संतापली. दात ओठ खात मेजरसाहेबांना तिने परखड शब्दात धमकावले. "....मेजर जर तुम्ही माझी मागणी मान्य केली नाही तर मी तुम्हाला बदनाम करेन. तुम्ही माझ्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला असा आरोप करेन."

मेजरसाहेबांची अशी नकारात्मक प्रतिक्रिया पाहून शेवटी तिने चाकू पर्समध्ये ठेवला. स्वतःच्या हाताने स्वतःचे केस विस्कटले, कपडे फाडले, अंगावर ओरबडल्यासारखे केले व डब्यातील चेन ओढली. चेन ओढताच गाडी थांबली. गाडी थांबल्यानंतर गाडी का थांबली? कशासाठी थांबली? असे प्रश्न मनात घेवून काही प्रवासी, तिकीट चेकर पहिल्या डब्याजवळ एकत्र जमा झाले.

त्या डब्यातील दृश्य बघणाऱ्यांसाठी धक्कादायक होते. त्या स्त्रीची अवस्था तिचा आक्रोश, आरडाओरडा, डब्यातील एकांत ही सर्व परिस्थिती पहाता लोकांनी घडलेल्या घटनेचा अंदाज लावला. "मेजरसाहेबांनी माझ्या एकटेपणाचा फायदा उठवण्याचा प्रयत्न केला" असे ती स्त्री ओरडून ओरडून सांगत होती. प्रत्येक व्यक्तीने त्या स्त्रीवर विश्वास ठेवला. प्रत्येकजण मेजर साहेबांना दोषी मानत होता. मेजर साहेबांचे धाडसी कृत्य त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची प्रशंसा करणारे त्यांच्याकडे पहात होते. प्रत्येक व्यक्तीची नजर त्या स्त्रीकडे सहानुभूतीची होती. मेजर निर्दोष असल्याचे सांगण्याचा त्यांनी स्वतः खूप प्रयत्न केला पण त्यांचे कोणीही ऐकून घ्यायला तयार नव्हते.

"मेजरसारखा देशाचे रक्षण करणारा एक स्वातंत्र्यसैनिक एका स्त्रीचे रक्षण करण्याऐवजी तिच्या एकटेपणाचा फायदा घेण्यासारखे खालच्या दर्जाचे कृत्य करतो ही किती लाजीरवाणी गोष्ट आहे." असा आरोप संतप्त जमावातील एका व्यक्तीने परखडपणे केला. "मी निर्दोष आहे. माझी काही चूक नाही, मी..." असे पुन्हा पुन्हा मेजर सांगत होते पण काही केल्या त्यांचे एकही व्यक्ती ऐकून घ्यायला तयार नव्हते. प्रत्येकाचा मेजरकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलला होता. प्रत्येक व्यक्ती



त्यांच्याकडे घृणा आणि द्वेषाने पहात होती. प्रत्येक जण त्या स्त्रीची बाजू घेत होता. "याला गाडीतून हाकलून द्या, याला गाडीत बसण्याचा काही एक हक्क नाही....मारा...असे म्हणत जमावातील काही लोक मेजरवर धावून आले. त्या संतप्त जमावापैकी एका व्यक्तीने मेजरसाहेबांच्या अंगावरील शाल खेचून काढली. शाल ओढल्यानंतरचे दृश्य पाहून डब्यातील संतप्त जमावात एकच शांतता पसरली. प्रत्येक व्यक्ती आपल्या जागेवर खिळूनच स्तब्धपणे उभी होती. जणू त्यांच्या पायाखालील जमीनच सरकली होती. एकाच्याही डोळ्याच्या पापण्या हालत नव्हत्या की तोंडातून शब्द फुटत नव्हते. हे दृश्य हृदयाला खिळवून ठेवणारे होते जणू प्रत्येकाच्या हृदयावर धारदार शस्त्राने आघात केल्यासारखे होते. हे दृश्य इतके चित्तथरारक होते की जणू शरीरातील सर्व रक्त एकाजागी येवून गोठले आहे की हृदयाचे ठोके चुकले आहेत की मेंदू काम करण्याचा थांबला आहे. अशा अवस्थेत प्रत्येक व्यक्ती होती व थक्क होवून प्रत्येकजण मेजरकडे पहात होता. ज्या स्त्रीने मेजरवर बलात्कार केल्याचा आरोप केला होता, ती स्त्री तर हे चित्तथरारक दृश्य पाहून इतकी थरारली की ती क्षणातच जागेवर बेशुद्ध होवून पडली.

दोषी ठरलेल्या याच मेजरनी जम्मू-काश्मीरवर झालेल्या हल्ल्यात आपले दोन्ही हात अतिरेक्यांशी सामना करताना गमावले होते.



# सर यू आर डिफरन्ट

- विक्रांत म. शेटेनावर
एफ.वाय.बी.कॉम

मित्रांनो, आपणास महाभारत, रामायण ह्या सारख्या गोष्टी जवळपास सर्वांनाच ज्ञात आहेत. त्यातूनच आपणाला हेही माहीत झाले की पूर्वीच्या काळी शिक्षण घेण्याकरिता गुरूकुल पद्धत अस्तित्वात होती. त्या गुरूकुल पद्धतीतील शिक्षण ही त्या काळाची गरज होती. यातील शिष्य गुरूंच्या मार्गदर्शनानुसार जीवनात यशस्वीच वाटचाल करीत होते. याचप्रमाणे आजही प्रत्येकाच्या जीवनात प्रत्येक वाटेवर जीवनातली यशस्वी वाट चालण्याकरिता गुरूवर्यांची आवश्यकता असते. याबाबतीतच हा माझा छोटासा पण माझ्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा प्रसंग वा अनुभव तुमच्यासमोर स्पष्ट करीत आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मनी असते, की आपल्या जीवनातही कॉलेजचे शिक्षण हवे. पण प्रत्येकाच्या जीवनात असे घडतेच असे नाही. कारण शिक्षण घेण्यातही भरपूर फरक आहे. कारण काही विद्यार्थी विद्यार्थिदशेतच जगाच्याबरोबर जाण्याचा प्रयत्न करतात. पण यातही जगाच्या मागे राहणारे सुद्धा भरपूर जण आहेत. हे पळपुटे विद्यार्थी शिक्षणाचा काहीच महत्त्व देत नाहीत आणि नंतर स्वत:च्या जीवनाला दोष देत बसतात. अशावेळी यासारख्या विद्यार्थ्याकडे कोणतेही शिक्षक अथवा गुरू लक्ष देत नाहीत. कारण ते अशा विद्यार्थ्याच्याकडून अपेक्षाच ठेवत नाहीत. हे सगळं तुम्हाला सांगण्याच कारण काहीसं असंच होत.

मी ही असाच जीवनात भरकटलेला एक विद्यार्थी होतो. आपल्या सर्वांप्रमाणेच संपूर्ण शिक्षण घेण्याचे मीही स्वप्न पाहत होतो पण या शिक्षणासाठी आवश्यक एवढे प्रयत्न मी कधीच करत नव्हतो. माझीही तुम्हाप्रमाणेच इ. १ली पासून शिक्षणाची वाटचाल सुरू झाली. इ. ९वी पर्यंतचे शिक्षण कोणतेही वर्ष वाया न घालविता घेतले होते. इ. १० वीला ही प्रवेश मिळाला. इ. १० वी म्हणजे बोर्डाची परीक्षा. पण त्या वर्षी मी कधीच या गोष्टीत काळजीपूर्वक वागलो नाही. कारण त्या परीक्षेचे फारसे महत्त्व काही माहीत नव्हते. फक्त त्यावेळी पुढील वर्षी आपण कॉलेजचे शिक्षण घेणार या विचाराने खूश होतो. आणि मित्रांसोबत त्यातील स्वप्नही रंगवत होतो. पण या परीक्षेसाठी आवश्यक असणारा अभ्यास करण्याचा प्रयत्न मात्र करीत नव्हतो. त्या निष्काळजीपणातच मी इ.१०वी ची बोर्डाची परीक्षा दिली. शेवटी घडायचे तेच घडले.

याचा अर्थ असा की इ. १०वी तील एकूण ७ विषयापैकी त्यातील ३ विषयात मी उत्तीर्ण होऊ शकलो नाही. कारण त्या ३ विषयात उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असणारा अभ्यासच मी मन:पूर्वक केलेला नव्हता. या परीक्षेचा निकाल हातात घेताक्षणी खूप वाईटही वाटले होते. पण या गोष्टीवर त्यावेळी काहीच इलाज नव्हता. त्यासोबत पुढील वर्षही वाया जाणार हेही निश्चित झाले होते.

या निकालानंतर तर मी अधिकच शिक्षणाच्या बाबतीत निष्काळजी वागत होतो. या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी मी ऑक्टोबर परीक्षेचा फार्म भरला. परीक्षाही दिली. पण त्यावेळी ३ विषयापैकी २ विषयात अनुत्तीर्ण ठरलो. पुन्हा पुढील मार्च परीक्षेचा फार्म भरला. परीक्षाही दिली. पण यावेळी थोडसं उलट म्हणजे २ विषयापैकी १च विषयात उत्तीर्ण झालो. म्हणजे हेही वर्ष पुढील शिक्षणासाठी वायाच गेलं आणि कॉलेज शिक्षण



घेण्यासाठी इ. १०वीत सर्व विषयात पास होणं आवश्यक होत. त्यासाठी नाइलाजास्तव पुन्हा पुढील वर्षातील ऑक्टोबर परीक्षेचा फॉर्म भरला. या परीक्षेत शेवटच्या राहिलेल्या १ विषयात उत्तीर्ण झालो. या परीक्षेच्या निकालावरून माझ्या निष्काळजीपणाचा कळस दिसून येतो. यामुळे माझी एकूण २ वर्षे वाया गेली.

या घडलेल्या गोष्टींतून माझ्या मनात त्यावेळी बोचणारे दु:ख म्हणजे लहानपणापासून माझ्यासोबत असणारे मित्र कॉलेजला जाता-येता पाहत होता व या मित्रांतील चारचौघांच्या गप्पांच्यावेळी त्यांचे कॉलेजमधील अनुभव ऐकत होतो. पण मनाला बोचणारे हे दु:ख इ. १०वी तील सर्व विषयात उत्तीर्ण झाल्यावर थोडसं कमी झाले होते. त्यानंतर पुढील कॉलेज शिक्षण घेण्याचे ठरविले. पण कॉलेजमध्ये मला प्रवेश मिळणे हे शक्य नव्हते. कारण मी कमी गुणवत्तेतून रीपीटर म्हणून इ. १०वी विद्यापीठ परीक्षा फ्रेश म्हणून इ. १०वी विद्यापीठ परिक्षा दिलेले विद्यार्थी माझ्यासोबत स.गा.म.कॉलेज मध्ये प्रवेश अर्ज भरणार होते. माझ्याकडे इ. १०वी च्या निकालाचे एकूण ४ सर्टिफिकेटस् आणि गुणवत्ता ही कमी या दोन्ही गोष्टी माझ्याकडे लज्जास्पद होती. माझ्यापेक्षा गुणवत्तेतून अधिक असणारे व फ्रेश म्हणून विद्यापीठ परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थांनाच कॉलेज शिक्षणातील प्रवेशाच्या अडचणी मी पाहत होतो. कारण तेथील प्रवेशसुद्धा गुणवत्तेनुसार होते.

या माझ्यासमोर घडलेल्या घटनेमुळे मी पुढील कॉलेज शिक्षणासाठी असलेली आशाच सोडली होती. शेवट त्यावेळी मी ठरविले की शिक्षण मिळणे कठीण आहे. तर एक व्यावसायिक बनण्याची इच्छा ठेवून टू व्हिलर मेकॅनिकल म्हणून एका वर्कशॉपमध्ये कामाला लागलो. दिवसा कामावर जाणे व संध्याकाळी फिरण्यात वेळ घालविणे हाच माझा दैनंदिन कार्यक्रम बनला होता.

पण असेही म्हणतात की सुबह का भुला शाम को जब घर आता है तो उसे भुला नही कहते। आणि नेमके हेच माझ्या जीवनात घडले. मला कॉलेज शिक्षण घेण्याची खूप इच्छा होती. पण त्यासाठीचे माझे सर्व प्रयत्न असफल होत होते. त्यावेळी माझ्या जीवनाला कलाटणी देणारे माझ्या वडिलांचे खास मित्र स.गा.म. कॉलेजमधील अध्यापक असणारे माझे गुरूजी.श्री. प्रा. धुमाळ सर मला भेटले. त्यांनी माझ्या मनातील कॉलेज शिक्षणासाठीची धडपड जाणली. स्वत:च्या जीवनात काहीतरी चांगले करून दाखविण्याचे ध्येय मी समोर ठेवलेले होते. हे प्रा. धुमाळ सरांनी अंतर्गत ओळखले होते.

ज्याप्रमाणे एक लोहार लोखंडाच्या तुकड्याला योग्य आकार देतो त्याप्रमाणेच सरांनी जीवनात निष्काळजीपणाने वागणाऱ्या विद्यार्थाला योग्य त्या वाटेवर आणण्याचा प्रयत्न केला. आपल्या मित्राचा मुलगा म्हणजे तो आपलाच मुलगा समजून मला स.गा.म. कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याचा सल्ला दिला. पण मला आलेल्या कॉलेज प्रवेशात येणाऱ्या अडचणींची खंत मी व्यक्त केली. त्यावेळी सरांनी मला वैयक्तिक लक्ष घालून कॉलेजमध्ये प्रवेश देण्याची खात्री दिली. यासाठी मी लगेचच कॉलेजचा प्रवेश अर्ज ही भरून दिला. त्यावेळी ही माझ्यापेक्षा अतिशय चागंल्या गुणवत्तेतील विद्यार्थांना माझ्यासोबत अर्ज भरला होता. त्यांचे गुणपत्रक पाहिल्यावर मी पुन्हा कॉलेज प्रवेशात मागे पडणार असे मनोमनी वाटू लागले.

अखेर थोड्याच दिवसात स.गा.म. कॉलेजमध्ये इ. ११वी कॉमर्स विभागात प्रवेश मिळालेल्या विद्यार्थांची प्रवेश यादी लावण्यात आली. त्या यादीत माझ्या नावाची खात्री करताना शेवटच्या यादीत का असेना पण माझे नाव होते. मी लगेचच प्रवेश पावतीही भरली. साधारण त्यानंतर ८ दिवसात कॉलेज रीतसर चालू झाले. ना कुणाची ओळख ना पारख सगळ्याच गोष्टी नवीन होत्या.

तरीही माझ्या घरातील माणसांनासुद्धा माझ्या शिक्षणाच्या बाबतीत अविश्वास होता. या साठी सर्वांनी मला कॉलेज शिक्षण बंद करण्याचाही सल्ला दिला. पण मला पुढील शिक्षणासाठी सरांचे व माझ्या मित्रांचे मिळालेले प्रोत्साहन एवढे मजबूत होते की कुणीही काहीही करू शकले नाही. सरांचा तर माझ्यावर एवढा विश्वास होता की हा विद्यार्थी यापुढे जीवनात जरूर यशस्वीच वाटचाल करणार. हा त्यांचा विश्वास त्यांनी माझ्या घरातल्यांच्या समोरही मांडला व त्यांनाही गप्प बसविले.

एकीकडे इ. ११ वी कॉमर्स विभागात मिळालेला प्रवेश तेथील मित्रांचा सहवास त्या सर्वांचा अभ्यासातील आधार या सर्वांमुळे माझा वाढलेला आत्मविश्वास यातून माझ्या अभ्यासाची प्रगती वाढत गेली. तर दुसरीकडे दुपारनंतर मेकॅनिकल बनण्यासाठी वर्कशॉपला ही जात होतो.

इ. ११वी कॉमर्स विभागाचे कॉलेज चालू होते. थोडाफार विषयांचा अभ्यास समजत होता. इ. ११वी ची सहामाही-वार्षिक परीक्षाही दिली. इ. ११वी मध्ये मी ठेवलेली गुणवत्तेची अपेक्षा जेमतेम ४० टक्केच होती. पण हीच बाजू पलटली. केलेल्या कष्टाचे फळ मिळाले. कारण मला इ. ११वी त मिळालेली गुणवत्ता ५९ टक्के होती. माझे मलाच भरपूर आश्चर्य वाटले. इ. १० वीत ४० टक्केहून गुणवत्तेत कमी व रिपीटर म्हणून असलेला विद्यार्थी इ. ११ वी कॉमर्स विभागात ५९ टक्के ची गुणवत्ता धारण करतो. याचा अर्थ असा स्पष्ट होतो की जीवनात रस्ता भरकटलेला विद्यार्थी आत्ता योग्य रस्यावर येण्यास तयार झाला आहे. हा निकाल जेव्हा सरांना कळाला. त्यावेळी त्यानीही व इतर विषयाच्या शिक्षकांनी ही माझ्या या प्रयत्नांचे कौतूक केले. या कौतुकातून मला आणखी प्रोत्साहन मिळाले.

पुन्हा सरांनी कॉलेज पुढे चालू ठेवण्याचा सल्ला दिला. पुढील वर्ष हे बोर्डपरीक्षेचे होते इ.१२ वी चे कॉलेज ही चालू असल्यामुळे माझा भरपूर प्रमाणात अभ्यासावर ताण पडत होता. अखेर डिसेंबरच्या दरम्यान इ. १२ वी च्या विद्यापीठ परीक्षेचा फार्म भरला. इ. ११ वी व इ. १२ वी त या वर्कशॉपमुळे कोणत्याही विषयासाठी बाहेरील क्लासेस करता आले नाहीत. त्यामुळे सगळ्या विषयांचा अभ्यास कॉलेजमधील शिक्षकांच्या शिकवण्यावर होता आणि त्यामानाने सर्व विषयांचे शिक्षक ही भरपूर चांगले शिकवत होते.

इ. १२ वी विद्यापीठ परीक्षेचा फॉर्म भरतेवेळी जीवनात एकच ध्येय मनात ठेवले होते ते म्हणजे इ. १०वीत अनुत्तीर्ण होवून त्यामध्ये उत्तीर्ण होण्यासाठी निष्काळजीपणाने घालविलेले २ वर्ष हा एक कलंक लावल्यासारखा वाटत होता आणि तो पुसून काढण्यासाठी इ. १२ वी ची विद्यापीठ परीक्षा चांगल्या गुणवत्तेतून उत्तीर्ण होणे महत्त्वाचे होते. कॉलेज चालू असतानाच या विद्यापीठ परिक्षेचा अभ्यास जास्त प्रमाणात वेळ देवून शिक्षकांकडून घेतलेले मार्गदर्शन व मित्राकडून मिळालेली मदत यातून सर्व विषयाचा अभ्यास जाणून घेण्याचा प्रयत्न करीत राहिलो. तरीही अभ्यासाला वेळ कमीच पडत होता. कारण दिवसभरातला सकाळचा वेळ कॉलेजसाठी जात होता. तर दुपारचा सगळा वेळ वर्कशॉपसाठी जात होता. अशा तऱ्हेने फक्त संध्याकाळचा शिल्लक वेळ अभ्यासासाठी उपयोगात आणत होतो. रात्री ८ नंतर शिवाजी स्टेडियमवर शांत अशा ह्या ठिकाणी अभ्यासास जात होतो. तेथेही माझा खास मित्र अभ्यासास येत होता. त्यानेही अभ्यासाच्यावेळी भरपूर मदत केली.

सरांची व माझी जेव्हा भेट घडत होती त्यावेळी ते मला आवर्जून अभ्यासाच्या बाबतीत विचारत होते. एकदा सरांना माझी वर्कशॉपमुळे होणारी अभ्यासाची अडचण समजली. त्यावेळी सरांनी मला असेही सांगितले की बोर्ड परिक्षेच्या १ महिना अगोदर जितका वेळ अभ्यासासाठी देता येईल तितका देणे आणि वर्कशॉपला जाणे पूर्ण बंद ठेवणे. सर हा सल्ला देण्यापर्यंतच थांबले नाहीत तर त्यांना माझ्याकडून तशी कृतीही करून घेतली. त्यानंतरच मला या बोर्ड परीक्षेला अभ्यास करण्यास भरपूर वेळ मिळाला होता.

अखेर फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात बोर्ड परीक्षेस सुरूवात झाली. केलेल्या अभ्यासाप्रमाणे त्या त्या विषयाचे पेपर

माझ्या आत्मविश्वासावर सोडवत गेलो. परीक्षा वेळापत्रकाप्रमाणे ६ विषयांचे पेपर सोडवले. अखेर परीक्षा ही संपली. कॉलेज बंद झाले होते. सर्व मित्रही भेटायचे बंद झाले होते.

लगेचच मी बंद केलेले वर्कशॉपवर जाणे चालू केले. दिवसभर खूप कंटाळा येत होता. पहिल्याप्रमाणेच दिवसभर कामावर जाणे आणि संध्याकाळी फिरण्यात वेळ घालविणे हा दिनक्रम ठरला.

असाच हा काळ चालला असताना परिक्षेनंतर दोन महिन्यानी बोर्ड परिक्षेचा निकालाची तारीख उजाडली. लगेचच सर्वांचीच आठवण झाली. आमचा हा निकाल त्या दिवशी दुपारी ३ नंतर मिळणार होता. दुपारी कॉलेजमध्ये गेल्यावर पाहतोय तर काय! जवळजवळच सगळेच माझे मित्रही निकालाच्या बाबतीत काळजीतच होते. माझाही निकाल हातात मिळेपर्यंत मी ही इ. १०वी नापास झालेला विद्यार्थी इ. १२वी कॉमर्स विभागातून बोर्ड परीक्षा उत्तीर्ण झालो असेन ह्याची आशाच सोडली होती. मी हा निकाल आणावयास जावे की न जावे ह्या काळजीतच होतो.

थोडा वेळ मीही विचार करीत होतो. जर मी या परीक्षेत उत्तीर्ण झालो असेन तर काहीच प्रश्न नव्हता. पण जर अनुत्तीर्ण असेन तर माझ्यासमोर प्रश्नच प्रश्न होते की सरांना याबाबतीत काय सांगावे. त्यांनी केलेली मदत, माझ्याकडून सरांनी ठेवलेल्या अपेक्षा अशाच व्यर्थ जाणार. मला अभ्यासात वेळोवेळी मदत केलेले मित्र काय म्हणतील या सर्व प्रश्नांना मला उत्तर देणेच शक्य नव्हते.

कॉलेजमध्ये निकाल घेण्याच्या रांगेत उभारून हा सर्व विचार मी करीत होतो. त्यावेळीच मी एक निर्णय घेतला की ही परीक्षा उत्तीर्ण असेन तर पुढील विद्यापीठ शिक्षण जरूर घेणे. पण जर पुन्हा अनुत्तीर्ण असेन तर पूर्ण शिक्षणच बंद. जीवनातील वर्ष वाया घालवून शिक्षण घेण्यात काहीच अर्थ नव्हता. ह्या सर्व विचारात मी कधी त्या टेबलाजवळ आलो. हे माझे मलाच कळले नाही. तोपर्यंत सर्व मित्रानी एकमेकांना निकालाच्या शुभेच्छा देत होते. माझ्या पुढील विद्यार्थ्यांच्यात यांच्या चेहऱ्यावर उत्तीर्ण निकालाचे हास्य दिसत होते. मनातल्या भीतीमध्येच मी रिसीट दाखविले व नंबर ही सांगितला. माझ्या ही मनात काही वेळ विचित्र दहशतच निर्माण झाली होती.

तेवढ्यात मला निकाल हातात देण्याअगोदर माझ्यासमोर उभ्या असणाऱ्या सरांनी मला पेढेच मागितले. त्याक्षणीच माझ्या मनातील दहशत व त्यामुळे डोक्यावरील आलेले ताण अचानक कमी झाला. माझ्या हातात निकाल पडताच एक मृत जीवाला संजीवनी मिळताच पुनर्जीवित व्हावा त्याप्रमाणेच माझी स्थिती झाली होती. त्याक्षणी झालेला आनंद हा मी आजपर्यंत कुणालाही सांगू शकलो नाही. सर्व ६ विषयात प्रत्येकी १०० पैकी ५५ ते ६० गुणांची सरासरी करून ५५ टक्क्यांनी मी ही परीक्षा उत्तीर्ण झालो होतो. या माझ्या आनंदात माझे मित्रही सामील झाले.

त्याक्षणी सरांनी केलेल्या मदतीची आठवण येवून माझे डोळे भरून आले होते. त्यावेळी सरांची भेट घेणे अत्यंत महत्त्वाचे होते. पण सर त्यावेळी कॉलेजवर नव्हते. म्हणून मी त्यांच्या घरी गेलो.

जरी प्रत्येक विद्यार्थी ह्या परिक्षेचा पहिला पेढा देवापुढे ठेवत असला तरी तो मी मानाचा पहिला पेढा प्रा. धुमाळ सरांचे तोंड गोड करून त्यांच्या चरणस्पर्शाचा आशीर्वाद घेवून केला होता. त्यावेळीपासून मलाही हा विश्वास पटला की खरच मी जीवनातील यशस्वीच वाटचाल करीत आहे आणि यापुढे ही यशस्वी होण्याचा विश्वास आला.

आत्ता माझ्या मित्रांसोबत मी स.गा.म. कॉलेजमध्ये एफ.वाय. कॉमर्स विभागाचे शिक्षण घेत आहे आणि वर्कशॉप.... ही चालू आहे. माझ्या मते प्रत्येकाला प्रा. धुमाळ सरांसारखे गुरू भेटावेत व जीवनात योग्य दिशा न मिळालेल्या विद्यार्थांना पुन्हा योग्य दिशा मिळावी हीच मनपूर्वक ईश्वरचरणी प्रार्थना.

# पर्यावरण आणि मी



**सूर्यकांत विलासराव काळे**
एम.ए. भाग २

वृक्षवल्ली आम्हा सोयरे ! वनचरे !

तुकाराम महाराजांनी १७ व्या शतकात सांगितलेले हे तत्त्वज्ञान आज ही मानवाला उमगलेले नाही. निसर्ग हा मानवाचा मित्र आहे. उपकारकर्ता आहे. परंतु मानवाने स्वत:च्या तात्पुरत्या फायद्यासाठी निसर्ग प्रवृत्तीच्या विरोधात जाऊन स्वत:ला विनाशाकडे नेण्याचा मार्ग निर्माण केला आहे. आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, निसर्गाचा समतोल बिघडून मानवापुढे 'पर्यावरण प्रदूषण' हे आव्हान उभे राहिले आहे.

एकविसाव्या शतकात ज्या काही अनेक संकटांना मानवाला तोंड द्यावे लागणार आहे. त्यात सर्वात मोठे संकट पर्यावरणावर होणाऱ्या परिणामापासून निर्माण होणार आहे. मानवाची आर्थिक उन्नती गरजेची असली तरी आपले जीवन अधिक समृद्ध व सुखकर करण्यासाठी मानवाने जमीन, पाणी वनस्पती, हवा व प्राणी यांचा वापर इतक्या वेगाने आणि मोठ्या प्रमाणावर केला की, त्यामुळे पृथ्वीवरील पर्यावरणाचा समतोल मोठ्या प्रमाणात ढासळला आहे. एवढेच नव्हे तर खुद्द मानवाचे जीवन हे रोगग्रस्त, प्रदूषणग्रस्त आणि भू-भौतिक आपत्तिग्रस्त झाले आहे.

जैविक व अजैविक घटकांच्या परस्पर संबंधाच्या अभ्यासातून विसाव्या शतकाच्या सुरुवातीला परिस्थिती-कीशास्त्र निर्माण झाले. तथापि या शतकामध्येच वाढती लोकसंख्या, शहरीकरण, औद्योगिकरण, बेसुमार जंगल- तोड, शेतीसाठी व मानवी वसाहतीसाठी रूपांतरित होणारे जंगलक्षेत्र, जमीन व पाणी यांचा मनाप्रमाणे वापर अनियंत्रित गुरेचराई, रसायने व रासायनिक घटकांचा भरपूर वापर, जंगली व इतर प्राण्यांची अनिर्बंध हत्या, नव्या-नव्या तंत्रज्ञानाच्या साह्याने परिसंस्था व तिची साखळी उद्ध्वस्त करण्याची प्रवृत्ती, आर्थिक लोभामुळे होणारे समाजव्यवस्थेतील बदल, यासारख्या कारणांमुळे सजीव सृष्टी, मानव आणि पर्यावरण यामधील संतुलन पूर्णपणे मोडकळीस आले आहे. जगातील प्रत्येक देशात व देशातील प्रत्येक भागात पर्यावरणाचा ऱ्हास झाल्याचे दिसून येते.

आज जगात सर्वत्र रासायनिक क्रांती होत आहे. अणुशक्तीचा वापर वाढलेला आहे औद्योगिकरणामुळे मानवाला अपायकारक अशी हजारो रसायने बाहेर फेकली जातात त्यातील काही रसायने वातावरणातील ओझोनच्या थराला अपायकारक ठरली आहेत तर काही रसायनांनी प्रत्यक्ष जीवसृष्टीस हानी पोहचून काही जीव नष्ट झाले आहेत.

अवकाश मंडलात फक्त पृथ्वी या ग्रहावरच जीवसृष्टीला अनुकूल असे वातावरण आहे. पृथ्वीचे तापमान, उष्णता, मुबलक प्रमाणात प्राणवायू आणि शुद्ध पाण्याचा साठा यामुळे पृथ्वीवर जीवसृष्टी आस्तित्वात आहे. पण गेल्या शतकाच्या उत्तरार्धापासून प्रगतीच्या नावावर वेगवेगळे लहानमोठे कारखाने सुरू झाले. त्यामधून बाहेर पडणाऱ्या उत्पादनाकडे फक्त लक्ष दिले गेले पण या कारखान्यातून हजारो अपायकारक प्रदूषके

(उदा. कार्बनडाय ऑक्साईड, कार्बन मोनोक्साईड, सल्फरडाय ऑक्साईड) बाहेर पडत असताना तिकडे दुर्लक्ष करण्यात आले. वाढत्या औद्योगिकरणामुळे विषारी, दूषित, उत्सर्जित द्रव्ये आणि विषारी वायू ह्यांची प्राणवायूशी रासायनिक क्रिया होऊन उपलब्ध प्राणवायू कमी होतो. त्याचा अनिष्ट परिणाम पर्यावरणावर पर्यायाने मानवी जीवीतावर होतो.

सरकारी आकडेवारीनुसार भारतात २३ टक्के जमिनीवर जंगले आहेत. पर्यावरण दृष्ट्या देशाच्या एकंदर भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के क्षेत्र वनांखाली असले पाहिजे. वनांमुळे पावसाचे प्रमाण वाढून जमिनीची धूप थांबते. त्याचप्रमाणे सूर्यकिरणांची उष्णता जमिनीवर पोहचेपर्यंत १० टक्के नी कमी होते. प्रकाशाची प्रखरताही वृक्षाच्छादित जमिनीवर पोहचेपर्यंत ५० ते ६० टक्के नी कमी होते. उन्हाळ्यात वनक्षेत्र आसपासच्या वनरहित प्रदेशापेक्षा थंड असते तर थंडीच्या दिवसात उबदार असल्याचे जाणवते. कारखान्यातील उर्जेसाठी तसेच घरगुती सरपणासाठी खैर, बाभूळ, ऐन, शिरीष, नीम, करंज, हिरडा यासारख्या वृक्षांचा वापर केला जातो. याकरिता मोठ्या प्रमाणावर जंगलतोड झाली व होत आहे. १९७३ मध्ये उत्तरप्रदेश सरकारने झाडांचा लिलाव करण्याचे ठरविले त्यासाठी सशस्त्र पोलिसासह, कत्रांटदार आले. त्यावेळी शेकडो स्त्री-पुरूषांनी झाडांना मिठी मारली. येथेच सुंदरलाल बहुगुणा यांच्या नेतृत्वाखाली 'चिपको' या पर्यावरणावादी चळवळीचा



जन्म झाला. परंतु आजमितीला देखील मोठ्या प्रमाणावर जंगलतोड सुरू आहे. नवीन वृक्षालागवड न करता त्या जमिनीवर सिमेंटची जंगले उभारली गेली. यामुळे पर्यावरण समतोलावर अनिष्ट परिणाम होत असून अनिश्चितता, दुष्काळ, महापूर, जमिनीची धूप या समस्या जंगलतोडीमुळेच निर्माण झाल्या आहेत.

अलीकडील काळात इंधन म्हणून लाकूड, कोळसा डिझेल, रॉकेल, पेट्रोल यांचा अतोनात वापर केला जातो. इधनांच्या ज्वलनामुळे हवा, धूळ, धूर व रासायनिक वायू बाहेर पडून हवेचे प्रदूषण होते. हवेतील कार्बनडाय ऑक्साईड चे प्रमाण वाढून तापमान वाढत आहे. भारतामध्ये शेती, वहातूक व कारखाने यासाठी लागणाऱ्या उर्जेपैकी ६६ टक्के उर्जा याच साधनापासून मिळवली जाते. शिवाय थर्मल पॉवर स्टेशन कापड उद्योग, सिमेंट इ. मोठे .उद्योग सुद्धा याच उर्जा स्त्रोताचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात.

लोकसंख्येत झालेल्या भयावह वाढीमुळे त्याच प्रमाणात अन्नधान्य उत्पादन वाढविणे क्रमप्राप्त झाले. जमिनीत कृषी उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात रासायनिक खते व कीटकनाशकांचा वापर सुरू केला. यामुळे कृषी उत्पादन तर वाढले परंतु इतर दुष्परिणाम जास्त जाणवत आहेत. रासायनिक खते पाण्यात विरघळणारी असल्याने ती झिरपत जाऊन दीड ते दोन मीटर खोलीवर जातात. त्यामुळे मातीतील क्षार, हवा, पाणी, जीवजंतू यांचे चलनवलन बंद होते. आणि शेतजमिनीचा सुपीकपणा नष्ट होत आहे. कीटकनाशके कीटकांचा नाश झाल्यावर लवकर नष्ट होत नाहीत ती जमिनीत साठून राहतात व पाण्याबरोबर सभोवती पसरली जातात. बऱ्याच वेळा हे विषारी घटक अन्नकणामधून व पाण्यातून मानवाच्या व इतर प्राण्यांच्या शरीरात प्रवेश करतात. त्यामुळे गंभीर आजार उद्‌भवतात प्रसंगी मृत्यूही येतो.

गती तेथे आवाज या तत्त्वानुसार आगगाड्या मोटार, विमानांचे आवाज, गिरण्यांचे कर्णकर्कश भोंगे, कारखान्यातील

यंत्रांचा खडखडाट, शिट्या, घंटाचे आवाज, रेडिओ आणि दूरदर्शनवरील संगीत, टेलिफोनच्या कॉल्सचे आवाज असे कितीतरी आवाज मनुष्य सहन करीत आहे. साधारणतः ८५ डेसिबल इतका आवाज मनुष्य सहन करू शकतो त्यापेक्षा जास्त आवाज बराच काळ कानावर आदळला तर त्याचे दुष्परिणाम मनुष्यावर जाणवायला लागतात. मोठ्या आवाजामुळे श्रवणशक्ती कमी होते. दमा, हृदयविकार, रक्तदाब इ. आजार होतात तसेच गर्भवती स्त्रियांच्या गर्भावरही अनिष्ट परिणाम होतात.

पाणी हे जीवन आहे. पृथ्वीतलावावरील जेवढे एकूण उपलब्ध पाणी आहे. त्यापैकी साधारणपणे ९७.२ टक्के पाणी समुद्रात आहे. २.१५ टक्के पाणी दोन्ही ध्रुवांवर असून ते बर्फ स्वरूपात आहे. उरलेल्या पाण्यापैकी ०.३४ टक्के पाणी भूगर्भात खूप खोलवर आहे. म्हणजेच उपलब्ध पाण्यापैकी ९९.६९ टक्के पाणी मानव उपयोगात आणू शकत नाही. उरलेले उपलब्ध ०.३१ टक्के पाणी मानवी उपयोगात आहे ते नदी, नाली, तळी, विहिरी या स्वरूपात आहे. एकंदरीत अतिशय अल्प साठा मानवी उपयोगात आहे. तरीही पाण्याचे महत्व आपण समजू शकलेलो नाही. कारखान्यातील सांडपाणी, रसायनमिश्रित पाणी वा टाकाऊ पदार्थ त्यांच्या अशुध्द व घातक स्वरूपात, कोणतीही प्रक्रिया न करता तसेच नदी प्रवाहात किंवा समुद्रात सोडली जातात. कोल्हापूर आणि औरंगाबाद ही याची ज्वलत उदाहरणे आहेत. गंगा नदीच्या किनाऱ्यावर असलेल्या तेल कारखान्यातून गंगेत वाहून गेलेले तेल-मिश्रित पाणी पेटून गंगेला ऑक्टोंबर १९७३ मध्ये आग लागल्याचा अजब प्रकार घडलेला आहे.

हवा ही मानवाची मूलभूत गरज आहे. हवेशिवाय सजीव जगूच शकत नाही. शुद्ध हवेमध्ये प्राणवायू २१ टक्के नत्र वायू ७८ टक्के आणि ०.०३ टक्के कार्बनडाय ऑक्साईड, बाष्प व इतर वायू असतात. इतर वायूंचे प्रमाण जेवढे वाढते तेवढे प्राणवायूचे प्रमाण कमी होते. यालाच हवा दूषित झाली असे म्हणतात. अशा हवेत मानव सतत वावरल्यास रक्तातील हिमोग्लोबीन कमी होते. दमा, सर्दी, कॅन्सर, फुफ्फुसाचे आजार, होऊ शकतातत. बेशुद्धि व प्रसंगी मृत्यूही होऊ शकतो. धूर आणि धुके यांचा संयोग होऊन धुके (स्मॉग) तयार होतो त्याचा अनिष्ट परिणाम म्हणजे रबरी, कातडी वस्तू खराब होणे, कपड्यांना भोके पडणे, इमारती चित्रे विद्रूप होणे असा होतो. याचे बोलके उदाहरण म्हणजे ताजमहाल होय स्मॉग मुळे ताजमहल दिवसेंदिवस काळवंडत आहे. असे पाहणीत आढळून आले आहे. ३ डिसेंबर १९८४ ला झालेल्या भोपाळ येथील युनियन कार्बाईड कंपनीच्या वायू-गळती दुर्घटनेत मिथील आयसोसायनेट या विषारी वायूचा अंतर्भाव होता. हा वायू हुंगण्यामुळे फुफ्फुसाचा दाह होऊन तीन हजार व्यक्ती मरण पावल्या तर १० हजाराहून व्यक्तीना अंधत्व, श्वसनविकार, त्वचेचे रोग झाले.

जीवनात आपणास प्रत्येक गोष्टीची किंमत मोजावी लागते. मागील काळात केलेल्या वेगवान प्रगतीमुळे मानवाला जीवनातील उत्तम व दर्जेदार राहणीमान प्राप्त झाले परंतु आता पर्यावरणाच्या ऱ्हासाने त्याची किंमत मोजण्याची वेळ आली आहे. यासाठी प्रत्येकाने स्वतः पासून सुरूवात केली पाहिजे. उत्साहाने प्रदूषणाशी सामना केला पाहिजे कारण आपण वेळेत जागे झालो नाही तर आपणास व भावी पिढीस जगणे अशक्य होईल.

उद्याच्या पिढीच्या उज्ज्वल भविष्यासाठी आज संयम बाळगायला हवा!

# गोध्रा व गुजरात : शोध व बोध

**सचिन पाटील**
एस. वाय. बी. एस्सी

कृष्णाच्या भूमीत रामाच्या नावाने
जाळली जातायत बायका आणि मुलं
साबरमतीच्या काठावर होतोय
पुन्हा एकदा महात्म्याचा खून
एकही अश्रू येत नाही
हे राम !

गुजरात मध्ये निर्लज्ज पद्धतीने हिंसाचार घडवून आणण्यात आला. त्यामुळे जगासमोरील भारताची प्रतिमा डागाळली आहे. शांततेचा दूत असणाऱ्या महात्मा गांधींच्या राज्यात हिंसेने थैमान घातले, यासारखी लांछनास्पद घटना नाही.

२७ फेब्रुवारीला गोध्रात साबरमती एक्सप्रेसच्या ५६ या डब्याला आग लावण्याचे अमानुष कृत्य काही मुसलमान समाजकंटकांनी केले. त्यामध्ये एकूण ५८ जण आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. गोध्रा अग्निकांड हे पूर्वनियोजित होते का नव्हते हा प्रश्न वेगळा आहे. परंतु ते का झाले याच्याकडेही डोळेझाक करून चालणार नाही.

रेल्वे सुरक्षा दलाच्या अहवालानुसार राममंदिराच्या शिलान्यासाच्या मुहूर्ताआधी पूर्णाहुती यज्ञासाठी देशभरातून अनेक कारसेवक अयोध्येला आले होते. कारसेवकांचा लोंढा गुजरातमधल्या विविध भागातून निघाल्यापासूनच प्रवासात आक्रमक हिंदुत्ववादी घोषणा, मुस्लिमांवर 'जय श्री राम' म्हणण्याची जबरदस्ती, मुस्लिम स्त्रियांचा अवमान, स्टेशनवर हुल्लडबाजी, चहाचे पैसे नाकारणे यातून ताणतणाव वाढले होते. अगदी २५ फेब्रुवारीला अयोध्येच्या 'जनमोर्चा' या वृत्तपत्रात या हुल्लडबाजीविषयी वृत्तही छापून आले होते.

२७ फेब्रुवारीला सकाळी ७.४२ ला साबरमती एक्सप्रेस गोध्रा स्टेशनवर आली व काही तात्कालिक कारणांमुळे गोध्रा अग्निकांड घडून आले. या अग्निकांडात जे घडले ते लांछनास्पद तर होतेच, परंतु त्यानंतर गुजरातमध्ये जे घडले ते मानव्याला, हिंदू धर्माला आणि अखिल भारताच्या अस्मितेला काळिमा फासणारे होते. गुजरातमध्ये जे घडले त्याला कुणीही दंगल म्हणूच शकत नाही. ते एक प्रकारचे हत्याकांडच होते. कारण दंगली एकाच बाजूने होत नाहीत. दंगलीमध्ये हल्ला-प्रतिहल्ला या दोन्ही गोष्टी असतात. हत्याकांडात मात्र एकाच बाजूने हल्ले होतात. दोघांनी केली तर ती मारामारी आणि एकानेच दुसऱ्याला मारले तर ती मारहाण असते म्हणून गुजरातमध्ये जे घडले ते हत्याकांडच होते.



या हत्याकांडात २००० पेक्षा जास्त लोकांना मारले गेले. २५०० लोक बेपत्ता झाले आहेत. सव्वा लाख लोक विस्थापित झाले आहेत. हजारोंच्या संख्येने घरे, दुकाने, हॉटेल्स, फॅक्टरीज जाळण्यात आली, शेकडो मशिदी, दर्गे उद्‌ध्वस्त करण्यात आले आहेत. जवळजवळ ७२०० कोटी रुपयांच्या मालमत्तेचा चुराडा झाला आहे.

अहमदाबादमधल्या मरोडा पटिया या एकाच वस्तीतील ९१ लोकांना जिवंत जाळण्यात आले. या अगोदरच्या अनेक दंगलीत मालमत्ता जाळण्याचे प्रकार घडले पण गुजरात हत्याकांडात मात्र जिवंत माणसे जाळून मारण्याचा प्रकार घडला. गर्भवती स्त्रीचे पोट फाडून त्यातला गर्भ तलवारीच्या टोकाने वर उचलून आपटून मारण्यासारखा माणुसकीला काळिमा फासणारा दुसरा प्रकार कुठला असेल? दुसऱ्या महायुद्धात ज्याप्रमाणे जर्मनीमध्ये नाझींनी ज्यूंविरुद्ध चीड व तिरस्कार व्यक्त केला त्याचप्रमाणे चीड व तिरस्कार गुज़रातमध्ये मुस्लिमांविरुद्ध संघ परिवाराने निर्माण केला.

एवढे मोठे हत्याकांड हे पूर्वनियोजनाशिवाय पार पाडलेच जावू शकत नाही. कारण साधा एक खून करायचा म्हटले तरी त्याचे नियोजन करावे लागते. मग हजारोंच्या संख्येने लोकांना मारायचे तर किती मोठी योजना आखावी लागली असेल? आत्तापर्यंतच्या सर्व चौकशी समितीच्या अहवालामधून एक स्पष्ट होते की, गुजरात हत्याकांड हे अतिशय काटेकोर व नियोजनबद्ध रीतीने घडवण्यात आले आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे बाजारपेठेतील दुकानांची नासधूस करताना किंवा वस्तीतील घरे जाळताना मधेच एखादे दुसरे घर किंवा दुकान बचावल्याचे दिसून आले आहे. ही घरे किंवा दुकाने कुणाची हे माहीत असल्याशिवाय का हे शक्य झाले? या हत्याकांडात सामिल झालेल्या हल्लेखोरांकडे मुस्लिमांची नावे व त्यांच्या मालमत्ता यांविषयी सविस्तर याद्या होत्या. पोलिसही या हल्लेखोरांना सामील होते. पूर्ण हत्याकांडादरम्यान त्यांनी फक्त बघ्याची भूमिका घेत प्रसंगी हल्लेखोरांना मदत केली. अशाप्रकारे रक्षकच भक्षक झाला तर जनतेचे काय होणार? गुजरातमधल्या हत्याकांडाला गुजराती वृत्तपत्रांनीही मोठी साथ दिली. त्यांनी अत्यंत भडक व खोट्या बातम्या छापून वातावरण तापवले. भावना चेतावल्या, केबल टीव्ही मार्फत अफवा प्रसृत केल्या. खोटी प्रक्षोभक पत्रके हजारोंच्या संख्येने छापून वाटली गेली. अशा रीतीने लोकक्षोभ भडकावून आगीत तेल ओतण्याचे काम केले.

मोदींच्या सरकारमधील मोदींच्यासहित अनेक मंत्री हे संघाचे, विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाचे सदस्य असल्यामुळे हेच लोक या हत्याकांडाचे अप्रत्यक्ष नेतृत्व करीत होते व मोबाईलवरून हल्लेखोरांना आदेश देवून माणुसकीचा गळा घोटण्याचे काम करत होते. आज संपूर्ण देशाचे असे नेतृत्वच राहिले नाही. यादव, जाट, मुस्लिम, दलित, ब्राह्मण असे जातीय वादावर आधारलेले नेतृत्व आज निर्माण होत आहे. यांच्याकडे बघून एवढेच वाटते की,

'क्या क्या बनाने आये थे यहाँ<br>
क्या क्या बना बैठे<br>
कहीं मंदिर बना बैठे<br>
तो कहीं मस्जीद बना बैठे<br>
अरे, तुमसे तो अच्छे वो परिंदे<br>
कभी मंदिर पे जा बैठें तो कभी<br>
मस्जीद पे जा बैठे।'

या हत्याकांडामुळे गुजरातमध्ये परस्पर विश्वास नावाची चीजच उरलेली नाही. मनामनाचे तुकडे झालेले आहेत. ते सहजासहजी जोडता येण्यासारखे नाहीत. परंतु या हत्याकांडामुळे विस्कटलेली, दुभंगलेली मने पुन्हा जोडणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. अन्यथा आर.एस.एस.सारख्या देशविघातक संघटना या भयग्रस्त लोकांना की ज्यांचे भविष्य काळ्याकुट्ट अंधारात पुसून गेलेले आहे, त्यांना वेठीस धरुन भारतात आतंकवाद पसरवतील व त्यावेळी आपल्याला शोक व्यक्त करण्याशिवाय काहीही उरणार नाही. त्याचे सुयोग्य उदाहरण म्हणजे २४ सप्टेंबर रोजी अक्षरधाम मंदिरावर झालेला हल्ला. तो हल्ला तेहरिक-ए-कसास या संघटनेने घडवून आणला होता. आणि तेहरिक-ए-कसास या शब्दाचा अर्थच 'अत्याचाराचा बदला' असा आहे.

गुजरात हत्याकांडामध्ये भाजपच्या नेत्यांनी स्वतःचा

स्वार्थ साधलाच परंतु काही हिंदूनीही, की ज्यांना हिंदू धर्माचा अर्थही कळत नाही, अशांनी मुस्लिमांची घरे लुटून स्वतःची घरे सजविली आहेत. काही बड्या हिंदू व्यावसायिकांनी सर्वच्या सर्व झोपडपट्ट्या जाळून तेथील जमिनी काबीज केल्या आहेत. ज्यांना धर्म माहीत नाही तेच धर्म शिकवत आहेत.

'धर्माचे अंतर ज्यांचा प्रांत नाही
तेच बांधत आहेत
माणसामाणसात
मंदिर आणि मशिदीच्या भिंती'

'सकल हिंदू-बंधू बंधू' किंवा 'गर्व से कहो हम हिंदू है' या घोषणांद्वारे हिंदूंच्या हितासाठी त्यांना आम्ही संघटित करत आहोत, असा आव हिंदुत्ववादी आणतात. आज हिंदूंचे म्हणून काही खास प्रश्न आहेत की ज्यांचा विचार केल्यावर मग 'सकल हिंदू हे बंधू बंधू' होऊ शकतात का? हाच प्रश्न पडेल.

स्मगलिंग, मटका, गुन्हेगारी, गुंडगिरी करणारे हिंदू आणि सर्वसामान्य हिंदू यांच्यात कधीतरी बंधुत्व प्रस्थापित होवू शकते काय? शेतमजुराला किमान वेतन नाकारणारे धनदांडगे बागाईतदार आणि तो मजूर हे दोघेही हिंदू असले तरीही बंधू होवू शकतात काय? किर्लोस्कर, गरवारे, हिंदू कामगारांना इतर धर्मियांपेक्षा चार पैसे जास्त देतात काय? असंघटित क्षेत्रातल्या कोट्यावधी हिंदू स्त्री पुरुषांची पिळवणूक करणारे त्यांचे हिंदू मालक त्यांचा 'भाऊ' होवू शकतात काय? दलित जातीतल्या वा शेतमजूर हिंदू स्त्रियांवर बलात्कार करणारे जमीनदार त्यांचे भाऊ असतात काय? स्वतःच्या स्वार्थासाठी भ्रष्टाचार करून जनतेचे पैसे लुटून ऐषआराम करणारे राजकीय अस्तित्वासाठी जनतेला वाईट मार्गाला लावणारे उच्चवर्णीय किंवा इतर हिंदू राजकारणी जनतेचे बंधू होवू शकतात काय? हिंदू शेतकऱ्यांची, ग्राहकांची लुबाडणूक करणारे, भेसळ करणारे, व्यापारी, दलाल आणि सावकार हे हिंदू असले तरी शेवटी हिंदू जनतेचे शत्रूच ठरतात ना?

महागाई, बेकारी इ. प्रश्न या देशातल्या सर्वच लोकांना भेडसावतात. म्हणून त्यांच्या उपाययोजनांसाठी 'धर्मनिरपेक्ष' पायावर जनसंघटन हेच उत्तर आहे.

एखाद्या भावनिक प्रवाहाला लाटेचे रूप देवून तिच्यावर स्वार होवून निवडणूक जिंकता येते, हे मोदींनी पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. परंतु जनतेच्या जीवनावश्यक समस्या जर नीट हाताळल्या नाहीत तर लाटांची जागा आहोटी घेते हा इतिहास मोदींनी विसरू नये.

हिंदू मुसलमान एकत्र आले तर आपल्याला या देशात राहता येणार नाही, हे इंग्रजांनी १८५७ नंतर जाणले. हिंदू मुसलमान वैर निर्माण केले आणि सगळे भारतीय त्याला बळी पडले. आजही हिंदू-मुस्लिम एकत्र आले तर आपल्याला भारतात जगता येणार नाही, हे संघपरिवाराने ओळखले आहे आणि म्हणून ते हिंदू मुस्लिम वैर निर्माण करीत आहेत व आपण त्याला बळी पडत आहोत. आजपर्यंत ज्या ज्या देशात कट्टर धर्मवादास जास्त महत्त्व मिळालेले आहे, त्या देशाचा विकास तर सोडूनच द्या पण अधोगती झालेली आहे. म्हणून आपण हिंदुत्ववाद्यांच्या कट्टरवादाला खतपाणी न घालता विरोध केला पाहिजे. अन्यथा अनर्थ होईल. म्हणून मला कवी साहिर यांची एक कविता आठवते.

'आज अगर खामोश रहे, तो कल सन्नाटा छायेगा
हर वस्ती मे आग लगेगी, हर वस्ती जल जायेगी
सन्नाटे के पिछेसे तब, एक सदा ये आयेगी
कोई नहीं है, कोई नहीं है, कोई नहीं है...'

आपण आज हात बांधून तोंड बंद ठेवून गप्प राहिलो वर उद्या हे धर्मांध दहशतवादी आपल्यावरही चाल करुन येतील. गुजरातचे लोण तुमच्या माझ्या घरात पोचायला वेळ लागणार नाही. आपण गाफील राहिलो तर महाराष्ट्राचाही गुजरात व्हायला वेळ लागणार नाही. गुजरातमध्ये बरसलेले धर्मांध शक्तींचे काळे ढग देशभर पसरायला वेळ लागणार नाही.

या धर्मांध शक्तींच्या विरोधात सर्वसामान्य जनतेची शक्तीच संघटित केली पाहिजे. आज ही ताकद सुप्त अवस्थेत आहे, तिला जागे केले पाहिजे. बोलते केले पाहिजे. तिच्या हाताची घडी सोडली पाहिजे. तोंडावरचे बोट काढले पाहिजे. कारण येणारी रात्र वैऱ्याची आहे. आपण सावध राहिले पाहिजे.

# जागतिकीकरण आणि खुली अर्थव्यवस्था

- दादासाहेब पाटील
बी. कॉम. भाग ३

जागतिकीकरण म्हणजे अर्थव्यवस्थेला बंदिस्ताकडून मुक्ततेकडे नेणार आर्थिक धोरण होय.

जागतिकीकरणामुळे जगातील कोणत्याही राष्ट्राशी आर्थिक समन्वय साधता येतो. आर्थिक संबंध प्रस्थापित होतात. भांडवल, यंत्रसामुग्री यांचे हस्तांतर करता येते. यामुळे जगातील कोणतेही राष्ट्र कोणत्याही राष्ट्राशी संबंध प्रस्थापित करू शकते.

स्वातंत्र्यपूर्व काळात मागणीएवढेच उत्पादन व्हायचे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात मात्र मागणीपूर्व उत्पादन होवू लागले. त्यामुळे प्रत्येक राष्ट्राकडे अतिरिक्त उत्पादन साठा वाढला. विशेषत: युरोप, अमेरिका यांच्याकडे श्रमशक्ती, उत्पादन व भांडवल यंत्रसामुग्री वाढली. विशेषत: त्यांच्याकडे श्रमशक्तीच्या बाबतीत निग्रो लोकांची गुलामगिरी होती. साहजिकच त्यांची श्रमशक्ती वाढली. तसेच त्यांच्याकडे वसाहतवादी राष्ट्रे होती. साहजिकच वसाहतवादी राष्ट्रांच्याकडे असलेली संपत्ती व कच्चा माल याचा त्यांनी पुरेपूर उपयोग करून घेतला. त्यानंतर दळणवळणाच्या सोयी झाल्या. भांडवल यंत्रसामुग्री वाढली. मागणीपूर्व उत्पादन होवू लागले. त्यामुळे जग हे एक लहान खेडे बनले. ग्राहक व उत्पादक असे दोन गट निर्माण झाले.

इकडे विकसनशील राष्ट्रांची श्रमशक्ती वाढली. नोकरदारी वाढली. राहणीमान उंचावले. साहजिकच त्याची म्हणजे युरोप राष्ट्रांची नजर त्यांच्याकडे वळली व त्यांना अतिरिक्त उत्पादनासाठी कायदेशीर हुकमी बाजारपेठ मिळाली. अनेक आंतरराष्ट्रीय करार करुन अनिष्ट स्पर्धा करण्यापेक्षा एकच करार असावा यासाठी एप्रिल १९९४ मध्ये गॅट करार अस्तित्वात आला. त्यामध्ये प्रामुख्याने कृषी क्षेत्रावर भर देण्यात आला. त्यामध्ये प्रामुख्याने तीन गोष्टींवर भर देण्यात आला. त्या म्हणजे आयात शुल्क, कृषी क्षेत्रास अंतर्गत सहाय्य व निर्यात अनुदान.

गॅट कराराचा प्रमुख उद्देश म्हणजे विकसित देशातील अतिरिक्त उत्पादनाला जास्त लोकसंख्या असलेली कायदेशीर हुकमी बाजारपेठ मिळवून देणे होय. विकसित राष्ट्रांनी अतिरिक्त उत्पादनाचा बोजा विकसनशील राष्ट्रांवर लादला. जागतिकीकरणामुळे तंत्रज्ञानाचा व वस्तूंचा महापूर येईल. या महापुराच्या लोंढ्याखाली स्थानिक उद्योग व स्थानिक शेती दाबली जाईल.

जागतिकीकरणाचा परिणाम भारतीय शेतीवर होईल. त्यासाठी पाश्चात्य शेतीचा सुद्धा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी पाश्चात्य शेतीचा सुद्धा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. पाश्चात्य शेती प्रामुख्याने भांडवलशाही यंत्र सामग्रीच्या साहाय्याने केली आहे व त्याचा प्रमुख उद्देश म्हणजे नफा मिळवणे हा आहे. व भारतीय शेती ही मानवी श्रमावर आधारलेली आहे. व त्याचा उद्देश नफा मिळवणे नसून माणसे जगविणे हा आहे. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे सोयाबीन हे नगदी पीक होय. मध्यप्रदेशातील शेतकऱ्यांनी पैशासाठी सोयाबीनचे पीक घेतले. त्याचा परिणाम म्हणून तेथील माणसांच्या विशेषत: शेतकऱ्यांच्या आहारातील कडधान्ये कमी झाली. तसेच त्यांची काम करण्याची शक्ती कमी झाली. साहजिकच तेथे कुपोषण वाढले.

पाश्चात्य शेती व भारतीय शेती यामध्ये बराचसा फरक आहे. पाश्चात्य शेती ही अत्याधुनिक यंत्राच्या साहाय्याने केली जाते. त्यामुळे बेरोजगारी वाढते व भारतीय शेती ही मानवी श्रमावर आधारित असल्याने बेरोजगारीचा फारसा प्रश्न उद्‌भवत नाही.

विकसनशील राष्ट्रे मुख्यत: जैव विविधता, पद्धती विविधता व हवामान विविधता या तत्त्वावर आधारलेली आहेत.

जागतिकीकरणामुळे 'विक्रीसाठी उत्पादन' ही संकल्पना रुजू होईल. याचा परिणाम म्हणजे कडधान्ये नष्ट पावतील. जसे कार, मोदी ह्या ज्वारीच्या जाती जावून हायब्रीड ही जात विकसित झाली. याचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होणार आहे. तसेच नवीन पिकाच्या जाती निघतील व त्यावर कीड पडली की ती पिके किंवा धान्ये भारतियांना नाईलाजास्तव खावी लागतील.

जागतिकीकरणाचा परिणाम हा उद्योगांवर व लघुउद्योगांवर सुद्धा होणार आहे. सामान्यत: दोन प्रकारचे उद्योग असतात. एक म्हणजे नागरी उद्योग व दुसरे म्हणजे ग्रामीण उद्योग. शहरी उद्योग तर ९० बुडाल्यातच जमा आहेत. व लघुद्योग हे आजारी आहेत.

लघुद्योग हे आजारी असण्याचे कारण म्हणजे जागतिक महामंदी व माहिती तंत्रज्ञान होय. कारण यावर जास्त भांडवल पुरवठा होत आहे. असे आजारी असणारे उद्योग जागतिक बाजारपेठेत लघुद्योगांना तोंड देवू शकणार नाहीत. याचा परिणाम स्थानिक कलाकौशल्य व स्थानिक उत्पादन बुडेल यात काही शंका नाही. भारतात केवळ भांडवलाअभावी शेती ही ६६ वरुन २५ वर आल्याचे दिसून येते.

जागतिकीकरणाचा परिणाम हा रोजगारावरही होणार आहे. जागतिकीकरणामध्ये व्यापारी वस्तूंची निर्यात होते. रोजगाराची नाही. भारतातील २,२७,००,००० एवढे लोक विविध राष्ट्रात वेगवेगळ्या सेवेत आहेत. परंतु भारतात ६६ लोक हे अशिक्षित, अकुशल आहेत. बेरोजगारांचा प्रश्न आहे. जागतिकीकरण रोजगारांची निर्यात करत नाही.

भारतीय शेतीतील उत्पादने ही आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चालत नाहीत. कारण ती उत्कृष्ट दर्जाची नसतात. भारतीय साखर ही आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चालत नाही. कारण ती तयार करताना त्यामध्ये सल्फरचा वापर केलेला असतो. द्राक्षे ही किटकनाशके वापरुन तयार झालेली असल्यामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी नाही.

तात्पर्य, भारतीय अर्थव्यवस्थेने जगातील इतर विकसनशील देशांचा गट करुन त्याचे प्रतिनिधित्व करुन या गॅट करारातून बाहेर पडावे. व आपल्या अर्थव्यवस्थेला पूरक असे फायदे पदरात पाडून घ्यावेत. जागतिक स्पर्धेला तोंड देण्यासाठी वेळीच उपाययोजना केल्या पाहिजेत.

जागतिकीकरणाला सामोरे गेले नाही तर एक दिवस असा येईल की, भारतीय लोकांना सरकारच्या स्वयंचलित कंपन्यांच्या किंवा युनोच्या भिकेवर जगावे लागेल. भारतात विविध जागतिक कंपन्यांच्या मोटारगाड्या, बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या मोटारींमागे धावणारे भारतीय लोक असे विचित्र चित्र दिसेल.

# संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान

- भारत देसाई
बी. एस्सी. २



'न समझो नदी का बहाव न बदलेगा
न समझो पर्वत का झुकाव न बदलेगा
बदलेगा ये आलम जरुर बदलेगा
कुछ तुम बदलो कुछ हम बदले
जमाना जरुर बदल जायेगा।'

आज २१ व्या शतकामध्ये वावरताना देशाच्या संपूर्ण उन्नतीसाठी सर्वांनी सामूहिकपणे प्रयत्न करणे अत्यंत गरजेचे आहे. भारतासारख्या विकसनशील राष्ट्राला विकासाकडे नेण्यासाठी प्रत्येकाने आपल्यापासूनच सुरुवात केली पाहिजे.

महाराष्ट्र शासनाने ग्रामीण विकास मंत्री आर. आर. पाटील यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रपुरूष व थोर संत गाडगे महाराज यांच्या नावाने काही वर्षापासून ग्रामस्वच्छता अभियानाची सुरुवात केली आहे. 'स्वच्छतेतून समृद्धीकडे' हे ब्रीदवाक्य असणाऱ्या या अभियानाची अवघ्या महाराष्ट्रभर सुरुवात केली आहे. आज देशातील जवळपास ७२% लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहते. त्यामानाने ग्रामीण भागाचा विकास झालेला नाही. ग्रामीण भागाच्या समृद्धीसाठी अशा कार्यक्रमांची अत्यंत आवश्यकता आहे.

कृतीच्या खराट्याने समाजातील माणुसकीवरील जळमटे झाडणाऱ्या संत गाडगे महाराजांना ५० ते ६० वर्षापूर्वी जे स्वच्छतेचे महत्त्व उमजले होते, ते अजूनही लोकांना समजलेले नाही. कीर्तनाच्या माध्यमातून गाडगे महाराजांनी स्वच्छतेविषयी व समाजव्यवस्थेविषयी लोकांच्यामध्ये जागृतता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. हे सर्व करताना गाडगे महाराजांनी हाच विचार केला असेल की,

'जगायचं तर असं जग
जगल्यासारख वाटलं पाहिजे
दुसऱ्यासाठी झटताना
थोडं रक्त आटलं पाहिजे
खरच जीवन जगतोय गड्या
हे आपल्याही मनाला पटलं पाहिजे'

ग्रामस्वच्छता अभियानास अशा या थोर संताचे नाव दिल्याने त्याचे महत्त्व वाढले आहे. ग्रामस्वच्छता अभियानामध्ये तालुक्यात, विभागवार एका स्वच्छ गावाची निवड केली जाते. नंतर तालुक्यात एका गावाची निवड केली जाते, नंतर जिल्ह्यात एका गावाची निवड होते व शेवटी संपूर्ण महाराष्ट्रातून एका स्वच्छ सुंदर गावाची निवड केली जाते. वरील विविध स्तरांवर प्रथम येणाऱ्या गावांस महाराष्ट्र शासनातर्फे प्रोत्साहनपर पारितोषिके दिली जातात. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये प्रथम येणाऱ्या गावास २५ लाख रु. चे पारितोषिक दिले जाते. त्याचप्रमाणे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नावाने सुरू केलेल्या स्वच्छता कार्याक्रमांतर्गत संपूर्ण महाराष्ट्रातून एका स्वच्छ जिल्ह्याची आणि एका स्वच्छ पंचायत समितीची निवड केली जाते.

ग्रामस्वच्छता अभियानामध्ये गावांच्या समृद्धीसाठी इतर विकास कामांचाही समावेश करण्यात आला आहे. यामध्ये परिसर स्वच्छतेबरोबरच शोषखड्ड्यांची निर्मिती, बंद शौचालयांची व्यवस्था, पक्क्या रस्त्यांची निर्मिती, गटारांची व्यवस्था, गावातील मोकाट जनावरांचा व कुत्र्यांचा बंदोबस्त, आरोग्यविषयक जागृती, पिण्याच्या पाणवठ्यांचा विकास, रोजगारनिर्मिती, व्यसनमुक्ती, भरपूर प्रमाणात झाडे लावून वाढविणे आणि पाणलोट क्षेत्राचा विकास करणे अशा अनेक

कार्यक्रमांचा समावेश केला जातो. अण्णा हजारेंच्या नेतृत्वाखाली राळेगणसिद्धी या दुष्काळी गावाने पाणलोट क्षेत्राचा विकास करून एका संपूर्ण स्वावलंबी गावाची निर्मिती केली आहे. सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील निढळ या गावानेदेखील अवघ्या महाराष्ट्रापुढे आपला आदर्श घालून दिला आहे. या गावाने लोकसहभागातून आपला संपूर्ण विकास साधला आहे. दुष्काळजन्य परिस्थितीमध्ये भरपूर प्रमाणात झाडे लावण्याचा आणि राळेगणसिद्धी या गावाप्रमाणे पाणलोट क्षेत्राचा विकास करण्याचा संकल्प सोडला आहे.

ग्रामस्वच्छता अभियानामध्ये लोकांच्या संपूर्ण सहभागाला अत्यंत महत्त्व आहे. वरवरील स्वच्छतेपेक्षा लोकांच्या मनाच्या स्वच्छतेला महत्त्व आहे. जर लोकांची मने स्वच्छ नसतील तर गाव. तालुका. जिल्हा किंवा महाराष्ट्रच काय अवघा भारत देश स्वच्छ व्हायला वेळ लागणार नाही. ग्रामस्वच्छता अभियानामध्ये लोकांच्या श्रमातून कोट्यावधी रुपयांची कामे पूर्ण केली जातात. शासनाचा या कामावरील पैसा हा इतर विकासकामांसाठी उपयोगी येतो. राष्ट्राच्या प्रगतीसाठी प्रत्येकाने आपल्यापासूनच स्वच्छतेला सुरूवात केली पाहिजे.भरपूर झाडे लावून ती वाढवली पाहिजेत. पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा उपयोग केला पाहिजे. मातीच्या प्रत्येक कणाचा उपयोग केला पाहिजे. वरील सर्व बाबी प्रत्येकाने अमलात आणल्या पाहिजेत. महाराष्ट्रापुढील दुष्काळाचा विचार करता पाणलोट क्षेत्राचा विकास करणे गरजेचे आहे. पावसाचे पाणी साठवून ते जमिनीत मुरवले पाहिजे.

मोठमोठ्या शहरांमध्ये स्वच्छतेसाठी कोट्यावधी रुपये खर्च केले जातात. मुंबईसारख्या शहरात स्वच्छतेसाठी रोज जवळपास एक कोटी एवढा प्रचंड खर्च येतो. सर्वच लहान मोठ्या शहरांमध्ये ग्रामस्वच्छता अभियानाप्रमाणे कार्यक्रम सुरू करणे गरजेचे आहे. स्वच्छतेवर खर्च होणाऱ्या प्रचंड पैशाचा उपयोग हा इतर विकास कामांसाठी होवू शकतो. ज्याप्रमाणे आता मुंबई शहरामध्ये स्वच्छता कार्यक्रम चालू आहे, त्याचप्रमाणे सर्व देशाला जर प्रगतीच्या उंच शिखरावर न्यायचे असेल तर प्रत्येकाने,

"Think Globely,
work localy,
Do personally
हा विचार करायलाच हवा!

# चारोळ्या

तुम्ही कितीही मोठी चूक करा,
तुम्हाला सर्व गुन्हे माफ आहेत
कारण सॉरी म्हटल्यानंतर
त्याच्यावर ओ-के हा फु लस्टॉप आहे.

इच्छाशक्ती खूप असेल
तर अशक्य काहीच नाही
ध्येय प्राप्तीसाठी धडपडलं पाहिजे
दुर्गम्य असं काहीच नाही

ठेच लागल्याशिवाय
कळीचा अंदाज येत नाही
यातना सहन केल्याशिवाय
दुःखाची मर्यादा कळत नाही.

यातना जरी झाल्या
तरी सहन करण्याची शक्ती लागते
विष जरी पिले तरी
पचवण्याची युक्ती लागते.

**श्री गायकवाड राजू शंकर**
बी.ए. भाग ३ (हिंदी)

# शेतकऱ्यांना लुटणारे आधुनिक सरकार

डी. डी. पाटील
एस. वाय. बी. एस्सी

भारत हा शेतीप्रधान देश आहे. परंतु आजच्या परिस्थितीत खरोखरच शेतकऱ्याला प्राधान्य दिले जाते का? उत्तर नक्कीच नकारार्थी येईल. भारतात ७०% लोक शेती करतात. शेतीवर आपली उपजीविका करतात. परंतु याच शेतकऱ्यांच्या देशात शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागते. पोलिसांचा मार खावा लागतो. यापेक्षा लाजिरवाणी दुसरी कोणतीच गोष्ट नाही. हा अन्याय शेतकरी जवळजवळ स्वातंत्र्यपूर्व काळापासून सोसत आला आहे. स्वातंत्र्य मिळाल्यावर शेतकरी सुधारेल अशी आशा शेतकऱ्याला होती. इंग्रजांनंतर त्यांचा वारसा चालवण्याचे काम राजकारणी मंडळींनी केले.

आजच्या या परिस्थितीला शेतकरीही थोडाफार कारणीभूत आहे. पारंपारिक पद्धतीने शेती करून दिवसेंदिवस एकरी उत्पादन घटत चालले आहे. प्रचलित शेती पद्धतीत अनेक अडचणी निर्माण होऊ लागल्या आहेत. अवाजवी रासायनिक खतांचा वापर करून सुपीक जमीन नापीक होत चालली आहे. तसेच अचानक व अवेळी पडणारा पाऊस, अचानक हवामानात होणारे बदल, अनिश्चित पाणीपुरवठा या गोष्टींमुळे शेतकऱ्यांना अनेक प्रकारच्या रोग व किडींच्या प्रादुर्भावाला सामोरे जावे लागत आहे. रासायनिक खते, बी-बियाणे, किटकनाशके, पाणीपुरवठा, मजुरी ह्या सर्वांचे दर गगनाला भिडले आहेत. तर दुसऱ्या बाजूला शेतीपासून मिळणाऱ्या मालाला निश्चित बाजारपेठ व भाव नसल्यामुळे सर्वसामान्य शेतकरी मेटाकुटीस आला आहे.वेळोवेळी परिषदा भरवून लाखो रुपये खर्च केले जातात. पण खरोखरच मातीशी संबंध असणारे या कृषी परिषदेला हजर असतात का ? याचा विचार करायला हवा.

मागील वर्षी वीज दरवाढ जाहीर झाली. त्यात आश्चर्याची बाब म्हणजे कृषीवीज दरात १४ दरवाढ, म्हणजे प्रतियुनिट १.७ ऐवजी १.५२ रु करण्यात आली . या दरवाढीमुळे शेतकऱ्याची स्थिती पूर्वीपेक्षा वाईटच होईल यात शंकाच नाही. तसेच भारनियमनाचा सर्वात मोठा फटका ग्रामीण भागाला सोसावा लागतो आहे. त्यामुळे हजारो एकरातील पिके वाळून गेलेली आहेत. ग्रामीण भागात दिवसा वीज नसते. त्यामुळे शेतकरी रात्री जागुन शेताला पाणी देतो. थंडी वाऱ्यात कुडकुडत विजेची वाट पाहतो. एकीकडे कृषी वीजदरात वाढ तर दुसरीकडे कारखाने, लघु उद्योग यांच्या वीजदरात १४% कपात म्हणजे 'जखम शेतकऱ्याला तर मलम व्यापाऱ्याला' असे म्हणण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्याच्या देशात शेतकऱ्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष हे काही नवीन नाही. मोठ्यामोठ्या उद्योजकांकडून वीजमंडळाची थकबाकी येणे आहे. त्यांना दुखविण्याची हिम्मत मंडळात दिसत नाही. सतत सोसणाऱ्या शेतकऱ्यावर बिनधास्त ओझे टाकून मोकळे होण्याची परंपरा आहे. त्याला वीज नियामक आयोग अपवाद असण्याची शक्यता नाही.

जागतिकीकरणाच्या महालाटेचा सामना करीत देशातील गरीब जनतेचे पोषण करण्याचे अवघड कार्य केल्याचा डांगोरा आमचे नेते पिटत आहेत. तर दुसरीकडे देशात २० कोटी लोक उपाशीपोटी जीवन जगत आहेत. रोज कोणत्या ना कोणत्या कारणाने राज्यात भूकबळी पडत आहेत. ओरिसा, आंध्रप्रदेश व राजस्थान या भागातील नागरिक पोट भरण्यासाठी पोटच्या मुलांची विक्री करत आहेत. असे असताना सरकार कोणत्या गरिबांचे पोषण करीत आहे. हे स्पष्ट करावयास हवे. आज शहरांच्या पोषणासाठी खेड्यांचे शोषण सुरू आहे. श्रीमंतांनी सर्वच राजकीय पक्ष आपल्या दावणीला बांधले आहेत. तेच आर्थिक धोरण ठरवत आहेत. त्यामुळे पाणी मिळत नसेल तर गरिबांनी 'बाटलीतले पाणी' विकत घेऊन प्यावे असा सल्ला आमचे नेते देत आहेत.शेतकऱ्यांचे हजार पाचशे रुपयांचे कर्ज मंजूर करण्यासाठी बैठकांवर लाखो रुपये खर्च होत आहेत. मूठभरांच्या पदरात विकासाची फळे भरभरुन पडत असताना दुसरीकडे मात्र भूकबळी जात आहेत आणि गरिबांचे कैवारी

राजकारणात उतरलेले राजकीय नेते आपल्या वाढदिवसाला कोट्यावधी रूपये खर्च करत असतात. कापसाची ग्रेड ठरविण्यासाठी घासाघीस करणारे फेडरेशनवाले मुंबईच्या एसीत बसून हजारो कोटी रूपयांच्या गासड्या पाच मिनिटात इकडच्या तिकडे करत आहेत.

शेतकऱ्यांना लुटण्याची भाषा निदान गेल्या ५० वर्षात तरी बदललेली नाही. स्वातंत्र्य येईपर्यंत सावकार तगून राहिला. पण स्वातंत्र्यानंतर सावकारीवर अनेक नियंत्रणे आली व आणिबाणीच्या काळापर्यंत सावकारीची इतिश्री झाली. सावकारीची जागा भू-विकास बँकेने घेतली. पण सावकारीचा प्रश्न तसाच राहिला. शेतीमालाला भाव देण्यापेक्षा त्याला भरमसाठ कर्ज देवून (तीही वेळेवर नाही) शेतकऱ्यांना शेती व्यवसायातच कुजत ठेवण्याचे काम सरकारने केले. सावकाराच्या कब्जातून सुटून शेतकरी सहकाराच्या जाळ्यात अडकला आहे. सावकाराची कर्जे चोवीस तासात मिळायची, अगदी गरज पडली तर त्याहीपेक्षा लवकर पण भू-विकास बँकेचे कोणतेच प्रकरण ५ ते ६ महिन्याच्या आत मंजूर होत नाही.

सर्वसाधारणपणे कोणत्याही व्यवसायात, उद्योगात कर्जाला महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्याच्या साहाय्याने व्यवसाय वृद्धिंगत होतो. भारतात मात्र शेती हा असा एकमेव व्यवसाय आहे की तो जगविण्यासाठी कर्ज काढावे लागते व काढले तर त्यावरील व्याज फेडण्यासाठी पुन्हा कर्ज काढावे लागते. अन्यथा जमीन जुमला विकत विकत व्यवसायाचा पसारा कमी करावा लागतो. शेतकरी कर्ज काढतो असे म्हणण्यापेक्षा शेतीच्या लुटीचा परिणाम म्हणून त्याने आपला व्यवसाय बंद करु नये यासाठी लुटीवर आधारलेल्या अर्थव्यवस्थेनेच त्याला कर्ज मिळण्याची 'सुविधा' निर्माण करून दिली आहे. शेतकऱ्यांचा वाढता कर्जबाजारीपणा हा शासनाच्या शेतीविरोधी धोरणांचाच परिणाम आहे. शासनाने वेळोवेळी कर्जमाफी करणे म्हणजे आर्थिक अन्यायाविरुद्धचा उद्रेक टाळण्यासाठी केलेली तात्पुरती उपाययोजना होय. नाकातोंडापर्यंत कर्जाच्या चिखलात बुडालेल्या शेतकऱ्याला अधून मधून गळ्याला धरुन वर काढावे व पुन्हा सोडून द्यावे असा हा प्रकार आहे.

जोपर्यंत शेती हा तोट्यात चालणारा व्यवसाय आहे तोपर्यंत पतपुरवठा सावकारी असो, सहकारी असो किंवा सरकारी असो शेतकरी मरायचा वाचू शकत नाही. सहकारी ग्रामीण पतपुरवठ्यावर ढिगाऱ्यांनी अहवाल येतात, पण शेतीच्या धंद्यात आजच्या परिस्थितीत कोणतेच कर्ज फेडण्याची ताकद शेती व्यवसायात नाही याचा विचार कोणी विद्वानाने केला नाही. शेतकऱ्याची कर्जे माफ झाली तर सगळी पतपुरवठ्याची व्यवस्था कोलमडून जाईल ही भीती म्हणजे एक कांगावा आहे. मोठमोठ्या कारखानदारांची कर्जे माफ होतात तेव्हा कर्ज व्यवस्था धोक्यात येत नाही? कर्ज मेळावे भरवून मंत्र्यांच्या हजेरीत वाजत गाजत कर्ज वाटप केले जाते.

सर्व दारिद्र्याचे मूळ शेतीत आहे. शेती तोट्यात आहे कारण ती तोट्यात रहावी असे सरकारी धोरण आहे. औद्योगिक विकासासाठी लागणारा भांडवल संचय निर्माण करण्यासाठी शेतीचे हेतुपुरस्कर शोषण करण्यात येत आहे. तुटवड्याच्या काळात लेव्ही, मुबलकतेच्या काळात शेतीमालाचा खुला लिलाव, परदेशातून होणारी शेती मालाची आयात, निर्यातीवर अवाजवी बंधने, शेतीविरोधी उघड उघड पक्षपाती धोरण अशा अनेक मार्गांनी शासन धोरण राबवते. या शोषणाच्या धोरणामुळेच देशाचा विकास खुंटला आहे. देशातील दारिद्र्य हटविण्यासाठी वास्तविक पाहता काहीच करण्याची गरज नाही. गरिबी टिकावी आणि वाढावी म्हणून जे प्रयत्न चालू आहेत ते बंद केले तरी गरिबी हटणार आहे. शेतकऱ्यांची गरिबी व कर्जवाटपातील बाजारीपणा हे पुढाऱ्यांचे सर्वात मोठे भांडवल आहे. ज्या दिवशी शेतकऱ्याच्या उरावरील बोजा उतरेल त्यावेळी ग्रामीण राजकारणाचा रंगच बदलेल.

शेतकऱ्याच्या सहनशीलतेचा जेव्हा अंत होतो व तो रस्त्यावर येतो तेव्हा हे सरकार दडपशाहीच्या धोरणाचा वापर करुन शेतकऱ्याच्या घरात घुसून पोलिसांकरवी मारहाण करते. अनेक आया-बहिणींच्या मंगळसूत्राला हात घालण्याचा नादानपणा केला जातो. डिग्रजमध्ये कारण नसताना राज्य राखीव पोलिसांना पाचारण करण्यात येते व स्वत:च्या हातातील कायद्याचा दुरूपयोग करुन शेतकऱ्याला धडा शिकविला जातो. ही नवी 'डायरशाही' डिग्रजमध्ये अवतरल्याचे दिसते.

# स्वराज्याचा सेनापती :- हंबीरराव मोहिते

**कु. अर्चना मोहिते पाटील**
बी. ए. भाग ३

शिवपूर्व काळात महाराष्ट्रात अनेक क्षत्रिय मराठा घराणी आपल्या पराक्रमाने व कर्तबगारीने निजामशाही व आदिलशाही राजवटीत प्रसिद्धीस आली होती. ही मराठी घराणी म्हणजे निंबाळकर, मोरे, घाटगे, महाडिक, घोरपडे, शिर्के, सुर्वे, खंडागळे, मोहिते इ. कऱ्हाडजवळील वसंतगड (चांदोबा किल्ला) च्या पायथ्याशी असणाऱ्या तळबीड या गावचे मोहिते घराणे. या घराण्यातच शिवाजी महाराजांच्या काळात सेनापती हंबीरराव मोहिते यांचा उदय झाला.मोहिते घराण्याची वंशावळ पुढीलप्रमाणे -

रतोजी मोहिते

तुकोजी मोहिते(तळबीडची पाटीलकी मिळविली)

संभाजी — धारोजी — तुकाबाई (शहाजीची दुसरी पत्नी व व्यंकोजीची माता)

संभाजी : हंसाजी (हंबीरराव) — सोयराबाई (शिवाजीची दुसरी पत्नी) — अणुबाई (व्यंकोजीची पत्नी)

हंबीरराव मोहित्यांच्या पणजोबांपासून म्हणजे रतोजी मोहित्यांपासून या घराण्यात एकापेक्षा एक पराक्रमी व कर्तबगार पुरूष जन्माला आले. या सर्वांच्या पराक्रमावर हिंदवी स्वराज्याचा सेनापती हंबीरराव मोहिते याने कळस चढविला. आपल्या पराक्रमाने, शौर्याने, स्वामिभक्तीने आणि स्वराज्यावरील गाढ निष्ठेने हंबीरराव मोहिते मराठा इतिहासात अजरामर झाले.

तळबीडचे मोहिते घराणे व छत्रपतींचे भोसले धराणे यांचा संबंध आदिलशाहीची सरदारकी करताना आला. शहाजीराजे भोसले यांच्याबरोबर संभाजी व धारोजी बधूंनी मोठा पराक्रम गाजविला. भोसले व मोहिते या घराण्याचे घनिष्ठ संबंध निर्माण झाले. यातूनच संभाजी व धारोजी यांनी आपली बहीण तुकाबाईचा विवाह शहाजीराजे भोसले यांच्याशी लावून दिला. पुढे शहाजीराजांनी मोहिते बंधूंना म्हणजे आपल्या मेव्हण्यांना तळबीड व बालेघाटची देशमुखी मिळवून दिली. अशा या पराक्रमी संभाजीची मुले हंबीरराव व सोयराबाई व अणुबाई ही होत. यापैकी सोयराबाईचा विवाह शिवाजी भोसलेंशी व अणुबाईचा विवाह व्यंकोजी भोसलेंशी झाला.

**हंबीररावास सेनापतीपद -**

छ.शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेत स्वामिनिष्ठ व पराक्रमी हंबीरराव मोहितेंचे मोलाचे सहकार्य लाभले. स्वपराक्रमाने व कर्तृत्वाने तो लवकरच बढत्या मिळवत गेला. शिवराज्याभिषेकापूर्वी आदिलशाही सरदार बहलोलखान शिवाजीच्या स्वराज्यावर चालून आला. शिवाजीचा सेनापती प्रतापराव गुजर याने त्याला उमरानी येथे गाठून त्याचा पराभव केला. बहलोलखान शरण आला. प्रतापराव गुजराने त्याला दया दाखविली व मुक्त केले. पण बहलोलखानने प्रतापरावांचे उपकार विसरून पुन्हा स्वराज्यावर हल्ला केला. तेव्हा शिवाजी महाराजांनी प्रतापरावांना दोष दिला. महाराजांचे हे शब्द प्रतापरावांच्या जिव्हारी लागले व त्याने नेसरी येथे फक्त सात स्वारांसह बहलोलखान याच्यावर हल्ला केला. त्यातच त्यांचा बळी गेला. फेब्रुवारी १६७४. ही बातमी हंबीररावास समजली त्याने मोठ्या धाडसाने व जय्यत तयारीने जहांगीर लुटली व बहलोलखानाच्या सैन्याचा पूर्ण पराभव करून प्रतापरावाच्या मृत्यूचा सूड उगवला. प्रतापरावाच्या मृत्यूने दु:खी झालेल्या महाराजांनी हंसाजी मोहितेचा सन्मान केला व त्यास 'हंबीरराव' हा किताब दिला व स्वराज्याच्या सेनापती पदाची वस्त्रे दिली. या प्रसंगाचे वर्णन बखरीत पुढीलप्रमाणे दिले आहे. 'प्रतापराव पडले, ही खबर राजयांनी ऐकू न बहुत कष्टी जाहले आणि बोलले की, 'आज एक बाजू पडली ! प्रतापराव यास आपण लिहुन पाठवले की ,'फले न करिता तोंड दाखवू नये, त्यासारिखे करून बरे म्हणविले. आता लष्कराचा बंद कैसा होतो? सरनोबत कोण करावा? अशी तजवीज करुन आपण स्वस्थ लवकरात येऊन कोकणात चिपळून जागा परशुरामाचे क्षेत्र आहे,तेथे येऊन

राहिले. मग लष्कराची पाहाणी करुन लहान थोर लष्करात व पायदळ लोकांस खजिना फोडून वाटणी केली आणि सरनोबतीस माणूस पाहता हंसाजी मोहिते म्हणून पागेमध्ये जुमला होता. बरा शहाणा, मर्दीना, सबुरीचा, चौकस, शिपाई मोठा धारकरी पाहून त्यास 'हंबीरराव' नाव किताबती देवून सरनोबती सांगितली. कुल लष्कराचा गाहा(एकीकरण) करून हंबीरराव याचे ताबीज (ताब्यात) दिधले, आणि फौज सुद्धा वरघाटी रवाना केली.

लवकरच शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक रायगडावर झाला . या राज्याभिषेक प्रसंगी हंबीररावाचा सेनापती म्हणून सन्मान केला. हिंदवी स्वराज्याच्या या पहिल्या सेनापतीस राज्याभिषेकात मुख्य सरदारांबरोबरच दर्जा दिला. यासंबंधी बखरकार चिटणीस म्हणतात ,'सेनापती यास बादली वस्त्रे, पाच सनगे व शिरपेच, मोत्याचे तुरे, कंठ्या, चौगडे, नगा, शिक्के-कट्यार, ढाल-तलवार, चौघडे-नौबते, जरीपटगे, हत्ती घोडे व सोन्याच्या दांडीच्या चौऱ्या याप्रमाणे देऊन पदे करार प्राप्त करुन दिधली.'

राज्याभिषेकानंतर दसऱ्याच्या मुहूर्तावर हंबीररावांच्या नेतृत्वाखाली मराठी फौजांनी आदिलशाही व मुघली प्रदेशात धुमाकूळ घातला. सेनापती हंबीररावाने खानदेश, बागवान, गुजरात, अहमदाबाद, वऱ्हाड, माहुर इ. प्रदेश नर्मदेपर्यंत लुटला. खंडणी वसुली केली. मोहिमेतील सर्व लूट व मालमत्ता स्वराज्याच्या खजिन्यात आली.

छ. शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकानंतर कर्नाटक मोहीम काढली. या मोहिमेत फौजांचा एक भाग सेनापती हंबीररावांच्या नेतृत्वाखाली दिला व कृष्णा व तुगभद्रा नद्यांच्या संगमावरील कोपल किल्ला घेण्यास पुढें पाठविले. पराक्रमाची शर्थ करुन तो किल्ला सेनापती हंबीररावाने जिंकू न घेतला व गोवळकोंडा येथे शिवाजी महाराजांना जावून मिळाला. शिवाजी महाराजांनी पुढे गोवळकोंडयाहून निघून कर्नाटकातील मुलूख जिंकण्यास प्रारंभ केला. त्यात हंबीररावांचा पराक्रम अप्रतिम ठरला. कर्नाटकात व्यंकोजीराव भोसले व शिवाजी महाराज यांच्यात गृहकलह व वाद झाला. व्यंकोजीने शिवाजी महाराजांच्या सामोपचाराचा मार्ग मानला नाही. संघर्षाची भूमिकाच घेतली. महाराजांची रघुनाथपंत हणमंते व हंबीरराव मोहिते यांच्यावर कर्नाटकात जिंकलेल्या प्रदेशाच्या बंदोबस्ताची जबाबदारी सोपवून महाराष्ट्रात आले. पुढे हंबीरराव व व्यंकोजी भोसले यांच्यात लढाई झाली. त्यात व्यंकोजीचा पराभव झाला पण हंबीररावाने सबुरीने घेवून व्यंकोजीला पळून जाण्यास मोकळीक दिली. अशाप्रकारे हंबीररावाने व्यंकोजी राजांचा पराभव केला. कर्नाटक मोहिमेत हंबीररावांचा आणखी एक पराक्रम म्हणजे त्याने वेल्लोरचा बुलंद किल्ला काबीज केला. जुलै १६७८. याच काळात मुघल व आदिलशाही यांचे जोरदार हल्ले स्वराज्यावर सुरू झाले. म्हणून शिवाजी महाराजांनी हंबीररावास महाराष्ट्रात बोलावून घेतले. याच काळात स्वराज्यात , स्वराज्याला धक्का देणारी व महाराजांचे मानसिक स्वास्थ्य बिघडवणारी घटना घडली. ती म्हणजे स्वराज्याचा वारसदार युवराज संभाजी दिलेरखानास जाऊन मिळाला. यावेळी हंबीररावाने मुघली प्रदेशात मोहिमा काढून महाराजांचे व मराठ्यांचे मनोधैर्य वाढविले. याच काळात संभाजीला मुघली गोटातून स्वराज्यात परत आणण्याचे प्रयत्न सुरू होते. त्यात शिवाजी महाराजांना यश आले व संभाजी स्वराज्यात पन्हाळगडावर आला. महाराजांनी पन्हाळ्यावर जाऊन संभाजीची भेट घेतली. दोघांत सर्वंकष चर्चा झाली. महाराजांनी संभाजीला शहाणपणाच्या चार गोष्टी सांगून भविष्यातील राजकारणाची चर्चा करुन रायगडावर आणले आणि रायगडावर पोहचताच मार्च १६८० मध्ये प्रतापराव गुजरांची मुलगी जानकीबाई हिच्याबरोबर राजारामाचा विवाह केला. पुढे दहा बारा दिवसांतच महाराजांचे अकस्मात निधन झाले. त्यावेळी प्रमुख सर्व सरदार निरनिराळ्या मोहिमांवर होते व हंबीरराव मोहिते तळबीड येथे छावणी करून होता.

**स्वराज्याच्या संकटसमयी हंबीररावांची निर्णायक भूमिका -**

४ एप्रिल १६८० ला छ. शिवाजी महाराजांचा मृत्यू झाला व स्वराज्यावर संकट कोसळले. महाराजांनी हयात असताना वारसासंबंधी कोणतेही सुतोवाच केले नव्हते. हिंदू धर्मशास्त्रात व रिवाजानुसार युवराज संभाजी हाच स्वराज्याचा खरा वारस होता. पण अष्टप्रधानमंडळातील काही स्वार्थी लोकांनी सोयराबाईच्या मदतीने संभाजीस बदनाम केल्याचा इतिहास आपणास ज्ञात आहे. त्यातच संभाजी राजे शत्रूस जावून मिळाल्यामुळे बदनामीस पात्र ठरले. पण संभाजी राजांनी तसे

का केले? याविषयी इतिहासच अबोल आहे. वरील बाबींचा संदर्भ घेऊन स्वार्थी प्रधानांनी संभाजीविरुद्ध बंडखोरी केली, आणि सोयराबाईच्या मदतीने अल्पवयीन राजारामास रायगडावर संभाजीचा हक्क डावलून मंचकारोहण केले, २१ एप्रिल १६८०.

प्रधानांच्या या कुटिल कारस्थानांची बातमी संभाजी राजांना पन्हाळगडावर लागली होती आणि म्हणून त्यांनी राज्यातील अधिकारी व किल्लेदार यांना आपल्या पायाशी रुजू होण्याची आज्ञापत्रे पाठविली होती. सेनापती हंबीरराव मोहितेस सुध्दा हे आज्ञापत्र आले असावे. हंबीरराव रायगड व पन्हाळगडावरील बातम्या जाणून होता. भविष्यकालीन संघर्षात स्वराज्याचा एक जबाबदार सेनापती म्हणून आपणास महत्त्वाची व निर्णायक भूमिका पार पाडण्याविषयीचे द्वंद्व त्यांच्या मनात सुरू होते. पण न्याय व योग्य असेल तेच कठोरपणे करण्याची मनोभूमिका त्याने घेतली. एका बाजूला सख्खी बहीण राजमाता सोयराबाई व सख्खा भाचा राजा, तर दुसऱ्या बाजूस राज्याचा खरा वारसदार संभाजी असे असताना प्रधान मंडळातील मुख्य प्रधान मोरोपंत पिंगळे आण्णाची दत्तो, प्रल्हाद निराजी व चिटणीस-बाळाजी अवजी यांनी स्वार्थी हेतूने सोयराबाईची बाजू घेतली. अशा बिकट प्रसंगी हंबीररावाने आपल्या मनाचा थांगपत्ता न लागू देता वरील प्रधानांना एक मत्सुद्दी निरोप पाठविला. "जेथे जेथे तुम्ही जाल, तेथे तेथे मी येईन, तुमच्या सोबत मी असेन." हंबीररावचा वरील निरोप संदिग्ध व राजकारणी होता. त्याचा मिथ्यार्थ प्रल्हाद निराजीला जाणवला. त्याच्या मनात चलबिचल सुरु झाली. त्याने आण्णाजी दत्तोस संभाजी राजाबरोबर सबुरीने वागण्याचा सल्ला दिला, पण तो त्याने डावलला. आपल्या मुत्सद्देगिरीने संभाजीस आपण आपल्या बाजूस वळवू व त्यास भावनिक आवाहन करून आपल्या बाजूस वळवू असा त्याला आत्मविश्वास होता. म्हणून वरील सर्व मुत्सद्दी रायगडावरून पन्हाळगडाकडे संभाजीस कैद करण्यासाठी फौजेसह निघाले. तळबीड येथे हंबीररावच्या छावणीत ते आले. हंबीररावने त्यांचे स्वागत करून त्यांचे मनोगत जाणून घेतले. त्यांचा हेतू लक्षात येताच कोणत्याही भावनेच्या आहारी न जाता स्वराज्यनिष्ठेचा, स्वामीनिष्ठेचा, दूरदृष्टीचा व भविष्यातील राजकारणाचा विचार करून संभाजीच्या बाजूस राहाण्याचा आपला निर्णय त्यांना सांगितला. वरील सर्व ब्राह्मण प्रधानांची त्याने तीव्र शब्दात निर्भत्सना केली. त्यांच्या पापकृत्याची त्यांना जाणीव करून दिली व त्या सर्वांना कैद केले, आणि त्याच अवस्थेत फौजेसह पन्हाळगडावर जाऊन या कैद्यांना संभाजीपुढे सादर केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या तालमीत तयार झालेल्या हिंदवी स्वराज्याच्या पहिल्या सेनापतीने आपली स्वामिनिष्ठा, स्वराज्यनिष्ठा, न्यायनिष्ठूरता व सत्यनिष्ठा अभंग ठेवली आणि तीही अत्यंत नाजूक व भावनिक प्रसंगी. या कर्तव्य कठोर सेनानीने कौटुंबिक स्वार्थाहून हिंदवी स्वराज्याचे अस्तित्व व भवितव्य महान व मंगल मानले आणि आपली ताकद व प्रतिष्ठा संभाजीच्या मागे उभी केली, परिणामी स्वार्थी, बंडखोर, प्रधानांचे सर्व मनोरथ विरून गेले. हीच हंबीररावची निर्णायक भूमिका होय. छ. संभाजीच्या राज्यारोहणानंतर दिल्लीपती बादशहा औरंगजेब मराठ्यांचे राज्य नष्ट करण्यासाठी १६८२च्या सुरवातीलाच प्रचंड लवकर घेवून मराठ्यांचे राज्य नष्ट करण्यासाठी महाराष्ट्रात उतरला. १६८२ते १६८५ महाराष्ट्रात मुघल व मराठे घनघोर युद्ध झाले. या युध्दात छ. संभाजीचा सेनापती हंबीरराव मोहिते नाशिक बागलानपासून कर्नाटकापर्यंत विजेच्या चपलाईने फिरून मोघलांना नामोहरम करताना दिसतो. गनिमी काव्याचे युद्धतंत्र व धावत्या लढाया यामुळे मुघली फौजेसह संभाजी, हंबीरराव व मराठी सेनानींनी बेजार केल्याचे दिसते. त्या संदर्भात त्याच्या अनेक लहान-मोठ्या संघर्षाच्या, विजयाच्या, बहाद्दुरीच्या व पराक्रमाच्या हकीकती इतिहासास ज्ञात आहेत. गनिमाचा हिसाब न धरता मोठ्या आत्मविश्वासाने व जिद्दीने तो शत्रूंना नामोहरम करताना दिसतो. असा हा हिंदवी स्वराज्याचा पहिला सेनापती अविरत, अविश्रांत जवळजवळ ५-६ वर्षे मोघलांच्या बरोबर लढला व संकट प्रसंगी स्वराज्याची सेवा केली. अशा या महान सेनापतीची शेवटची लढाई वाई परिसरात सजीखान या मोघली सरदारांबरोबर झाली. डिसेंबर १६८७. याच निकराच्या झुंजीत मराठ्यांचा विजय झाला. पण हंबीरराव तोफेचा गोळा लागून धारातीर्थी पडला.

या महान सेनानीने स्वराज्याची अखेरपर्यंत निष्ठेने सेवा केली. त्यामुळे त्यांचे कार्य मराठ्यांच्या इतिहासात अतुलनीय आहे.



# शिक्षणाचे भगवेकरण

- कु. अनिता जाधव
बी. ए. भाग ३

'शिक्षण' म्हणजे व्यक्तीच्या अंगी असलेल्या गुणांचे संवर्धन व दोषांचे उच्चाटन करण्याची शक्ती होय. त्याचप्रमाणे व्यक्तीला जगात वावरण्यासाठी, स्वत:चा सर्वांगीण विकास करण्यासाठी आवश्यक असणारे 'ज्ञान' मिळविणे म्हणजे 'शिक्षण' होय. शिक्षणाने व्यक्तीचा वैयक्तिक, सामाजिक विकास घडून येतो. यामुळेच शिक्षणाला समाजव्यवस्थेत फार महत्त्वाचे स्थान आहे. शिक्षणाने मानव साक्षर बनतोच, पण त्याचबरोबर तो व्यवहारी, सुशील बनतो. त्या त्या काळातील बदल, चालू घडामोडी शिक्षणानेच त्याला योग्य रीतीने समजतात. कायदे करणे व ते कायदे अंमलात आणणारी प्रशासन यंत्रणा, न्यायव्यवस्था, सैन्य व पोलिस यांची दमनयंत्रणा हे शासनयत्रंणंचे तीन महत्त्वाचे खांब आहेत. त्याचबरोबर 'शिक्षणव्यवस्था' हा देखील शासनयंत्रणेचा महत्त्वाचा खांब आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात जातीयता नष्ट व्हायला, स्त्रीदास्य संपायला शिक्षणव्यवस्थेनेच चालना मिळाली. समाजधारणेत राष्ट्रनिर्मितीच्या क्षेत्रात शिक्षणाचा मोलाचा वाटा आहे.

'एक वर्षाचे नियोजन करायचे असेल तर शेत लावा, शंभर वर्षांच्या नियोजनासाठी झाडे लावा, परंतु आयुष्यभराच्या नियोजनासाठी शिक्षण घ्या' अशी एक चिनी म्हण आहे. या म्हणीची सार्थकता आजपर्यंतच्या शैक्षणिक बदलावरून काही शिक्षणतज्ञांना पटली आहे. परंतु यावर्षीच्या शैक्षणिक धोरणामधले बदल पाहून खुद्द शासनच ही म्हण विसरले आहे, असे वाटते. म्हणूनच काही संघीय, पुरोगामी, लोकशाहीवादी, सर्वधर्मसमभाववादी मंडळींना शिक्षणाला 'भगवा' फासण्याची संधी मिळाली आहे. त्यांना जुनी परंपरावादी पद्धती पुन्हा शिक्षणात आणून संपूर्ण 'शिक्षणाचे भगवेकरण' करावयाचे आहे. असेच म्हणावे लागेल.

खरे पाहता शिक्षणाची ही गंगा भारतात आणली ती ब्रिटिशांनी, परंतु त्यांनी इंग्रजी शिक्षण देणारी, बाबू लोक तयार करणारी, स्वत:च्याच देशात स्वत:च्याच संस्कृतीकडे तिरस्काराने पाहणारी शिक्षणव्यवस्था निर्माण केली. ब्रिटिशांच्या अत्याचारामुळे १८८० नंतर भारतात स्वातंत्र्य चळवळीला प्रारंभ झाला. स्वातंत्र्य चळवळीतील लोकांनी या चळवळीला पूरक अशी राष्ट्रीय शिक्षणप्रणाली सुरू केली. या शिक्षणव्यवस्थे मध्ये टिळक, आगरकर, म. गांधी, विनोबा भावे, महर्षी कर्वे, डॉ. आंबेडकर इ. मान्यवरांचा मोलाचा वाटा आहे. राष्ट्रीय शिक्षण व्यवस्थेमध्ये प्राचीन भारतीय संरजामी रचनेतील दोष नव्हते, जातीयता नव्हती. स्त्रियांना प्रवेश होता. बौद्धिक कामालाच प्रतिष्ठा होती. श्रम व बुद्धी यांची योग्य सांगड होती. त्यानंतर राष्ट्रीय शिक्षणाने पारतंत्र्यातील लोकांना स्वातंत्र्याविषयी जागरूकता निर्माण झाली. त्यांनी स्वातंत्र्यापूर्वीच योग्य, लोककल्याणकारी, तसेच समानतेवर आधारित शिक्षण योजना आखण्यास सुरूवात केली. याचे उत्तम उदा.म्हणजे १९३७ ची वर्धा शिक्षण योजना, या योजनेमध्ये मोफत व सक्तीचे शालेय शिक्षण, मातृभाषेतून शिक्षण, कार्यानुभवावर आधारित शिक्षण, स्त्री पुरूष समानतेवर आधारित शिक्षण याची पायाभरणी होती.

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यानंतर १९४८/४९ मध्ये विश्वविद्यालयीन शिक्षण आयोग, तसेच १९५२/५३ मध्ये माध्यमिक शिक्षण आयोग निर्माण करण्यात आले. परंतु संपूर्ण समाजात समानतेवर आधारित, तसेच सर्व उच्च व कनिष्ठ लोकांना शिक्षणक्षेत्रात खऱ्या अर्थाने संधी

मिळाली. ती १९६४ मधील कोठारी आयोगाने यामध्ये सर्व स्त्री पुरूष, दलित आदिवासी यांना जात, धर्म, सामाजिक स्थान याचा विचार न करता, शिक्षणात संधी देण्याची हमी देण्यात आली. आजपर्यंतचे भारतात चालत आलेले हे 'अधिकृत शैक्षणिक धोरण' आहे.

आज म्हणजेच एकविसाव्या शतकात संघीय मंडळी फक्त नेहरूंचे राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय धोरण बदलत नाहीत तर त्यांना समाजातील न्यायवादी अर्थकारणही बदलावयाचे आहे. त्यांना समानतेच्या शिक्षणावर गदा आणणारी शिक्षणव्यवस्था निर्माण करायची आहे. त्यांचे बदल त्यांनी स्पष्ट सांगितलेले आहेत ते म्हणजे, त्यांना जुनी गुरुकुल पद्धती पुन्हा आणावयाची आहे, त्यामध्ये गुरू शिष्य अशी भूमिका जातिव्यवस्थेने निर्माण करावयाची आहे. त्याचबरोबर या मंडळींना वर्णव्यवस्थेने सांगितलेली शिक्षणाच्या संधीची असमानता पुन्हा निर्माण करावयाची आहे. एवढेच नव्हे तर मातृभाषेतील शिक्षणाऐवजी 'संस्कृत हे शिक्षणाचे माध्यम असावे' अशी त्यांची इच्छा आहे. या सर्व बदलांबरोबरच पुरोगामी शिक्षण म्हणजेच हिंदूधर्म कर्मकांड, भारतीय फलज्योतिष, भारतीय वास्तुशास्त्र इ. विषयांना त्यांना अभ्यासक्रमात प्रतिष्ठेची जागा द्यायची आहे. त्याचबरोबर त्यांना इतिहासाचे सोयिस्कर पुनर्लेखन करावयाचे आहे. खरे तर, हे शैक्षणिक बदल नसून समानतेवर आधारित शिक्षणव्यवस्थेला 'भगवेकरण' करण्याचे घृणास्पद कृत्यच म्हणावे लागेल. शासनाने स्वत:ची तिजोरी भरण्यासाठी अशा लोककल्याणकारी योजनांमध्ये असे भगवेकरण फासणे बरोबर नाही. या शैक्षणिक बदलांचा परिणाम प्रामुख्याने दलित, आदिवासी, स्त्रिया, गरीब कष्टकरी लोकांवरच होणार. त्यांना समानतेचे शिक्षण मिळणार नाही. या सर्वांना अशा शिक्षणापासून वंचित रहावे लागेल.

गेल्या दीड वर्षात शासनाने शिक्षणासारख्या लोककल्याणकारी योजनांना स्वत:ला योग्य असणारे अर्थकारण बनविले आहे. याची अनेक उदाहरणे देतो येतील. त्यामध्ये जानेवारी २००० मध्ये १५००० शिक्षकांच्या जागा कंत्राटी पद्धतीने भरण्यात आल्या. ४००० प्राथमिक शाळा १३००० रूपये वर्षाला या आखणीने वस्ती शाळा म्हणून उघडण्यात आल्या. सर्व माध्यमिक व प्राथमिक शाळांना, उच्च विद्यालयांना कंत्राटी पद्धत लागू करण्यात आली. याचा अर्थ शासन स्वत:ची तिजोरी भरण्यासाठी शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्राचे 'अर्थकारण' बनवीत आहे.

खरे तर माझ्यामते, शिक्षणाला रंग असूच शकत नाही. जनसामान्यांच्या इच्छा आकांक्षांना रुचिर रंगरुप देण्याचे शिक्षण हे साधन आहे, साध्य नाही. परंतु देशाच्या कल्याणासाठी खुर्चीवर बसलेल्या राजकीय मंडळींना शिक्षणाला साध्य मानून आर्थिक कारणांसाठी 'भगवेकरण' आणले आहे. खऱ्या अर्थाने हे भगवेकरण रोखले पाहिजे. अन्यथा समाजातील दलित, आदिवासी स्त्रिया, गरीब कष्टकरी लोकांना शिक्षणापासून वंचित रहावे लागेल. मुख्यत: त्यांनीच शिक्षणाच्या भगवेकरणाविरुद्ध लढा उभा केला पाहिजे. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्राला 'भगवा' फासण्यापासून त्यांनीच परावृत्त केले पाहिजे.

आज सर्व देशभरातून एकच आवाज निघाला पाहिजे आणि तो म्हणजे 'शिक्षणाला भगवेकरणापासून मुक्त करा' 'जुनी, पुरोगामी, सर्वधर्मसमभाववादी शिक्षणव्यवस्था निर्माण करा'.

शिक्षणाचे भगवेकरण थांबवा अन्यथा संघर्षाला तयार रहा. लोकहो, डोळ्यावरुन अंध:काराची झालर बाजूला करुन आपल्या या विद्यादेवतेला बेअब्रू होण्यापासून वाचवा. शिक्षणासारख्या कल्याणकारी व्यवस्थेला अर्थकारण, राजकारण यापासून दूर ठेवा. तरच सर्व स्तरातील जातीतील लोकांना समानतेचे शिक्षण मिळेल. नाही तर 'राजकीय मंडळींचे राजकारण, अर्थकारण, शिक्षणाचे भगवेकरण' अशी घोषणा सर्व देशभरातून कानावर येईल. मी सर्व जनसामान्य लोकांना हीच विनंती करते की, शिक्षणाचे भगवेकरण करणाऱ्यांविरूद्धचा लढा लौकरात लवकर उभा राहो !

# एकतर्फी प्रेम



**कु. सुषमा सुतार**
बी. ए. भाग ३

'प्रेमासाठी झुकले खाली,
धरतीवरती आकाश!
प्रेमापोटी जन्म घेतसे,
दुनियेचा विश्वास !!'

आकाश व पृथ्वी यांच्यामध्ये असणारा प्रेम-संबंध आपण जाणतोच. खरच ! 'प्रेम ' ही कल्पना किती सुंदर आहे! प्रेमाचे वर्णन शब्दात करावे तेवढे थोडेच आहे. मानवाच्या जीवनाचा अत्यंत महत्त्वाचा भाग 'प्रेम' आहे. प्रेमाशिवाय जगणारा भावनाशून्य माणूस जगात शोधून सापडणार नाही. परंतु प्रेम मिळवणे आणि ते ही जबरदस्तीने मिळवणे असा प्रकार वारंवार दिसतो.

विद्या प्रभुदेसाई या बेचाळीस वर्षाच्या महिलेच्या हत्येने जणू सिद्धच झाले आहे की, सोळा वर्षाच्या युवतीपासून पन्नास साठच्या प्रौढेपर्यत पुरुषी वर्चस्वातून असे खून होवू शकतात. वृत्तपत्रातून पहिल्या पानावर ही बातमी झळकते. समाजाच्या सर्व थरांतून हळहळ, निषेध व्यक्त होतो. मग समाज संवेदनशून्य झाला आहे, अशी ओरड होते. जे रिंकू पाटील, अमृता देशपांडे, नीता हेंद्रे यांच्याबाबत झाले, तेच पुन:पुन्हा का घडते, याचा अंतर्मुख होऊन विचार झाला पाहिजे असे वाटल्याशिवाय रहात नाही.

अशा खुनांच्या प्रकारांमध्ये बघ्या लोकांची आत्मकेंद्रित वृत्ती, बोथट आणि मुर्दाड मने याबद्दल सर्वत्र चीड, संताप व खेद व्यक्त करुन वादळ हळूहळू शमू लागते. असे गोगलगायीपेक्षाही संथ चालणारी न्यायदान व्यवस्था. होत्याचे नव्हते करणाऱ्या हुशार, चलाख वकिलांद्वारे आरोपींची निर्दोष मुक्तता, साथीदारांना न मिळणारे पोलिससंरक्षण.

चिऊताईच्या बाळाच्या बारशाला निघालेली गोगलगाय त्या बाळाच्या लग्नाला जाऊन पोहचते. अशा गोगलगायीपेक्षाही संथ चालणाऱ्या न्यायदान व्यवस्थेची कल्पना अशा निर्घृण कृत्ये करणाऱ्यांना आलेली आहे. त्याचप्रमाणे न्यायालयात जाऊन काही निष्पन्न होण्याऐवजी नसता मन:स्तापच होणार, याची जाणीव सर्वसामान्यांना झालेली आहे. त्यामुळे अशी क्रूर कृत्ये करणारे धीट झाले आहेत. कसल्याही झंझटात न पडणारे बघे म्हणजेच सामान्यजन हेही संवेदनाशून्यतेकडे वळलेत. जोपर्यंत लवकरात लवकर खटला चालून इतरांना जरब बसेल अशी सजा ओरोपींना होत नाही, तोपर्यंत केवळ समाजमनाला त्याच्या निष्क्रियतेचा दोष देवून काय साध्य होणार?

खुनी हल्ला झालेल्या मुलींनी अंगभर पोषाख केला होता. तरी रस्तोरस्ती पुरुषांच्या नजरा चाळवतील असे ड्रेस करणाऱ्या तरुणी दिसत असतातच. त्यांच्या ड्रेसबद्दल कुणी बोललेच तर त्या व्यक्ती पुराणमतवादी आणि स्त्री मुक्ती विरोधी समजल्या जातात. बुद्धिमत्ता आणि पुरुषांच्या क्षेत्रातही प्राविण्य मिळवून आपण स्त्री पुरुष समानता अंमलात आणू शकत नाही का? पुरुषांच्या वासनेला आव्हान देण्याचे कारण काय? आज मुली साडीऐवजी पंजाबी ड्रेस घालतात. दिसायला तो अंगभर असतो, पण त्याची ओढणी वा दुपट्टा जिथे हवा तिथे नसून गळ्याभोवती लपेटलेला असतो. मग ते वस्त्र हवेच कशाला?

ड्रेस व कॉस्माटिक्स वा दागिने घेवून देणाऱ्यांची आजकाल



भुरळ पडते. कारण वैचारिक सौंदयपिक्षा छानछोकीला, चैनीला आलेले अवास्तव महत्त्व. तेव्हा त्याबद्दल योग्य विचार करण्याची कुवत, पात्रता मुलींमध्ये यावी यासाठी पालक त्यांना समजवतात का? मुलींना आपण कल्पना चावला (अंतराळवीर) होण्यापेक्षा जूही चावलाचे आकर्षण वाटते. आपल्याला शाहरुख खान सारखा किंवा सलमान खान सारखा प्रेमिक असावा असे वाटते. हे झाले मुलींबद्दल!

अशा तऱ्हेच्या बातम्या वाचल्या की मुलांच्या पालकांना हायसे वाटते, की बरे झाले आपल्याला मुलगी नाही. पण त्यांना हे कळू नये का की, आपण आपल्या मुलांवर चांगले संस्कार केले नाहीत तर ती देखील अशीच भरकटतील. लहानपणापासूनच्या अतिलाडाने हाताबाहेर गेलेल्या शाळा कॉलेजमधील मुलांच्या तोंडातून शब्द बाहेर पडायचा अवकाश की पालक ती वस्तू जिवाचे रान करुन त्यांच्यापुढे हजर करतात. त्यामुळे नकाराची सवय त्यांना लागतच नाही. घरात उर्मटपणे वागणारा मुलगा जसा बाहेर समाजातही उर्मटपणे वागतो. त्याचप्रमाणे प्रत्येक गोष्ट मला मिळालीच पाहिजे ही मनोवृत्ती कोणामुळे घडते? मुली स्वकर्तृत्वाने पुरूषाच्या प्रत्येक क्षेत्रात प्राविण्य मिळविण्याची घोडदौड करताना आढळतात. त्यामुळे त्यातून निर्माण होणारी असूया, द्वेष भावना मुलांच्या या प्रवृत्तीला खतपाणी घालते.

'प्रेम म्हणजे शक्ती असते!
प्रेम म्हणजे भक्ती असते!!
प्रेम म्हणजे कुणी कुणावर केलेली सक्ती नसते !!!'

पूर्वीच्या चित्रपटात नायक नायिकेचे प्रतिकात्मक प्रेम दाखविले जात असे. दोन डोलणाऱ्या फुलांमधून किंवा एकाच फांदीवर बसलेल्या पक्षी युगुलांमार्फत. आता सगळेच इतके उघडे, बटबटीत! चित्रपटातील खून खराबा, बलात्कार वरचेवर बघून याबद्दल अंगावर काटा येईनासा झाला आहे. विविध प्रसारमाध्यमांमुळे आजच्या तरुणाला 'तू हाँ कर या ना कर, तू है मेरी किरण!' ही बळजबरी आवडू लागली आहे.

विद्या, अमृता, नीता, रिंकू आणि अशा अनेकींच्या हत्या झाल्यावर निषेध नोंदवून आपण मोकळे होणार. बघ्यांना दोष देणार. त्याबद्दल खोलवर विचार करणार नाही. त्या अनुषंगाने कृती करणार नाही. वकील अशा आरोपींना सोडविण्यात धन्यता मानणार. पोलिस आपले हात ओले करून घेणार. न्यायालये गोगलगायीहून संथ चालणार. टीव्हीवर सवंग चित्रपट आणि मालिका चालू राहणार. वर्गात शंभर शंभर मुले कोंबून शिक्षकांना त्या मुलांवर संस्कार करण्याची जबाबदारी सोपवून पालक मात्र नामानिराळे होणार. त्यामुळे मुले स्वैर न झाली तरच नवल! आजचे भ्रष्ट राजकारण, शिक्षणक्षेत्रातील अनागोंदी, बेकारी, कौटुंबिक अस्वास्थ्य, घरात प्रेमाचा व आपुलकीचा अभाव या साऱ्याचा एकत्रित परिणाम म्हणून हे असे खून होत आहेत. याला त्या मूर्ख, विकृत, क्रूर प्रियकरां(?) बरोबर आपण सर्वजण थोड्या थोड्या प्रमाणात जबाबदार आहोत.

पालक, शिक्षक, वकील, स्त्री मुक्ती संघटना, विचारवंत, विचारी विद्यार्थी वर्ग या सर्वांनीच या प्रवृत्तीविरुद्ध आपल्याला झेपतील ते प्रयत्न करायला हवेत. न्यायालयात असे खटले निकालात निघण्याकरिता, आरोपीला जबर शिक्षा मिळण्याकरिता संघटितपणे कार्य करायला हवे. अन्यथा सठीसहामाशी होणारी अशी कृत्ये नित्याची होतील आणि वृत्तपत्रात पहिल्या पानावर झळकणाऱ्या या बातम्या हळूहळू आतमध्ये कोठेतरी कोपऱ्यात जाऊन बसतील.



# ऐतिहासिक वारसा लाभलेले कराड शहर

किशोर पाटील
किरण पाटोळे
श्रीकांत गोतपागर
सुजित डूबल
बी. ए. भाग २ व ३

कराड हे शहर कृष्णा कोयनेच्या संगमावर पुणे-बंगळूर महामार्गावर वसले आहे. कराडच्या वायव्येला ९ किमी अंतरावर वसंतगड, ईशान्येस ६ किमी. वर सदाशिवगड व आग्नेयेस ६ किमी. वर आगाशिव डोंगर आहे.

महाभारतातील उल्लेखानुसार कराड हे युधिष्ठीराच्या 'राजसूय' यज्ञाच्यावेळी दक्षिण दिग्विजयात सहदेवाने जिंकलेले नगर हाते. या स्थानाला अनेक पौराणिक संदर्भ लाभलेले आहेत. कराड हे आदिक्षेत्र असल्याचे ही मानले गेले आहे. 'स्थान माहात्म्य' या उपलब्ध ग्रंथात या परिसरातील तीर्थस्थानांचे वर्णन केलेले आढळते. या स्थानाच्या नावाबाबत 'करहटक', 'करहाकड', 'करहाट देश','करहाड' व 'करहाट' असे उल्लेख मिळतात.

कराड परिसरात प्रागैतिहासिक कालीन मानवी वसाहतीचे पुरावे मिळाले आहेत. या कालखंडातील मध्याश्मयुग व उत्तर अश्मयुगीन हत्यारे, अवजारे यांबरोबरच ताम्रपाषाण युगीन अवशेषही पुरातत्त्वतज्ञांना मिळाले आहेत. तेथील उत्खनन पुरातत्त्वीय सर्वेक्षण आहत नाणी (इ. स. पूर्व ५ वे शतक) या स्थानाचा सतत विकास झाल्याचे स्पष्ट करतात.

कराडच्या 'पंताचा कोट' या परिसरात सन १९४९ मध्ये पुण्याच्या 'भारत इतिहास संशोधन मंडळाने' केलेल्या उत्खननात 'सातवाहनपूर्व' आणि 'सातवाहनकालीन' मानवी वसाहतीचे अवशेष प्राप्त झाले आहेत. त साधारणपणे इ.स.पूर्व २००ते इ. स. २०० या काळातील आहेत. 'वलयांकित विहीर' (रिंग वेल), 'पायऱ्यांची विहीर' (स्टेप वेल) याबरोबरच घरातील दैनंदिन उपयोगाच्या वस्तू, घराच्या छताची कौले, तत्कालीन अलंकारासाठी उपयोगात येणारे विविध आकाराचे व प्रकारचे मणी, रेड जॅस्पर, स्फटिक व शंख हस्तिदंत, हाडे त्याच्यापासून बनविलेल्या वस्तू मिळाल्या आहेत. तसेच सातवाहन कालीन नाणीही सापडली आहेत. या सापडलेल्या रोमन बनावटीच्या पदकावरुन या शहराच्या रोमशी व्यापारी संबंध असल्याचे स्पष्ट होते. अर्थात तेथे करण्यात आलेले उत्खनन अत्यंत मर्यादित स्वरुपाचे होते. कराडचा प्रथम उल्लेख 'मध्यप्रदेशातीनल भारहुत स्तूपाच्या वेदिकेवरील शिलालेखात' आढळतो. या वेदिकेच्या उभारणीसाठी दान देणाऱ्या दात्यांपैकी काही दाते कराडचे होते. या शृंग 'सातवाहन कालीन' शिलालेखात कराडची नोंद करहकट अशी आली आहे. तर 'कुडा बौद्ध गुंफालेखात या स्थानाला 'करहाकड' म्हणून संबोधले आहे.

बदामीचे चालुक्य, राष्ट्रकूट व कल्याणीचे चालुक्य या घराण्यांचा अंमल कराड शहरावर होता. याचे इतिहासात पुरावे सापडतात.

**कराड येथील स्मारके :**

**पंताचा कोट** - 'पंताचा कोट' या सभागृहाच्या पूर्वेकडील बाजूस टोकाला 'भवानीदेवीची छत्री' आहे. या सभागृहाच्या छतावर जाळीदार नक्षीकाम केले आहे. ही वास्तू १८०० च्या सुमारास 'परशुराम श्रीनिवास प्रतिनिधीची आई काशीबाई' हिने बांधण्यास घेतली. सभागृहाचे बांधकाम मात्र प्रतिनिधींच्या

वडिलांनी पूर्ण केले. आज हा परिसर बदललेला असून संपूर्ण भवानीदेवी मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला आहे.

**पाय विहीर** - कराडमध्ये पंताच्या कोटाच्या शेजारीच एक पाय विहीर असून स्थानिक लोक तिला 'नकट्या रावळाची विहीर' असे संबोधतात. ही विहीर कोयना नदीच्या पात्रापासून सुमारे २४.४ मी. उंचीवर आहे. विहिरीत उतरण्यासाठी ८२ पायऱ्या आहेत. या विहिरीचे बांधकाम दगडी चिरे व चुन्यात केलेले आहे. या विहिरी बाबतची नोंद १७५० मध्ये आढळते.

**मशीद** - कराडचे वैशिष्ट्य म्हणून मशिदीचा उल्लेख करावा लागतो. येथे असलेल्या अरबी शिलालेखावरुन स्पष्ट होते की, विजापूरचा सुलतान अली आदिलशाह पहिला (सन १५५७ ते १५८०) याच्या काळात ही वास्तू इब्राहिम खान याने उभारली व पहिलवान अलिबित महम्मद इसफ हानी याने प्रत्यक्ष काम करुन घेतले. मशिदीच्या पुढे नव्याने उभारण्यात आलेल्या मंडपामुळे सध्या मुळातील दर्शनी भाग झाकला गेला आहे.

**प्रीतिसंगम** - कराडजवळ पश्चिमेकडून येणारी कोयना नदी व उत्तरेकडून येणारी कृष्णा नदी यांचा संगम झालेल्या पवित्र स्थानाला प्रीतिसंगम असे संबोधले जाते. येथून सूर्योदय व सूर्यास्त पाहण्यासारखा असतो. दि. २५ ऑक्टोबर १९८४ रोजी स्व. यशवंतराव चव्हाण यांचे निधन झाल्यावर २७ नोव्हेंबर १९८४ रोजी याच स्थानावर त्यांचा अग्निसंस्कार करण्यात आला. आता या स्थानाचा विकास करुन तेथे यशवंतरावांची समाधी व उद्यान उभारण्यात आले आहे.

**वेणूताई चव्हाण प्रतिष्ठान वस्तुसंग्रहालय** - वेणूताई चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने वस्तुसंग्रहालयाला आदर्श ठरावी अशी वास्तू येथे उभारण्यात आली आहे. व त्यामध्ये यशवंतरावांनी जमा केलेली संपूर्ण ग्रंथसंपदा, तसेच त्यांना वेळोवेळी भेट मिळालेल्या मौल्यवान कलावस्तूंचा संग्रह ठेवण्यात आला आहे.

**कराड लेणी** - कराडपासून जवळच प्राचीन काळी डोंगरात कोरलेली ६५ पेक्षा अधिक लेणी आहेत. त्याची स्थलसापेक्ष तीन गटात विभागणी केली जाते. इ. स. १८५९ मध्ये सर बार्टल फ्लेअर यांनी या लेण्यांची पहिली नोंद करुन पुढील तीन गटात विभागणी केली आहे.

१) जखिणवाडी लेणी - जखिणवाडी येथील डोंगरांच्या दक्षिणेकडील बाजूच्या एकूण २३ लेण्यांचा यात समावेश होतो.

२) आगाशिव लेणी - जखिणवाडी येथीलच आगाशिव डोंगराच्या एका कड्याच्या उत्तरेकडील बाजूस असलेल्या १९ लेण्यांचा यात समावेश होतो.

३) या गटातील लेणी आजूबाजूस विखुरलेली असून कोयना खोऱ्याकडे तोंड करुन आहेत. त्यांची संख्या एकूण २२ आहे.

अशाप्रकारे कराड शहराला प्रदीर्घ ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे.

## पैसा खिशात ज्याच्या....

पैसा खिशात ज्याच्या त्यालाच मान आहे
देशात लाच खोरी नेता महान आहे
आले जमून ते राष्ट्राच्या प्रबोधनाला
अन् सत्यवर्तनच त्यांना अजाण आहे
शोषून रक्त हे फुगलेत जळवा परी ते



कंठामध्ये तयांच्या अजुनी तहान आहे
ते गोड बोल त्यांचे खोटेच हास्य ओठी
हासू वरवरचे ज्याच्या मनात घाण आहे
जागे असूनही घेती सोंग झोपल्याचे
नि विकावयास देशा त्यांचा इमान आहे.

**- विजय वेताळ**
बी.एस्सी. भाग ३ (रसायनशास्त्र)

# जाहिरात आणि स्त्रीप्रतिमा

**कु. सुनिता पाटील**
बी. ए. भाग २



'और ये रही माँ जी की चाय !!! आह..मेरी कमर !' 'किसीने बहू की आह भी सुनी?' ही जाहिरात 'मूव्ह' ची . दूरदर्शनवर साधारणपणे दिवसातून किमान एकदा तरी आपण ही जाहिरात पाहत असू.

या जाहिरातील स्त्री ही कोणाची पत्नी, कोणाची सून, कोणाची भावजय या नात्यानं सेवा करत आहे. हे करताना ती स्वत:ला पूर्णपणे विसरून गेली आहे. तिला स्वत:कडे, स्वत:च्या वेदनांकडे लक्ष द्यायला वेळच कुठे आहे? भारतीय स्त्रीचं हे प्रातिधिनिक रुप. आजच्या भाषेत 'रोल मॉडेल'.

कुटुंबातील कर्त्या स्त्रीचं महत्त्व वादातीत आहे. भारतीय संस्कृतीचं वैशिष्ट्य असणाऱ्या कुटुंबपद्धतीचा पायाच जणू स्त्रीच्या त्यागावर आहे. कुटुंब एकत्र राहण्यासाठी आरोग्यपूर्ण होण्यासाठी, कुटंबातील प्रत्येकाचा विकास होण्यासाठी स्त्रीला खूप कष्ट घ्यावे लागतात. पण म्हणून त्याला काही मर्यादा?

कुटुंबातील इतर सर्व धडधाकट मंडळी त्यांचे त्यांचे कार्यक्रम विनाव्यत्यय पार पाडताहेत. त्यांच्याकडे लक्ष देता देता ती स्त्री मात्र थकून गेली आहे. परिणामी तिची कंबर दुखतेय आणि तिच्या तोंडून वेदनेचा हुंकार बाहेर पडतो.

मग मात्र या तमाम मंडळींना तिच्या आपल्यासाठी चाललेल्या महान त्यागाची आठवण होते. मग सगळे मिळून तिला आवश्यक असणारे वेदनाशामक ठरवितात. मग हे मुव्ह आणि कुटुंबियांचं प्रेम यामुळे ती दहा मिनिटांत बरी होते आणि.. पुन्हा सेवेला तयार !!!

एका साबणाची अशीच जाहिरात आहे. बहुधा हॉस्टेलमधे राहणाऱ्या त्या दोन कन्या. एक दुसरीला म्हणते, 'हा साबण वापर तुझा सावळा रंग १५ दिवसात गोरा होईल'. पैज लावून सांगते. आता या सावळ्या मुलीने पैज तर काय लावावी ? मला अमुक पुस्तक दे? मला तमूक पिक्चर दाखव? माझी फी तू भर? छे, असले काही नाही. ती चक्क म्हणते, 'अगर ऐसा हुआ तो तेरा बॉयफ्रेंड मेरा' असे पाहिल्यावर आज बॉयफ्रेंड मागते उद्या नवरा मागेल का? असा प्रश्न पडतो. काय आदर्श घ्यायचा अशा अश्लील नसल्या तरी अश्लीलतासूचक जाहिरातीमधून!

एका जाहिरातीमध्ये दुचाकी गाडीवर ती लिफ्ट मागते. तोंडभरुन हेल्मेट घातलेला तिला मागे बसवून घेतो. दुचाकी वेगाने धावू लागते. त्याचे ते 'रायडिंग' बघून ती पोरगी दुचाकीच्या पुढील टाकीवर येवून बसते. तिचा स्टॉप येतो. ती खाली उतरते. तो डोक्यावरचे हेल्मेट काढतो. तर चक्क पांढऱ्या मिशा झालेले, डोक्यावर टक्कल पडलेले साठीचे म्हातारबाबा. आणि ती कपाळावर हात मारून घेते. प्रश्न असा पडतो की तिला लिफ्ट हवी होती का गंमत जंमत करायला एक पार्टनर हवा होता? तिच्या अपेक्षेप्रमाणे एखादा राजकुमार असावा असं वाटणं साहजिकच असेल पण एखाद्याचा चेहराही न पाहता त्याच्याशी असं जवळीकपणानं वागावं, इतकी स्त्री स्वस्त आहे?

आता ही जाहिरात क्रॅकची ! 'ये छोटी छोटी दरारे आपके रिश्ते में बडी दरार बन सकती है!' यात तो त्याला आवडलेल्या मुलीला पैंजण घालणार आहे. म्हणजे तो तिला पसंत करणार आहे. म्हणून सगळ्या गोपिका तो जणू कृष्ण असल्यासारख्या त्याच्याभोवती नाचताहेत. या सगळ्या सजल्याधजल्या आहेत बाहुल्यांमधून एक बाहुली आवडली आहे.

पण तिच्या चेहऱ्याला सौंदर्य प्रसाधनांचे लेप लावता लावता तिचं पायांकडे दुर्लक्ष झालंय. आता हा तिचा अपराधच. हे क्रीम लावल्यावर भेगा गायब! पुन्हा ती त्याच्याभोवती नाचायला तयार, की पसंतीचं पैंजण तिलाच. किती कृतकृत्य होतय तिला. जणू मोठं युद्धच जिंकलय तिनं!

आता यात 'तो' कोण? त्याचा वकूब काय? हे गुलदस्त्यातच! की केवळ पुरुष असणं एवढं 'क्वालिफिकेशन' त्याला पुरेसं आहे? स्त्री ही एखादी वस्तू असल्यासारखी जी अजून त्याची कोणीच नाही, तिला पायापासून न्याहाळण्याचा त्याला हक्क कुणी दिला? भेगा असणं, हा काय गुन्हा झाला? की वस्तू खरेदी करताना तिला भेगा, तडे नाहीत ना याची खात्री केली जाते. तसचं स्त्रीचेही? पण मग तिच्या व्यक्तिमत्त्वाचं काय?

समाजात ही जी मोठी 'दरार' तयार होत आहे. स्त्रीकडं पाहण्याचा दृष्टिकोन प्रगल्भ होण्याऐवजी एक भोगवस्तू असा होतो आहे. त्याचा विचार आपण कधी करणार आहोत? निकोप समाजाला हे घातक आहे, अस आपल्याला वाटणार आहे की नाही?

या सर्व जाहिरातीतून स्त्रीने सुंदर असावं-दिसावं, तिनं सर्वांची मनोभावे सेवा करावी. तिनं एकूणच स्त्री म्हणून वावरताना पत्नी, सून, भावजय, आई इ. नात्यांना 'फिट' होईल असं असावं हे बिंबवलं जातं.

साधी राहणी, उच्च विचारसरणी हे विचार मागे पडले. शिक्षणासाठी, व्यवसायासाठी, नोकरीसाठी दिवसातले आठ दहा तास बाहेर रहावं लागणाऱ्या स्त्रीला उत्साह, प्रसन्नता वाटावी म्हणून थोड्याफार बाह्य सौंदर्य साधनांची आवश्यकता आहे ही, पण म्हणून तेच ध्येय व्हावं?

मग या सुंदर दिसण्याच्या नादात 'दो मिनिट में' तैयार होणारी कसलीही पोषणमूल्य नसणारी फास्टफूडच खावी लागणार आणि बाजारात मिळणारी आरोग्याला हानिकारक शीतपेयच प्यावी लागणार.

एकविसाव्या शतकात प्रवेश करताना आपण स्त्रीकडे कोणत्या नजरेतून पहात आहोत हे तपासायला हवं. स्त्रीच जर स्वत:ला पुरूषांच्या नजरेतून पहात असेल तर काय बोलणार? मुळात स्त्रीने स्वत:च स्वत:ला आहोत तसं स्वीकारलं नाही तर इतरांनी स्वीकारायची अपेक्षा कशी ठेवता येईल?

स्त्री आता बाहेरच्या जगात रुळलीच आहे. हे पाऊल पुन्हा मागं पडणं शक्य नाही. फक्त आता स्त्रीकडे माणूस म्हणून पाहण्याची सवय आपल्याला आपल्या पुढच्या पिढीला लागायला हवीय. दृष्टिकोन बदलायला हवाय.



## जीवन म्हणजे

जीवन परमशक्तीच वत्सल स्मित असते
प्रीती हे त्याचे मधुर गीत असते
जीवन अमृताचा वेध घेत असते
हालचाल ही त्याचा पाया असते
जीवन स्वप्न पाहण्याचा आनंद असतो
निद्रा ही त्याची मूळ असते
जीवन सुख-दु:खाच्या पाठशिवणीचा खेळ असतो
यशा-पयशाची त्याला साथ असते
जीवन भविष्याच्या गरूडपंख्याचं वरदान असते
आत्मविश्वासाची त्याला गरज असते
जीवन सात सूरांचे मिलन असते म्हणूनच,
मृत्यू ही त्याची राग व्यक्त करण्याची रीत असते.

**- कु. जयमाला गायकवाड**
बी.ए. भाग ३

# स्त्रीगीतांचे गुप्तधन

**किशोर पाटील**
बी. ए. भाग २

कॉलेजमध्ये नोटीस आली, की 'सद्गुरू' नियतकालिकासाठी उपयुक्त लेखनसाहित्य विद्यार्थ्यांनी जमा करावे. त्यावेळी घरी गेल्यानंतर माझ्या आजीशी चर्चा केली असता तिने मला अनेक ओव्या ऐकविल्या. त्याआधारे ग्रामीण स्त्रियांच्या जीवनावरती काही लिहावेसे वाटले.

पूर्वी ग्रामीण भागात एकत्र कुटुंबपद्धती अस्तित्वात होती. ती आजही काही ठिकाणी असलेली दिसून येते. तत्कालीन स्त्रियांच्या जीवनामध्ये आपल्या दिनचर्येत ठराविक कामेच ठरलेली असत. पुरुषप्रधान संस्कृती असल्याने स्त्रिया घराबाहेर पडत नसत. ग्रामीण भागात पीठगिरणी नव्हती त्यामुळे त्यांना पहाटे उठून घरामध्ये असणाऱ्या जात्यावरती दळण दळावे लागत असे. त्यावेळी त्या आपला थकवा घालविण्यासाठी कामात रुची निर्माण होण्यासाठी जात्याच्या आवाजाबरोबर ओव्या गात असत.



सकाळ उठूईन दार उघडती नेट नेट
तोळशी वट्यावर कृष्ण घालीतो फेटं
सकाळ उठूईन हात दाराच्या बाहिला
तोळशी वट्यावर कृष्ण मी पाहिला.

सकाळी दळण दळून झाल्यानंतर घरातील अंगण, परसदार येथील झाडलोट, गुरांच्या धारा, स्वयंपाक इ. कामे त्यांना करावी लागत. सकाळी उठल्यावर झाडलोट, अंघोळ झाल्यावर तुळशीची पूजा करत. तुळशीला त्या दैवत मानतात. तुळशीला पाणी घालणे त्या आपला धर्म मानतात. पतिव्रता स्त्री तुळशीचे पूजन करते हे पुढील ओव्यामधून स्पष्ट होते.

तोळशीला पाणी घाली तुळस वाड्याच्या वर गेली
पतिव्रतेने सेवा केली
तोळशीला पाणी घाली हाय तुळशीखाली झरा
हाच पतिव्रतेचा नेम खरा
तोळशीला पाणी घाली अनुसया ती अनुबाई
दर्शनाला तिच्या चंद्र सूर्य उभा राही.

स्त्रियांमध्ये देवाविषयी श्रद्धा असल्याचे दिसून येते. देवाच्या यात्रेला जाण्यासाठी जरी बरोबर कुणी नसले तरी देव आपल्याबरोबर आहे, असे त्या समजतात. देवाच्या दर्शनाने आपणास मनाजोगं तीर्थ घडेल असा त्यांना विश्वास आहे.

पंढरीला जाता मला संगती नाही कुणी
पुढे विठ्ठल मागं जनी

सकाळच्या कामातून सुटका झाल्यानंतर त्या शेतात जातात. सासू सासरे यांच्यानंतर त्या घरातील थोरल्या पुरुषांच्या आज्ञा मानतात. आई-वडील, माहेर विसरुन सासरी सुखाने संसार करतात. संध्याकाळीही शेतातून आल्यानंतर भात कांडणे इ. कामे ठरलेली असतात. या सर्व व्यापातूनही आपल्या मुलाबाळांच्या संगोपनात कोणतीही कसर सोडत नाहीत. आपल्या मुलाला दृष्ट लागेल म्हणून त्याला जास्त नटवण्याच्या फंदात त्या पडत नाहीत.

सावळ्या सुरतीला लई नटावं लागयीत
माझ्या ग बाळराज गोऱ्यापणाव भागईत

स्त्रियांना आपल्या अपत्यांमध्ये मुलापेक्षा मुलीविषयी जास्त प्रेम असल्याचे दिसते.

घरातील शुभसमारंभास वयाने थोरलया असणाऱ्या

व्यक्तींना त्या मानाचे स्थान देतात. लग्नकार्याच्या समारंभात त्या सर्व एकत्र आलेल्या असतात. त्यामुळे विनोद, उखाणे इ. गोष्टीतून आनंद उपभोगतात. शुभकार्याच्या ठिकाणी देवाची उपस्थिती असावी असे त्यांना वाटते.

त्या म्हणतात.

लगीनचिठ्ठी कुलस्वामीला आधी लिवा
राजा तांदळाला हवा
मांडवाच्या मेढी मागं म्होरं सारा
गणेशाला जागा करा
मांडवाच्या दारी आला गणपती धाऊनी
संगे सारजा घेउनी

लग्नाच्या आहेरात बंधूंचा आहेर सोयऱ्याच्या आहेरापेक्षा मोलाचा वाटतो.

सोयऱ्याच्या आयऱ्याची घडी ठेविली खुंटीवर
बंधूंच्या आयराचा पदर जरीचा पाठीवर
मुलगी सासरला जाताना तिला म्हणतात
सासरला जाती तुझ सासर लांब पल्ला
माझी ग मईना फिर मागारी भेट मला

मुलगी ही दुसऱ्याच्या घरी संसार करण्यासाठी जाणार असल्याने आईची माया मुलापेक्षा मुलीवरतीच असते.

लेकापरास लेकी मईनाची मया येती
परघराला राधा जाती
लेकी चांगूल तूझ पण झाली सायऱ्याची धन
माझा ग बाळ चंद्रवाड्याला राखायण

उचकी जरी लागली तरी त्या मुलीच्या आईला वाटते की, आपल्या मुलीनेच आठवण काढली असावी त्यावेळी ती उचकीला उद्देशून म्हणते

उचकी लागली उचकी देती तुला पाणी
माझ्या ग मईनानं सई केलीया कुण्या रानी

अशा प्रकारच्या असंख्य ओव्या त्यांच्या मुखात आहेत. त्यापैकी काही मोजक्याच मी लिहिल्या आहेत. त्या म्हणाल्या की अजूनही अशा बऱ्याच ओव्या आमच्याकडे आहेत. जवळजवळ एक वही भरेल इतक्या ओव्या मी सांगू शकेन. तेव्हा मला असे वाटते की त्यांच्याकडे असणारे हे अनमोल साहित्य एखाद्या प्रतिभावंत कवीच्या साहित्याच्या तोडीचे आहे. परंतु त्याकडे दुर्लक्ष होत आहे. खर तर ग्रामीण भागातील स्त्रियांच्या मुलाखती घेऊन , ग्रामीण भागातील खेड्यांना भेटी देऊन तेथील स्त्रियांजवळ असणारे हे अनमोल, अर्थपूर्ण साहित्य संग्रहित करुन ग्रामीण भागातील स्त्रियांची सुख:दु:खे, भावभावना, आशा आकांक्षा याची माहिती समाजास होण्यासाठी प्रसिद्ध करायला पाहिजे.

## येणार आहेस तर...

येणार आहेस तर.....
पहाट होऊन ये
किलबिलणाऱ्या पाखरांना
जागे करण्यासाठी
येणार आहेस तर....
फूल बनून ये
मनाच्या अंतरंगावर
सुगंध पसरविण्यासाठी
येणार आहेस तर....
सागर होऊन ये
अथांग लाटाप्रमाणे
खडकांवर उसळण्यासाठी
येणारच आहेस तर.....
माझा बनून ये
प्रत्येक सुखदु:खात
समरस होण्यासाठी.....

**अमिता रणभिसे**
बी.ए. भाग ३

# साहित्य संमेलनाकडून माझ्या अपेक्षा

**कु. माधुरी मोरे**
बी. एस्सी. २



'साहित्यसंमेलन' म्हणजे नक्की काय? साहित्य संमेलनांनी नक्की काय दिले? गर्दी, टाळ्या, माणसे म्हणजे संमेलन नव्हे तर या साहित्यसंमेलनातुन कितीजण वाचते झाले. कितीजण लिहिते झाले. याचा विचार करणे गरजेचे आहे. 'विचारधन' हा शब्द कुणी सैलपणे वापरु नये. खर तर साहित्यसंमेलनातून विचार रूजत असतात. स्नेह निर्माण होत असतो, माणसांची विचारांची देवाणघेवाण होते आणि एक फुलपंखी व्यक्तिमत्व जन्माला येते. साहित्याचा जन्म हातो. लेखकांचे, कवींचे 'शब्द' म्हणजे सामर्थ्य असते. जसं की केशवसुतांनी म्हटलच आहे.

एक तुतारी द्या मज आणूनि
फुकि न ती मी स्वप्राणाने
भेदून टाकीन सारी गगने
दिर्घ तिच्या त्या किंकाळीने'

या त्यांच्या शब्दांतच केशवसुतांची दृढ इच्छा दिसून येते.

बघा ना, एका पाठोपाठ 'सातारा साहित्यसंमेलन' , ' आपलं साहित्यसंमेलन' व ' अखिल भारतीय साहित्य संमेलन' थोड्या थोड्या दिवसांच्या अंतरावर भरविण्यात आली. ही वेळ आपल्यावर का यावी? अर्थातच आपण साहित्यापासून खूप दूर गेलो आहोत. त्यालाही कारण आहे. ते म्हणजे जागतिकीकरण व वैज्ञानिकीकरण.आजच्या जगात माणूस पैशाभोवती फिरतो आहे.

पैसा पाहिजे पैसा पैसा हाच देव
पैशासाठी असेल ते विक्रीसाठी ठेव

मग भले ते साहित्य का असेना।

आजच्या या धकाधकीच्या जीवनात माणसाला दैनेदिन जीवनाच्या रहाटगाडग्यातून डोकं वर काढायला वेळ नाही. आणि त्यातूनही वेळ मिळालाच तर दूषित दर्शन, संगणक, व्हिडीओ गेम्ससारख्या अनेक सुविधा हजरच असतात. घरबसल्या एवढे शॉर्टकट्स असताना साहित्याची आठवण कशी येईल? म्हणून ही आठवण करून देण्याच महत्त्वाचं काम या साहित्यसंमेलनांनी केलं पाहिजे.

आज २१ व्या शतकाकडे पदार्पण करताना आपण जुन्या चालीरीती, रुढी परंपरा, अज्ञान अंधश्रद्धा यांची जळमटे बाजूला सारतच आहोत. काही गोष्टी अशा असतात की त्या कालांतराने कालबाह्य होतात. जसं की माणसाचं शेपूट! पण काही गोष्टी 'जुन ते सोने आणि नवं ते हवं' अस म्हणत पुढं जपाव्याच लागतात. आपण साहित्यालीही कालबाह्य केलं, नव्हे तर पूर्णपणे विसरुन गेलो आहोत. त्याचीच जाण या साहित्य संमेलनांनी करून दिली.

परंतु ही साहित्यसंमेलनं साजरी होतात. दोन तीन दिवस थाटमाट होतो. काही ना काही तरी त्रुटी निघतातच. आणि आमच्यापुढे विषय येतो 'साहित्यसंमेलनाकडून माझ्या अपेक्षा!.

साहित्यसंमेलनातून म्हणजेच साहित्यातून किंवा लोकसाहित्यातून आपली संस्कृती दिसून येते. म्हणजे साहित्य हा ज्या त्या समाजाचा आरसा आहे. म्हणूनच की काय एका समीक्षकानं म्हंटलय की,

Literature is the mirror of life

पण जेव्हा अशा साहित्यसंमेलनातून न ऐकविणारं अश्लील दर्शन घडतं तेव्हा आम्ही या साहित्यसंमेलनातून काय शिकावं? जेव्हा आमचेच ज्येष्ठ जाणकार कवी स्त्रीला 'रंगीत पुरवणी' ची उपमा देतात तेव्हा या साहित्यसंमेलनातून आम्ही काय घ्यावं? जेव्हा स्वागताध्यक्षांचीच भाषणे साहित्यिकांपेक्षा दर्जेदार ठरतात आणि लोक साहित्यिकांपेक्षा चित्रपट सृष्टीतील अभिनेत्यांवर तुटून पडतात तेव्हा आम्ही या साहित्यसंमेलनाला काय म्हणावं? 'साहित्यसंमेलन की तीन दिवसांचा जुलूस'?

मला आता हेच कळत नाही की, साहित्यसंमेलनांच अध्यक्षपद द्यायला निवडणुका कशाला घ्यायला हव्यात? २८८ दर्जेदार साहित्यिकांपैकी आपण एकही साहित्यिक सामंजस्याने अध्यक्षपदासाठी निवडू शकत नाही काय? मग अशा निवडणूकीतूनच आपणाला दया पवारांसारख्या साहित्यिकांना मुकावे लागत आहे. आम्हाला स्वागताध्यक्ष चांगले मिळू शकतात. मग साहित्यिक का नाही? मग आमच्या साहित्यिकांमध्येच काही कमतरता आहे की काय? हा प्रश्न उमटल्याखेरीज रहात नाही.

बऱ्याचशा साहित्य संमेलनामध्ये राबवणुकीचा भर मान्यवरांच्या मानपानावर जास्तीत जास्त दिलेला असतो. मग त्यात त्यांचं उठणं, बसणं, खांणं पिणं सर्व काही आलच. मग साहित्यसंमेलन नक्की लोकांसाठी की त्यांच्यासाठी? माझ्यामते या साहित्यसंमेलनांनी विनाकारण खर्च करण्यापेक्षा आपली गुणवत्ता वाढवावीं कारण,

'आज मिळे ते उद्या नसे
उमटून राहतील हे शब्दांचे ठसे'

आपल्या साहित्यसंमेलनातून लोकांना काय मिळाले? त्याचा त्यांना किती फायदा झाला? याकडे कटाक्षाने लक्ष द्यायला हवे.

साहित्यसंमेलनासाठी पैसा खर्च करायला हवा. हे मान्य आहे मला ! परंतु पाण्यासारखा पैसा किंवा पैशाची उधळण करू नये. कारण ते राष्ट्रीय धन आहे. सरकार एकीकडे धरणग्रस्तांच्या अडचणी 'तिजोरीत पैसा नाही ' म्हणून दूर सारतय आणि दुसरीकडे दीड कोटी रुपयांची अफरातफर होते हे तुम्हाला पटतयं का?

आणि ज्यावेळी अनेक गोष्टी विरोधात्मक होतात, त्यावेळी साहित्यसंमेलन राजकारणाचे रूप घेते. राजकारणी लोकांचं मधल्यामधे साधतं. पुस्तकांची दुकाने, खाण्याच्या पदार्थांची दुकाने यातून धंदा होतो आणि मग आम्ही या साहित्यसंमेलनाला नक्की समाजकारण म्हणावं की राजकारण की अर्थकारण? यातून मी एवढेच नमूद करु इच्छिते की साहित्यसंमेलनामध्ये धंदेवाईकपणा नको.

बऱ्याचशा मोठ्या साहित्यसंमेलनामध्ये बहुधा उच्चभ्रू लोकांनाच स्थान दिलं जातं. मग त्यामध्ये ५० ब्राह्मण व त्यातलीही १४ जोडपी! 'साहित्य' हे समाजातील ठराविक घटकांसाठी नसून सर्व प्रवाहांसाठी आहे. म्हणूनच अशा साहित्यसंमेलनांना माझा कडाडून विरोध आहे. कारण त्यात कुठं मला माझी राबणारी आई दिसली नाही की रस्त्यावर खडी फोडणारा कामगार दिसला नाही. दिसली ती फक्त एकमेकांना हिणवण्याची दुर्भावना! अजूनही त्यांनी त्यांचा दृष्टिकोन बदलावा अशी माझी अपेक्षा आहे.

अजून एक गोष्ट मला कटाक्षाने जाणवली ती म्हणजे प्रत्येक साहित्यसंमेलनामध्ये तेच तेच कवी व त्यांच्या त्याच त्याच त्या कविता! कुठे तरी नवोदित कवी व नवोदित लेखक यांनाही वाव मिळायला हवा. फक्त 'कवी कट्टा' केला म्हणजे सर्वकाही झाले असे नव्हे. 'मीच माझ्या कवितेचा एकमेव श्रोता' ही दुर्दशा होऊ नये.

याही पुढे जाऊन मला असं म्हणावेसे वाटतं की, आता साहित्यिकांचा दृष्टिकोनही बदलायला हवा. कारण इतर गोष्टींप्रमाणे आता साहित्यही म्हणावं तेवढ रुचकर राहिलं नाही. थोडक्यात पटवून द्यायचं म्हंटलच तर..

पुतळे उभारून
खरच स्फूर्ती मिळते का?
सरावाचे झाल्यावर
नजर तरी वळते का?

अशी अवस्था साहित्याची झाली आहे ज्ञानेश्वरांच्या एका ओवीवर कितीजणं पीएच डी करणार? विद्यार्थ्यांनाही त्यामध्ये आता रस राहिलेला नाही. केवळ परीक्षार्थी म्हणून ते त्याच्याकडे पाहत आहेत. जसं की मुक्ताई २२ गुणांना आहे मग जाऊ दे. ज्ञानश्वर ५० गुणांना आहे तोच करु. म्हणजेच साहित्यामध्ये हवी तेवढी गोडी नाही. बाल व युवा साहित्य मोठ्या प्रमाणात व दर्जेदार तयार व्हायला हवे. कारण उद्याच्या भावी पिढीची बीजे त्यातच रोवली आहेत.

लोकांनीही साहित्याकडे तेवढ्याच तन्मयतेने पहायला हवं. प्रत्येक साहित्यसंमेलन हे 'आपलं साहित्यसंमेलन' अशी आपुलकीची भावना असायला हवी. वाढदिवस, लग्नसमारंभ अशा प्रसंगी महागड्या भेटवस्तू देण्यापेक्षा 'पुस्तक' भेट देऊन साहित्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी. पुस्तकांची प्रदर्शने केवळ साहित्यसंमेलनावेळीच न ठेवता इतर वेळीही असावीत. तसेच नवीन पुस्तकांची, साहित्याची माहिती करुन देण्यासाठी माहितीकेंद्रे असावीत. म्हणजे जास्तीत जास्त लोक साहित्याकडे वळले पाहिजेत.

नाहीतर दरवर्षी संमेलने होतात. लोक येतात, गर्दी होते, दोन तीन दिवस संमेलनाचे वादळ उठते आणि काही दिवसात ते शांतदेखील होतं. असं न होता, प्रत्येक साहित्यसंमेलनाच्या पाऊलखुणा मागे रहावयास हव्यात. कारण मराठीचं भवितव्य हे मराठी माणसाच्या भवितव्याशी जोडलेलं आहे. म्हणूनच शेवटी म्हणावसं वाटतं की -

'सह्याद्रीच्या कडेकपारीतून पुन्हा गरजेल मराठी ...
शिवबाची तलवार होऊन बिजलीसम चमकेल मराठी...
नवकवितेच्या अंगणातील गजफुलांची वेल मराठी...
जिथे अस्मिता मायमराठी, स्पंदन होऊन हृदयामाजी...
तिथल्या अस्सल मराठमोळ्या धमन्यामधून उसळेल मराठी...
तारा होवून चमकत राहील! धारा होवून बरसत राहील!
फुलाफुलातून बहरत राहील! हृदयातून उमलेल मराठी...!

# चारोळ्या

इतराशी आपलपण जपणं
मला खुप आवडतं
कारण तेच खरं
माणुसकीच दर्शन घडवतं

स्वप्न आणि सत्य यामध्ये
दुरावा दिवसरात्र आणतात
रात्रीवर स्वप्नाचा अधिकार
तर सत्य दिवसच जाणतात

प्रयत्नाच्या आकाशात उंच उंच
झेप घेण्याची असावी नशा
तरच आपल्याला मिळेल
यशाची खरी दिशा

देवळाच्या शिखरावर कधी दिवे
झळकताना दिसतात पण दुर्दैव
असे की त्याच देवळातले देव
कधी अंधारात बसतात.

**दिनेश सावंत**
बी.एस्सी भाग ३

## माय-माऊली

अजून का हो लागली नाही,
धार माझ्या अस्त्राला?
करेल का हो वार तो खा-आदीच्या वस्त्राला?
फाटक्या-तुटक्या चिंधेवर येईल का हो नवी घडी?
मनात साचली चिंतेची असंख्य माझ्या तळी,
होईल का घे तो लाल दिव्याचा मानकरी
करेल का हो भस्म भ्रष्टाचाराच्या रूपाला
चेहऱ्यावरची सुरकुती अन् माथ्यावरची आठी
होईल का हो दूर अन् येईल का हो हास्य,
उपाशी मी निजली घास सोन्याचा घातला,
माझ्या लेकराला मी चिरा-चिरा घडविला,
शिवबाची जिजा झाली अन् श्यामची आई,
तलवार आणि संस्कार यांचा मेळ घातला
माझ्या लेकराला मी चिरा-चिरा घडविला ॥

**- सुरेश इंगळे**
बी.एस्सी. भाग१

## बेकारी

कुणी पदवीधर झाला
कुणी कोर्स पूर्ण केला
बड्यांनी लावला जाम वशीला
गरीब तरूण गहाण राहिला
मुलाखत घेतात नावाला अनुसरून
दिखाऊ मार्कांना मिळते ॲडमिशन
मोकळे असतात आधीच जागा भरून
आतल्या अगांने चालते डोनेशन
गरीब तरूण भुकेचा आकांक्षी
जावे तिकडे नो व्हेकेन्सी
लावून बसतो शून्यात नजर
पोटासाठी करतो मजुरी
पण वाढते आहे बेकारी

**- श्रीकांत पाटील**
बी.एस्सी.केमिस्ट्री

## पण....

नाही केलेस प्रेम तरी चालेल
पण तिरस्कार मात्र करू नकोस
नाही काढलीस आठवण तरी चालेल
पण विसरून मात्र जाऊ नकोस
नाही बघितलेस तरी चालेल
पण पाहून न पाहिल्यासारखं करू नकोस
नाही दिलीस ओळख तरी चालेल
पण अनोळखीपण दाखवू नकोस
सोडून दिली साथ तरी चालेल
पण एकटा कधी राहू नकोस
सहन करीन मी सगळं
पण सहनशिलतेचा अंत पाहू नकोस
नाही केलास विचार माझ्या भविष्याचा तरी चालेल
पण भावनाशून्य होऊ नकोस.

**- कु. शर्मिला पाटील**
बी.ए. भाग २

## विरह

ह्दयात आशेच फू ल-पुन्हा फुलवावंस वाटत नाही
प्रेमात कुणाच्या पडून-पुन्हा मरावसं वाटत नाही ॥
मरण यातना खूप सहन केल्या-पुन्हा सहन शक्ती नाही
प्रेमात कुणाच्या पडून-पुन्हा मरण्याची धास्ती नाही ॥
मनाची सहनशक्ती खूप होती-आता ती राहिली नाही.
वृक्ष पूर्ण खचून गेला-त्याचा धरच सुटून गेला ॥
जिच्या प्रती होते आशेचे किरण-तिनेच सूर्य पदराआड केला
सप्तरंगी स्वप्ने दाखवून-हातावर दवबिंदूच ठेवला..... ॥

**- राजू गायकवाड**
बी.ए. भाग ३

# प्रीत

प्रेम का करावं
आजवर कळनं नाही
मनाजोगं गीत
आजवर जुळलं नाही
कुणावर करावं प्रेम?
खळखळणाऱ्या लाटेवर
निखळ झऱ्यावर,
वेळू वनातल्या शिळेवर
लाजणाऱ्या लाजाळूवर
भरारणाऱ्या पंख्यावर
छुन-छुनणाऱ्या पैंजणावर
गालावरच्या खळीवर
खोट्यानाट्या शपथांवर
जागणाऱ्या रात्रींवर
रडवणाऱ्या विरहावर
घडणाऱ्या भेटीवर
फुललेल्या कळ्यांवर
खुललेल्या चांदण्यांवरं
बेधुंद कोसळणाऱ्या पावसावर
हुडहुडी भरवणाऱ्या थंडीवर
जाळून टाकणाऱ्या उन्हावर
प्रेम करावं सगळ्या जगावर
पण प्रेम करू नये प्रियेवर,
कारण,
तिला प्रेम म्हणजे काय
हेच अजून कळलं नाही
म्हणूनच की काय!
मनाजोग गीत आजवर जुळलं नाही.

**- गोरखनाथ शेगर**
व्दितीय वर्ष-कला



# सखा माझा आला

सखा माझा आला
दारी मोगरा फुलला
मनातील अंतरंगी
त्याचा सुवास दरवळला ।।१।।
सखा येणार येणार
म्हणून वाट पहात होते
त्यांच्या उमद्या रुपाला
डोळे वाखाणीत होते ।।२।।
सखा येणार म्हणून
वाट पाहते मी अशी
सावन येण्याची वाट
मोर पाहतो जशी ।।३।।
सखा येताच जीवाला
झोंबला गार गार वारा
झुळझुळू वाहे जसा
डोंगरदऱ्यातील झरा ।।४।।
सखा माझा आला
आनंद मावेनासा झाला
असे वाटते मला
कृष्ण राधेचा आला ।।५।।
सखा जवळ येताच
नजर झुकली जराशी
चेहरा पदरा आड धरूनी
मी लाजले जराशी ।।६।।
सखा माझा आभाळ
त्याची खाली मी धरती
जशी क्षितिजावर झुकली
सूर्यबिंबाची गं ज्योती ।।७।।

**- कु. रईसा शेख**
बी.कॉम भाग २

# माघार घेऊ नकोस

जेव्हा तुला अनंत अडचणी येतील
जेव्हा तुझा मार्ग अत्यंत खडतर असेल
जेव्हा तुझ्या अपेक्षा जास्त असतील व
पाहिजे तसे यश मिळत नसेल
जेव्हा तुला चिंतेने ग्रासलेले असेल तेव्हा थोडा विसावा घे
पण माघार घेऊ नकोस......
जीवन चढ उतारांनी भरलेले आहे
जेव्हा तू काही मिळविण्यासाठी परिश्रम करीत असशील
तेव्हा कधी कधी अपयशही येईल
पण जर तू प्रयत्न करणे सोडलेच नाहीस,
तर तुझा विजय निश्चित आहे.
पण माघार घेऊ नकोस.....
आता जरी तुला तुझी प्रगती कमी वाटत असली
तरी पुढच्याच प्रयत्नात तू यशस्वी होऊ शकतोस
यश ही अपयशाची दुसरी बाजू आहे
जेव्हा बऱ्याच शंकामुळे आपल्याला यशाची शक्यता कमी दिसते
तेव्हा यशापासून आपण किती दूर आहोत.
हे आपण खरचं सांगू शकत नाही
यश खूप दूर आहे असे वाटते
तेव्हा ते खूप जवळ ही असू शकते
प्रयत्न करत रहा
पण माघार घेऊ नकोस......
जेव्हा तू प्रतिकूल परिस्थितीशी झगडत असशील
तेव्हा प्रयत्न करणे सोडू नकोस
जेव्हा परिस्थिती अत्यंत बिकट आहे असे वाटेल
जेव्हा प्रयत्नानीच तुला थकवा येईल
तेव्हा थोडा विसावा घे, पण माघार घेऊ नकोस
अजिबातच माघार घेऊ नकोस.....

**- दिनेश सावंत**
बी.एस्सी. भाग ३



# व्हॅलेंटाईन आला.....

परवा आमच्या कॉलेजमध्ये व्हॅलेंटाईन आला,
पोरांचा त्यांच्या भोवती घोळकाच झाला,
कँटीन पडले ओस सारे, कट्टे झाले वजा,
तो सांगू लागला त्याच्या प्रेमाच्या मजा,
भीतभीत एक, पुढं आला भरकन्,
प्रपोज कसे केलेस तू, तिला सांग चटकन्,
किती सांगू त्याला आनंद होता झाला,
प्रत्येकाला वाटलं माझा गॉडफादर आला,
'व्हॅलेंटाईन डे' च्या आठवणी सांगा,
दुर्दैवी प्रेमकथा सांगायला, लागल्या पोरांच्या रांगा,
तेवढ्यात तिथं एकच हल-कल्लोळ झाला,
एक प्रेमवीर होता रडत आला,
व्हॅलेंटाईन म्हणाला, 'बाळा सांग काय झालं?'
तो म्हणाला, 'माझं नशीबच मेलं फुटकं'
गुलाबाचं फूल मी, दिलं एका पोरीला,
तर तिनं एक राखी, बांधली माझ्या हाताला,
व्हॅलेंटाईन म्हणाला- 'तुमची करण्यासाठी मजा'
म्हणून तर 'व्हॅलेंटाईन डे' सुरू केला खरा.

**- शरयू पाटील**
बी.एस्सी भाग ३



## भारत माझा आहे

भारत माझा महान आहे
भारतवासी मात्र नंगा आहे
मंत्रिमंडळात रोज दंगा चालू आहे
त्याच्यामुळे लोकशाही सगळी पेटली आहे
आणि म्हणे भारत माझा महान आहे
कष्टकरी, कामकरी, शेतकरी
भाकरीसाठी रडत आहेत.
आणि आमचा नेता मात्र
चिकन-बाटली घेवून
गादीवर लोळत आहे
आणि म्हणे भारत माझा महान आहे.
परदेशी-परदेशी सर्वांना तोंडपाठ आहे
राष्ट्रगीत तेवढ विसरत आहे
जॅक्सनचा डान्स सर्वांना आवडत आहे
गांधीजींच कार्य मात्र पुस्तकांत पडलं आहे
आणि म्हणे भारत माझा महान आहे.
गरिबी हटावाचा बिल्ला लावून
पांढरा सदरा गल्ली गल्लींत फिरत आहे
मात्र आमच्या बेकारीच भविष्य काय आहे.
असलं कुचकामी आमचं सरकार आहे.
नारा किती छान आहे.
सर्वांत जास्त कर्जबाजारी
माझा 'भारत-देश' आहे
म्हणून भारत माझा महान आहे.

**- हेमंत लक्ष्मण पोळ**
बी.एस्सी. भाग २

## दुरावा

कोण कोठून आले
शिक्षणासाठी एकत्र जमले
स्नेह जमला
सहवास सुखाचा झाला
मौज मजा केली
स्नेहबंध जमले
शिक्षण पर्व संपले
दुराव्याचा क्षण आला
मन जड झाले
कंठ दाटून आले
कोण कोठे जाणार
कधी केव्हा भेटणार
समजत नाही.
कोठे गेलो तरी
विसरणे न व्हावे
स्नेह-प्रेम आहेच
तो वृध्दिगंत व्हावा

**अमोल कदम**
तृतीय वर्ष (कला)

## आठवणी

आठवणी आठवायच्या असतात
त्या कधी विसरायच्या नसतात
आठवणी जपायच्या असतात
त्या कधी पुसायच्या नसतात
आठवणी हृदयात ठेवायच्या असतात
त्या बोलून दाखवायच्या नसतात
आठवणी आठवत आठवत
आपणच त्यांच्या आठवणीत
राहायचे असते
आणि आठवणी त्यांनाही
आठवावयास लावायच्या असतात.

**झिमरे अमोल तानाजी**
बी.कॉम भाग १



# कनिष्ठ विभाग

'ज्यांची बाग फुलून आली
त्यांनी दोन फुले द्यावीत
ज्यांचे सूर जुळून आले
त्यांनी दोन गाणी गावीत ।
आभाळाएवढी ज्यांची उंची
त्यांनी थोडे खाली यावे
ज्यांचे जन्म मातीत मळले
त्यांना अलगद उचलून घ्यावे ।।

- दत्ता हलसगीकर.



# गजल बादशाह : सुरेश भट

कु. प्रियंका चत्रे
१२ वी कॉमर्स

महाराष्ट्रातील रसिकांच्या मना मनात कवी सुरेश भट यांनी स्वत:मधील प्रतिभेची साधी, सरळ व 'रंग माझा वेगळा' अशी काव्यात्म ओळख करून दिली. मराठी साहित्यातील गझल या काव्यप्रकाराचे दालन सुरेश भट यांनी समृद्ध केले. 'रंग माझा वेगळा', 'एल्गार', 'रूपगंधा', 'झंझावात' यांसारख्या दर्जेदार काव्यसंग्रहांची निर्मिती त्यांनी केली.

वयाच्या १४ व्या वर्षापासून त्यांनी काव्यलेखनाला प्रारंभ केला.'गजल' हा काव्यप्रकार भट साहेबांची खासियत होती. त्यांच्या एकंदर जीवनाशी व व्यक्तिमत्वाशी सुसंगत असलेला हा काव्यप्रकार. त्याविषयी ते म्हणतात,'माझे आयुष्य असे होते की, जर मी गझलकडे न वळतो तरच आश्चर्य. माझ्या आयुष्याने मला गजल दिली. माझ्या कलंदराच्या जीवनात गझल मला परवडणारा प्रकार असल्यामुळेच मी गझल लिहू लागलो.' १९६७ साली भोपाळ येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात त्यांनी प्रथम गझल सादर केल्या तेव्हा उपस्थीत रसिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. तेथूनंच त्यांना 'गझलसम्राट' असा नावलौकीक मिळाला.

कुठल्याही चाकोरीत फार काळ राहावयाचे नाही हे आपल्या जीवनाचे सूत्र सुरेश भट यांनी वयाच्या विशीतच ठरविले होते. कलंदर वृत्तीत जीवन जगणाऱ्या माणसाने आपल्या कारकीर्दीची सुरूवात शिक्षकी पेशाने केली. थोडे दिवस पत्रकारितेत ते रमले. नागपूर आकाशवाणीत काही काळ नोकरी केली. पण ही सुरेश भटांची ओळख नव्हतीच मुळी. सतत काही तरी वेगळं करणाऱ्या या मस्त कलंदर माणसाला नाविन्याची ओढ होती.

'चल उठ रे मुकुंदा झाली पहाट झाली'

या अस्सल भूपाळीने सुरेश भटांची रचना प्रथमत: महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यात सुमन कल्याणपूरकर यांनी आपल्या रसिल्या आवाजात पोहचवली. 'मराठी कवितेला नवा होनाजी सापडला' असे सर्वत्र त्यांचे कौतुक झाले. पण कौतुकात गुंतून पडतील ते कवी भट कसले? तारुण्याच्या जोशात त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात महाराष्ट्राच्या बाजूने भाग घेतला.

एक काळ असा होता की कविता कानावाटेच मनात शिरायची. जनसमुदायासमोर म्हणून दाखवायची . सुरेश भटांनी तोच कित्ता गिरविला. ते स्वत: गायनात पारंगत नव्हते. पण अंत:करणात मात्र सुरांचा झरा होता. त्यांच्या मनोभूमीत निसर्गत:च सूर दडलेले होते. याची साक्ष गाजलेल्या कविसंमेलनाने दिलेली आहे.

सुरेश भटांचे राष्ट्रभाषेवर प्रभुत्व होते. तसेच उर्दू भाषा, त्यातील शेरोशायरी, गझल या गोष्टी पुस्तकांचा अभ्यास करुन ते ज्या प्रमाणात शिकले त्याहून अधिक प्रमाणात उर्दू भाषिकांच्या सहवासातून, त्यांच्याशी केलेल्या संभाषणातून व रात्र रात्र जागून ऐकलेल्या मुशायरातून ते शिकले. ते वावरले विदर्भात पण प्रादेशिकतेच्या सीमा त्यांच्या लोकप्रियतेच्या आड कधीच आल्या नाहीत. अवघ्या महाराष्ट्रात व बाहेरही हजारो शौकिनांपुढे त्यांनी मोठ्या तबियतीने गझला पेश केल्या व रसिकांनीही त्यांना भरभरुन दाद दिली. उच्चविद्याविभूषीत प्राध्यापकांपासून ते अशिक्षित पानवाल्यापर्यंत सर्वांच्याच काळजाला स्पर्श करणारी सुबोध व प्रासादिक रचना, हळवी

शब्दकळा, मुलायम गाभा असलेले शब्द, आशयाची व्यापकता, संयमाची शिस्त, नेमकेपणा अशी त्यांची लेखनशैली होती.

म. फुले, डॉ. आंबेडकर ही त्यांची श्रद्धास्थाने होती. पण त्यांचा कधीही भांडवल करण्याचा मोह त्यांना झाला नाही. भा. रा. तांबे, केशवसुत यांचे साहित्यिक ऋण ते मानत. संत तुकाराम व कुसुमाग्रजांपासून जिगर मुरादाबादी व फैज अहंमद फैज यांचे आपल्यावर संस्कार असल्याचेही ते मान्य करतात. 'कवीचे मूल्यमापन त्याच्या खाजगी जीवनावरुन करू नये' असे पु. ल. देशपांडे व आचार्य अत्रे म्हणतात. तरीही त्यांच्या स्वभावातील काही गोष्टींचा उल्लेख होणे गरजेचे आहे. खवय्येगिरि ही त्यांची खासियत होती. फटकळ बोलणे हा त्यांचा स्वभाव होता. कोणापुढेही हात न पसरणे हा त्यांचा बाणा होता. याविषयी ते म्हणतात..

'तुम्ही काय म्हणता याचा मला विषाद नाही

मी जीवंत आहे, माझा हा प्रमाद नाही'

चहाडखोरी, विश्वासघात, बदनामी या सवयींवर त्यांचा राग होता. तो केवळ कवितेतूनच व्यक्त न करता प्रत्यक्ष जीवनातही प्रसंगोपात व्यक्त केला. त्यामुळे ते मान सन्मानापासून दूर राहिले. सत्कार सोहळे त्यांच्या वाट्याला फारसे आले नाहीत. त्यावरही त्यांचे उत्तर होते..

'साय मी खातो मराठीच्या दुधाची

मी कुणाचा उंबरा झिजवू कशाला?'

सुरेश भट केवळ लिहीत राहिले असते तर त्यांच्या कविता व गझला फार तर पुस्तकरुपाने चिमूटभर वाचकांपुरत्याच उरल्या असत्या. पण पंडित ह्रदयनाथ मंगेशकरांनी अनेक कवितांना संगीतसाज चढविला. लता व आशा भगिनींनी त्या शब्दांचे जणू सोने केले.

'केव्हा तरी पहाटे उलटून रात गेली', 'चांदण्यात फिरताना', 'मालवून टाक दीप', 'आज गोकुळात रंग खेळतो हरी' अशा असंख्य रचना त्यांच्या मधुर आवाजाने मराठी माणसाच्या ओठावर रेंगाळत आहेत. आणीबाणी आल्यानंतर..

'उष:काल होता होता काळरात्र झाली

अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली'

अशा कडक शब्दात त्यांनी आणीबाणी विरोधात निषेध व्यक्त केला हे रसिक विसरलेले नाहीत.

वयाच्या ७१ व्या वर्षीही तेवढ्याच उमेदीने काव्यलेखन करणारा कवी विरळाच. अखेरच्या श्वासापर्यंत कविताच जगलेला हा कवी आपल्या अखेरच्या कवितेत म्हणतो..

'भर उन्हात आले, पावसात आले

मज भेटावयास शब्द गात गात आले'

यापुढील ओळी मात्र पूर्ण झाल्याच नाहीत. ज्या कवितेचा ध्यास त्यांनी जन्मभर जपला, ते शब्दच त्यांना अखेरीस गात गात भेटावयास आले. सुरेश भट नावाचे एक वादळ त्यांच्या जाण्याने शांत झाले.

'रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा

गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा'

असे अभिमानाने जाहीर करणारा अवलिया कवी या जगाच्या गुंत्यातून आपले पाय अगदी अलगदपणाने सोडवून दूरच्या प्रवासाला निघून गेला.

**चारोळ्या**

खूपच जड गेलं
तुझ्या प्रेमात गाफील राहणं
तू म्हणालास आवडलं तुझं मन
आणि त्याग करणं

प्रेमाच्या भरवशावर
तू मला झुलवलं
शेवटपर्यंत कळलंच नाही
यातून काय तू मिळवलं

अंधश्रद्धा निर्मूलनाचे भाषण देवून
पुढारी घरी आला
जत्रेत कापलेल्या बोकडाचा
प्रसाद ग्रहण केला

# जिवलग मैत्री



- प्रशांत ढबू
११ वी कॉमर्स

जीवनात मैत्री टिकवणे ही एक कसोटीच असते. रोहन, धीरज व सुजित असे तीन जिवलग मित्र होते. यांच्यात धीरज वयाने लहान पण अतिशय कुशाग्र बुद्धिमत्तेचा होता. त्याच्या लहानपणीच त्याचे आई वडील कॅन्सरने वारले होते. रोहन व सुजित वयाने थोडे मोठे असून अविचारी होते. पण मनाने प्रेमळ होते. धीरजला आपल्या आई-वडिलांची कमतरता भासत असल्याने तो नोकरीच्या शोधात होता. रोहनने त्याची नोकरी पक्की केली.

धीरज सकाळी शाळतून जाऊन आल्यावर दुपारी नोकरीवर जात असे. त्याचा मालक अतिशय खडूस होता. कितीही काम केले तरी तो धीरजला अतिशय तुटपुंजा पगार देत असे. धीरज हा शाळेत अभ्यासात अतिशय हुशार होता. त्याला मिळालेल्या पगारातून तो आपले शिक्षण हळूहळु पूर्ण करीत होता. अशाप्रकारे असे त्याचे जीवन कष्टाचे होऊन बसले होते. कधी कधी आपल्या आई वडिलांच्या आठवणींनी त्याच्या डोळ्यात अश्रूंची गंगा वाहत असे. त्याच्या दु:ख सांत्वनासाठी ते दोन मित्र त्याला सख्ख्या भावाप्रमाणे प्रेम देत असत. पण त्या नोकरीने त्या तिघांच्या मैत्रीला अलग अलग केले. त्यांची मैत्री एखाद्या हरवलेल्या वाटसरूप्रमाणे दूर झाली.

धीरज एकाकी पडल्याने रोहन व सुजित दर रविवारी भेटायला येत असत. धीरजही अधूनमधून त्यांना पत्र लिहीत असे. हे पत्र म्हणजे त्यांच्या प्रेमळ मैत्रीचा निखळ झराच होता. धीरज पुढे शिकून मोठा डॉक्टर झाला. रोहन व सुजित अविचारी असल्याने त्यांनी शिक्षणात रस घेतलाच नाही. त्यामुळे त्यांचे जीवन कष्टी बनले. ते आता दोन वेळच्या जेवणालाही महाग झाले होते. त्यातच सुजितला कॅन्सर झाला. त्याच्याकडे इलाजालाही पैसा नव्हता. ही बातमी धीरजला कळाली तेव्हा धीरजच्या डोळ्यातुन अश्रू ओघळू लागले. त्यांना प्रथम आपल्या आई वडिलांची आठवण झाली. त्याने तत्काळ स्वत:च्या प्रेमळ मनाने व स्वखर्चाने सुजितचा इलाज केला.

अशाप्रकारे एका प्रेमळ विचारी मित्राने जिवलग मैत्री साठी मित्राचा जीव वाचवला!

## चारोळ्या

तुझा बाप
भलताच खविस
म्हणतो मुलगी वेटरला देईन
नाही देणार कवीस

प्रेमाची दोन अक्षरे
आम्हाला कधी कळलीच नाहीत
कळणार कसे?
कोणाची नजर आमच्यावर
वळलीच नाही

माझ्या प्रेमावर
काय तुझा बहाणा आहे
म्हणते ई-मेल कर
इंटरनेटचा जमाना आहे.

# साने गुरूजी :- थोर साहित्यिक



- संदिप देसाई
११ वी सायन्स

तो स्वातंत्र्यपूर्व कालखंड होता. २४ डिसेंबर १८९९ चा रुपेरी दिवस! निळ्याभोर आकाशात ढगांची गस्त चालू होती. नारळाची उंचच उंच झाडे वाऱ्यावर डोलत होती. रम्य कोकणची भूमी एका 'ज्ञानपुत्राचे' स्वागत करण्यासाठी सज्ज झाली होती. पालगडला यशोदामातेच्या पोटी 'पांडुरंग' जन्माला आला. तेच पुढे साने गुरूजी म्हणून नावारुपास आले. त्यांचे वाडवडील जमीनदार पण ऐश्वर्य फक्त आठवणीतच राहिले. कुलवैभव लयाला गेले. घरी अठराविश्वे दारिद्र्य आले. आई यशोदाबाई म्हणजे थोर मायमाऊली, अद्वैताचा साक्षात्कार झालेली मूर्तीच. तिनेच पाडुरंगाला बुद्धीचे वैभव दिले. भावभक्ती, निर्भयता, सत्यनिष्ठा, विद्याविनयता, सहृदयता, त्याग, चारित्र्य इ. मूल्यांचे जणू बाळकडूच पाजले. 'शिक्षण म्हणजे संस्कार' सत्कर्माची लाज नको हे त्याच्या बालमनावर बिंबवले.

त्यांचे पाचवी पर्यतचे शिक्षण गावातच झाले. पुढील शिक्षणाशिवाय इलाज नव्हता. तेव्हा मामाकडे ते पुण्याला आले. पण काही दिवसांतच ते आईच्या ओढीने गावी आले. दापोलीत शिक्षणक्रम पुरा केला. शिक्षणाची गोडी लागली. सुट्टीच्या दिवशी आईकडे येवून दापोलीला जाताना कोणत्याही मूल्याशिवाय मिळणारी प्रेमाची शिदोरी घेवून जात. घरी दारिद्र्याला महापूर होता. त्यात आई वडिलांच्या आजारपणाने भर पडली. शिक्षणासाठी मिळणारी थोडीफार मदतही बंद झाली. अशा बिकट प्रसंगातून बाहेर पडण्याचा मार्ग त्यांना सापडला. औंध संस्थानातील सवलती त्यांनी मिळविल्या. त्यावर तो मॅट्रिक पास झाला. पण या आनंदावर एकापाठोपाठ एक दु:खाचे डोगर कोसळले. भाऊ, आई वडील यांचे एकापाठोपाठ निधन झाले. भावनाप्रधान असणाऱ्या पांडुरंगाला जगणे नकोसे झाले. कोणासाठी जगू आणि शिकू ? या त्यांच्या प्रश्नाला मावशीने उपदेशपर उत्तर दिले.'भावंडासाठी शिक, जगासाठी जग. आईला देणार होता ते प्रेम जगाला दे'.

लेखक होऊन आईला सुखी करण्याचे स्वप्न पाहणारा पांडुरंग खरोखर जगासाठी शिकला. पदवीपरीक्षा देवून तो शिक्षक झाला. त्यांचे विद्यार्थी सद्गूणी बनले. चारित्र्यशील, ज्ञानसंपन्न बनले. ते मुलांमध्ये रमणारे शिक्षक होते.

स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी होवून देशासाठी क्रांतिकार्य केले. सत्य, अहिंसा व सत्याग्रह या त्रयीचे ते उपासक होते. ज्ञानाच्या खाणीतून सुवर्णकण वेचून सर्वसामान्य लोकांपर्यत पोहचविण्याची त्यांची अखंड तळमळ होती. साडे एक्कावन्न वर्षाच्या आयुष्यात त्यांनी अनेक विद्यार्थी निर्माण केले. देशासाठी तुरुंगवास भोगला.

सानेगुरुजींनी विपुल ग्रंथसंपत्ती निर्माण केली. 'हिमालयाची शिखरे' 'शबरी' 'चंद्रभागेच्या वाळवंटी' 'त्यागातील वैभव' 'सती' 'बापूर्जींच्या गोष्टी' असे विपूल लेखन केले. त्यांच्या लेखनात जीवनाचे अमोघ तत्त्वज्ञान भरुन राहिले आहे. 'शामची पत्रे' ही त्यांची गाजलेली लेखन संपदा. पुण्याच्या कारागृहात ८४ रात्री जागून त्यांनी ती जिवंत कलाकृती निर्माण केली. 'शामची आई' जगातील अनेक भाषात रुपांतरित झालेली एकमेव साहित्यकृती.

१९५० चा तो जून महिना होता. दादरच्या मेघभुवनातील मित्रांशी त्यांनी गप्पा मारल्या. शेवटचे पत्र विनोबांना लिहिले. तो त्यांचा अखेरचा संदेश 'लोकशाही, सत्याग्रह, समाजवाद हे ध्येय करा. अजातिय, अहिंसक, सत्याग्रही, लोकशाही दृष्टी घ्या. भारतात रक्तपात न होता समाजवाद फूलू दे' असा संदेश देवून साने गुरुजींनी आपले जीवन संपविले.



# स्त्री :- सामाजिक शक्ती

- कु. शर्मिला कदम
११ वी सायन्स

'यत्र नार्यस्तु पूज्यन्तें रमन्ते तत्र देवता: ।
यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तफला: किमा: ।।

अर्थात जेथे स्त्रीची पूजा होते, तेथे सुखसमृद्धी नांदते तर जेथे स्त्रीकडे आदराने पाहिले जात नाही, जेथे स्त्री दु:खात आयुष्य कंठते त्या घराची, समाजाची, पर्यायाने त्या देशाची उन्नती होणे कधीही शक्य नाही.

या पुराणकालीन श्लोकावरून आपणाला लक्षात येते की स्त्रीचे समाजातील स्थान किती महत्त्वाचे आहे. पण आपणाभोवती घुटमळणाऱ्या पुरूषप्रधान संस्कृतीत निश्चितच प्रत्येकाला प्रश्न पडेल की स्त्रीचे समाजात एवढे महत्त्व कसे काय? पुरूषप्रधान संस्कृती अस्तित्वात येण्याचे कारण काय? हे समजावून घेण्यासाठी अनादिकालापासून अगदी आजपर्यंत चालत आलेल्या आपल्या भारतीय संस्कृतीचा इतिहास तसेच वर्तमान यांचा आढावा घ्यावा लागेल. या दोघांच्या आधारावर भारतीय स्त्रीची भविष्यकालीन वाटचाल कशाप्रकारे व्हायला हवी की जेणेकरुन आपला देश प्रबळ बनेल हे कळून येईल.

कोणतीही गोष्ट सत्यात अवतरण्यासाठी शक्तीची आणि सत्वाची गरज असते. हे त्रिकालाबाधीत सत्य आहे. अगदी या विश्वाची निर्मितीही याला अपवाद नाही. पुराणात सांगून ठेवले आहे. पुराणपुरुष शिवशंकर आणि आदिमाया पार्वती यांच्यामुळे विश्वाची उत्पत्ती झाली. आदिमाया म्हणजेच हिमालय कन्या देवी पार्वती. सर्व स्त्री जातीचे प्रतिनिधित्व करते व पुराणपुरुष महादेव शंकर पुरुषजातीचे प्रतिनिधित्व करतात म्हणजेच स्त्री म्हणजे शक्ती व पुरूष म्हणजे सत्व. हेच मूलतत्व आदर्श मानून अनादिकालापासून बलशक्ती देवी दुर्गा अर्थशक्ती लक्ष्मी, प्रतिभाशक्ती देवी सरस्वती, वीरशक्ती माता भवानी यांची पूजा करण्यात येते. तसेच सत्व म्हणून बारा ज्योतिर्लिंग शंकराची पूजा करतात. सत्व म्हणूनच शंकराला 'भोळा सांब' म्हंटले जाते. यावरूनच स्त्रीचे समाजातील स्थान किती महत्त्वाचे आहे हे समजते.

सर्व प्रेमभावनांमध्ये मातृभाव हा सर्वश्रेष्ठ भाव आहे. मातेचे अपत्यावरील प्रेम व कन्या व पुत्राचे मातेंवरील प्रेम म्हणजेच मातृभाव. या प्रेमाच्या धाग्याभोवती आपला समाज गुंफला आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात, 'मातेच्या प्रेमामध्ये महान शक्ती आहे. एकवेळ पती पत्नीला सोडून देईल किंवा पत्नी पतीला सोडून देईल. परंतु पुत्र किंवा कन्या मातेला वा माता पुत्र वा कन्या यांना प्रतिकूल परिस्थितीतसुद्धा आपल्या छत्राखाली जपत असते.' संतांनी सुद्धा सांगितले आहे की, 'स्त्री ही क्षणाची पत्नी तर अनंतकाळची माता असते.'

मूल जन्माला आल्यानंतर त्याला पहिला गुरु म्हणजे आई. हीच संतती पुढे मोठी होवून समाजावर परिणाम करणारी घटक बनते. समाजाच्या जडणघडणीत मातेचा मोलाचा वाटा आहे.

पुराणात जरी पाहिले तरी आपल्याला हेच दिसून येते. रामावर संस्कार करणारी कौसल्या, पाच पांडवांना वाढविणारी कुंती, तसेच इतिहासातील उदाहरण पाहिले तर माता जिजाऊंनी शिवाजी महारांजांच्या बालमनावर लहानपणापासून चांगले संस्कार करून त्यांना स्वराज्यस्थापनेसाठी प्रेरित केले.

समाजाच्या बांधणीतही स्त्रीचा खूप सहभाग आहे. इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्ययुद्धाचा झेंडा उभारणारी राणी लक्ष्मीबाई, संत बहिणाबाईंचे संत वाङ:मयातील योगदान, बहिणाबाई

चौधरींचे समाजप्रबोधनाचे कार्य. यामुळे समाजबांधणीस हातभार लागला आहे. तसेच भारतीय स्वातंत्र्ययुद्धात अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक कार्य उल्लेखनीय आहे. तसेच भारतीय स्वातंत्र्ययुद्धात कॅप्टन लक्ष्मीबाई, मादाम कामा, अरुणा असफअली, सरोजनी नायडू यांनी मोलाचा वाटा उचललेला आहे. स्वातंत्र्यानंतरही या स्त्रिया समाजकार्यात सक्रीय होत्या. स्वातंत्र्यानंतर विजयालक्ष्मी पंडीत या संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेच्या पहिल्या भारतीय महिला अध्यक्षा होत्या. राजकीय क्षेत्रात इंदिरा गांधी भारताच्या पहिल्या पंतप्रधान होत्या. समाजकार्यात मदर टेरेसा यांचे कार्य उल्लेखनीय होते.

आजच्या वर्तमान युगातही स्त्रियांनी पुरुषाच्या बरोबरीने कर्तृत्व गाजवून समाजाच्या जडणघडणीत योगदान दिले आहे. राजकीय क्षेत्रात उठावदार कार्य करणाऱ्या मनेका गांधी या 'नवपर्यावरणवादी' म्हणून ओळखल्या जातात. सामाजिक क्षेत्रात सर्वस्व वाहून कार्य करणाऱ्या स्त्रियांमध्ये 'नर्मदा बचाओ आंदोलन' प्रकर्षाने चालविणाऱ्या मेधा पाटकर. तसेच आदिवासींच्या उत्कर्षासाठी झटणाऱ्या सिंधुताई सपकाळ यांचेही कार्य समाजात जागृती निर्माण करीत आहे. भारतीय पोलीस सेवेतील किरण बेदी यांची कामगिरी तर प्रशंसनीय आहे. व्सनाधीनतांना सुधारण्यासाठी स्वत:ची 'संज्योती' ही समाजकार्य करणारी संघटना काढली. त्याच संदर्भातील व्यसनाधीनता व व्यसनाधीनतेमुळे होणारा हिंसाचार या विषयावर आय. टी. आय मध्ये पी.एच.डी मिळविली आहे.

'दिव्यत्वाची जेथे प्रचिती
तेथे कर माझे जुळती'

असे ज्यांच्यासमोर अभिमानाने म्हणावे लागते त्या अंतराळवीर 'कल्पना चावला' यांचे धाडस, शौर्य आम्हा भारतीय महिलांना प्रेरणादायी आहे. ८ फेब्रुवारी २००३ रोजी अंतराळयानाच्या दुर्घटनेत सात अंतराळवीरांमध्ये कल्पना चावला होत्या. नेत्रदीपक कामगिरी करुन त्या अजरामर झाल्या.

भारतीय स्त्रीने आपली ही शक्ती ओळखून समाजाच्या विकासासाठी सिद्ध झाले पाहिजे. त्यासाठी तिच्यापुढे आदर्श आहेत गार्गी, मैत्रयी, लिलावती, मीराबाइ, सावित्री, दमयंती, कौसल्या, कुंती, संत बहिणाबाई, जिजाबाई, राणी लक्ष्मी, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, सरोजनी नायडू, मॅडम कामा, इंदिरा गांधी, मदर टेरेसा, सिंधुताई सपकाळ, डॉ. किरण बेदी, कल्पना चावला यांचे.

आज पुन्हा समाजाला शक्तीची गरज निर्माण होत आहे. भारतीय समाज पुन्हा एकदा जगासमोर आदर्श म्हणून उभा राहील यासाठी स्वत:ला ओळखा व समाजासमोर आदर्श निर्माण करा. म्हणूनच म्हणावेसे वाटते...

'बनकर आँधी, तुफान लढती जा जुल्मसे मर्दानी ।
तू शक्ती है, तू भक्ती है, तू ही दूर्गा, तू भवानी ॥

# तू निघून गेल्याचं दु:ख नाही

तू निघून गेल्याचं दु:ख नाही
तुझ्यावर प्रेम करण्याचं सुख आहे
तुझ्याविना जगणं असह्य आहे
परंतु....
इतरांसाठी जगणं कर्तव्य आहे.

तू फक्त एकदाच खरं खरं मला
सांगितलं असतस तर
या मनाच्या जंगलातील
दु:खाच्या वणव्याला थांबवता आलं असतं.

खूप काही सांगायचं होतं तुला
मनातच सारं राहून गेलं
घरटं बांधायच्या आधीच
पाखरु रान सोडून निघून गेलं

**- अमित गंगवणे**
१२ वी विज्ञान



## उपकार

सांग ना गं आई
इतकं प्रेम कुठून आणलसं
आई खरंच माझ्यासाठी
काय नाही सोसलंस
ऊन, वारा, पाऊस, थंडी
सगळं स्वतः झेललंस
पदर पांघरुन मायेचा
आई मला वाढवलसं
सांग मला आभाळासारख
प्रेम कुठुन आणलंस
माझ्यासाठी जीवनात या
किती दुःख सोसलस
हे अमूल्य असे संस्काररत्न
सांग कुठुन आणलंस
या असमज मनात
हे संस्कार बीज कसं पेरलंस
सांग मला आभाळाएवढं
प्रेम कुठून आणलंस
तुझे हे कष्ट सारे
पुष्कळ झाले आता
सांग मला आई तुझे
आभाळाएवढे उपकार हे
फेडू तरी कसे आता?

**- अमोल माने**
११ वी कॉमर्स

## कर्मवीर गीत

हे कर्मवीरा
कोटी कोटी प्रणाम तुला,
सुपुत्र तू भारत मातेचा
अभिमान वाटतो आम्हाला
कणकण वेचून आयुष्यातील
दूर सारिला भवतीचा अंधार
हाती देऊन लेखणी
तुम्ही घडविला साक्षात्कार
विद्येच्या ध्यासापायी
खाल्ल्या खस्ता वारंवार
उभारुन विद्या मंदिरे
दिला बहुजनास आधार
लाविलासी तुम्ही इवलासा वटवृक्ष
त्याचा झाला पसारा
शेतकरी, कामकरी दुबळ्यांचा
तुम्हा ध्यास सारा
काढून वसतिगृह सोडविला
प्रश्न तुम्ही आमच्या राहण्याचा
सर्व धर्म समभाव साधुनी
संदेश दिला तुम्ही मानवतेचा
स्वावलंबी बनूनी तुम्ही दिले
'कमवा व शिका' चे हत्यार
यशाचे मनोरे जिंकले
करुनी दारिद्र्यावर प्रहार
अज्ञानाचा अंधार भेदूनी
प्रकाश दाविला जीवनी
जागृत करून रयतेला
पार केले झंझावातातुनी
हे कर्मवीरा
कोटी कोटी प्रणाम तुला
सुपुत्र तू भारत मातेचा
अभिमान वाटतो आम्हाला

**- कु. आस्मा सुतार**
११ वी इले.

# सांग सांग भोलानाथ

सांग सांग भोलानाथ
माझ्या देशातुन भ्रष्टाचार निघून जाईल काय?
माझ्या देशातुन गरिबी, बेकारी निघून जाईल काय?
माझ्या देशी लक्ष्मी निवास करेल काय?

सांग सांग भोलानाथ
हे मंत्री, नेते प्रामाणिकपणे काम करतील काय?
आणि ते आपल्या देशाचा विकास करतील काय?
झोपडपट्टी, बेघर, भिखारी लोकांना
अन्न, वस्त्र, निवारा देतील काय?

सांग सांग भोलानाथ
आपल्या देशात खरचं स्त्री मुक्ती होईल काय?
पुरूषाप्रमाणे तिला हक्क मिळतील काय?
तिचा परंपरागत चालत आलेला छळ नाहीसा होईल काय?

सांग सांग भोलानाथ
दहशतवाद, घुसखोरी, युद्धे बंद होतील काय?
रक्ताच्या नद्या वाहण्याच्या थांबतील काय?
दहशतवादी देश व माणसे यांचा नायनाट होईल काय?

सांग सांग भोलानाथ
जगामध्ये शांतता निर्माण होईल काय?
माणसा-माणसात प्रेम, बंधुभाव, एकता निर्माण होईल काय?
पुन्हा या पृथ्वीवर मानवता आणि समानता स्थापित होईल काय?
सांग सांग भोलानाथ

**- विक्रम कुंभार**
११ वी सायन्स



# मैत्री

मैत्री पहात नाही जात,
मैत्री पहात नाही धर्म,
निस्वार्थीपणा हेच तर,
खऱ्या मैत्रीचे मर्म.
मैत्री पहात नाही तन,
मैत्री पहात नाही धन,
खरी मैत्री पहात फक्त,
निष्पाप निर्मळ मन.
मैत्रीमध्ये नसते,
दूष्टभाव व क्रंदन,
खरी मैत्री रहाते,
चिरकाल चिरंतन.
मैत्री कधी नसावी,
फक्त कामापूरता मामा,
मैत्री असावी जशी
कृष्ण आणि सुदामा.

**- संदिप देसाई**
११ वी विज्ञान

## प्रेम म्हणजे काय



पुरे झाले रुसणे
पुरे झाले फुगणे
पुरे झाले नाक मुरडणे
पुरे झाले बघणे

जवळ येवून सांग मला
काय आहे तुझे म्हणणे
नाकावरती राग आणून
पुरे झाले बघणे

तुझ्या आठवणीने मन माझे गेले गांगरुन
अभ्यास गेलो विसरून अन
परीक्षा गेली होवून

निकालाचा दिवस होता
काळीज होते धडधडत
व्यर्थ होते सर्व काही
वर्ष गेले फुकट

प्रेम हे असेच असते
जीवनातील सुख दुःखांचे
कोमेजलेल्या मनाचे अन्
ध्येयाला विसरण्याचे

म्हणून म्हणतो जागे व्हा
प्रेमाबद्दल मागे रहा
जीवन होईल सुखमय सारे
ध्येय शेवटी गाठायचे आहे.

**- अमोल माने**
११ वी कॉमर्स



## दुःख

त्या दिवशी
बसलो होतो एकदा मी
आठवड्याच्या बाजारात
माझं दुःख विकण्यासाठी

मनाच्या गाठोड्यात
किती वजन होतं ते
मी मोजलचं नव्हतं कधी
खरं सांगू!
दुःख विकत घेणारे कुणीही
त्यादिवशी माझ्या समोर आलेच नाही

अन् तसाच मी
रित्या हातांनी
परतलो माघारी
त्यावेळी तू वाटेत भेटलीस
आणि माझं दुःख आपणहून घेतलंस

आणि आज...
घेतलेले दुःख व्याजासहित
परत देऊन निघून गेलीस

**- अमित गंगावणे**
१२ वी विज्ञान

## सह्याद्री २००२-२००३



" यह महान दृष्य है
चल रहा मनुष्य है
अश्रु-स्वेद-रक्त से लथपथ, लथपथ, लथपथ
अग्निपथ ! अग्निपथ ! अग्निपथ !

---

झुकी पलके अवनत सर
बंधे हाथ, यह चित्र मनुष्य का नही
पशुका है कायर !
प्रार्थना मत कर !
मत कर !!
मत कर !!!

*- हरिवंशराय बच्चन*

# हिंदी विभाग

- विभागीय संपादक -

**प्रा. राजेंद्र इंगोले**

# अनुक्रमणिका

## गद्य विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| ◆ मानव क्लोनिंग : अभिषाप या वरदान | कु.अंजली गुरव | स्नातकोत्तर प्रथम वर्ष साहित्य | ७९ |
| ◆ सात के अंदर घर में | राजू गायकवाड | तृतीय वर्ष साहित्य | ८१ |
| ◆ शिवमंगल सिंह : काव्य सुमन की महक | कु.स्मिता पाटील | तृतीय वर्ष साहित्य | ८३ |
| ◆ मधुर गीतों की मधुशाला | कु.पुनम पाटील | तृतीय वर्ष साहित्य | ८५ |
| ◆ चतुराई | कु.अर्चना पाटील | स्नातकोत्तर द्वितीय वर्ष साहित्य | ८८ |
| ◆ सलाखों के पीछे | कु.उल्का पाटील | स्नातकोत्तर द्वितीय वर्ष साहित्य | ९० |
| ◆ अविस्मरणीय सफर | कु.ज्योती इंगोले | प्रथम वर्ष विज्ञान | ९२ |


## पद्य विभाग


